


REFBK-0022816

# नागफणा आणि सूर्य

# नागफणा आणि सूर्य

गजमल माळी

REFBK-0022816



पृथक प्रकाशन : १

प्रकाशिका : सौ. रमा राऊत, पृथक प्रकाशन, अंगुरीबाग, औरंगाबाद ४३१ ००१

मुद्रक : प्र. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई ४०० ००४

© १९७९, गजमल माळी

पहिली आवृत्ती : जून १९७९

Nagfana ani Surya (Marathi) Gajmal Mali

मुखपृष्ठ आणि आतील चित्रे : भ. मा. परसवाळे

मलपृष्ठ रेखाटन : पूनम बन्सवाल

मांडणी : दीपक खन्ना

वितरक : विद्या बुक्स्, औरंगपुरा, औरंगाबाद.

किंमत तीस रुपये

अन् विझल्यावरती ज्वाळा
वाटले मला एकाकी,
सूर्य वितळूनी जावा
डोळयात, नभाच्या काठी.
कधी पक्षी अवचित आले
जखमांतून उठवित चोचा
समृद्ध; पहाडाखाली
वाळूत उभविला खोपा.
मेघांनि चिंब भिजवावे
मातीचे अंतर पोट
की गर्द गुहेतून आली
मनव्याकुळ ओली वाट.
स्वप्नात पाहिले ? कोठे
साऊली उमटली होती ?
रानात शोध घेताना
मेघात पेटल्या वाती.
काळोख, आवेगी वारे
कुळवंत घराहून जाती
घनदाट अरण्यामधले
ते हात मुखाहुन फिरती.
श्रीमंत बोर लखलखते
रानात समाधीपाशी;
वाढत्या वयासह येते
ती विस्तारत मजपाशी.

**वडिलांच्या पवित्र स्मृतींना**

काळाच्या एका प्रवाहात संदर्भ मिळाल्याने ही कविता जन्मास आली हे खरं असलं, तरी माझ्या जन्माआधीच यातील जीवन माझ्या कुटुंबात वाहत होतं. देहावर उमटलेल्या जन्मजात खुणांचा अर्थ पूर्वघटितांशी जोडणाऱ्या उद्ध्वस्त वारकरी वाड्यात मी जन्मलो. आईच्या रानदुधाबरोबर हे अवशेषही रक्तात मुरतच गेले. जे जीवनात होतं ते समृद्ध संदर्भानं मुखरीत झालं. संदर्भ मिळाले नसते, तरी बाहेर ओसंडल्यानंतर रक्ताचे रंग बदलले नसते. उन्हाची झाक पसरली असती नि त्याची टवटवी कुठल्या तरी क्षणी मला भेटली असती. त्या क्षणाची वाट पाहाणे आवश्यक नव्हते, ते संततधार, आपसुक सामोरे येत होते. उत्खननात सापडलेल्या, पण गंजलेल्या पात्याचे चरे उमटत होते आणि मी माझं बळ एकवटून ओले चरे मिरवीत होतो.

ही कविता लिहून झाली, त्या दिवशी विलक्षण अनुभव आला. प्रदीर्घ आजारातून उठल्यावर जी विकलता येते ती वाट्याला आली. अस्वस्थता, असमाधान सारखं वाढत गेलं. ते तस वाढूं न देणं मला शक्य झालं नाही. अजून काही देणं आहे ही भावना मनात बळावत आहे.

पहिल्यांदा ही कविता माझ्या मित्रांनी ऐकली. डॉ. यू. म. पठाण, प्रा. तु. शं. कुळकर्णी, डॉ. रु. पां. पाजणकर, डॉ. भाऊ मांडवकर, प्राचार्य जनार्दन वाघमारे, डॉ. एस्. एस्. भोसले, प्रा. गंगाधर पानतावणे, प्राचार्य सदाविजय आर्य, प्रा. केशव मेश्राम, प्रा. भालचंद्र नेमाडे, बंकट पाटील, भ. मा. परसवाळे, बाबुराव बागूल, प्रा. फ. मुं. शिंदे, अॅड. राम सोनवणे, विद्या सदावर्ते आणि प्रा. नागनाथ कोत्तापल्ले यांनी. ऐकताना मित्र अस्वस्थ होत होते. माझ्या पत्नीला व माझ्या मुलांना वाचून दाखविली, तेव्हा मुलांनी अनेक प्रश्न विचारलेत. त्यांचे समाधान होईल अशी उत्तरे माझ्याजवळ नव्हती. मी नंतर असं वाचन थांबवलं.

'गंधवेणे'ला माझे शिक्षक व थोर समीक्षक प्रा. वा. ल. कुळकर्णी यांची प्रस्तावना होती, या दीर्घ कवितेला माझे सहकारी मित्र व अमेरिकन नीग्रो साहित्याचे अभ्यासक प्राचार्य जनार्दन वाघमारे यांची प्रस्तावना लाभली आहे. माझ्या कवितेचे एक दीर्घ

परीक्षण कै. दि. के. बेडेकर यांनी साहित्य पत्रिकेतून लिहिले होते. नंतरच्या एका प्रत्यक्ष भेटीत माझ्याशी माझ्या कवितेवर बोलले. ती भेट माझ्या स्मरणातून गळून जाणारी नाही. 'नागफणा आणि सूर्य' प्रकाशित होत असताना त्यांची तीव्रतेने मला आठवण होत आहे.

प्रकाशनास लागणारे सर्व प्रकारचे परिश्रम प्रा. नागनाथ कोत्तापल्ले, पूनम बन्सवाल, दीपक खन्ना आणि वसंत पिंपळापुरे यांनी घेतलेत. कविमित्र परसवाळे यांनी रेखाटने व मुखपृष्ठ, प्राचार्य वाघमारे यांनी प्रस्तावना देऊन सहकार्य केले. प्रा. श्री. पु. भागवतांशी असलेले वाङ्मयीन ऋणानुबंध त्यांचे पुतणे श्री. माधव भागवत यांनीही सांभाळले.

माझे सहकारी मित्र प्रा. कुमार देशमुख यांनी आस्थेने या दीर्घ कवितेचे नाट्यरूपांतर केले आहे.

मी सर्वांचे मनापासून आभार मानतो.

**गजमल माळी**

'मृगनक्षत्र',
८ जून १९७९



प्राचार्य गजमल माळी यांची "नागफणा आणि सूर्य" ही समकालीन मराठी काव्यात एक प्रकारचे निराळेपण घेऊन अवतरलेली कविता आहे. तिच्या अंतरंगात वाचकांच्या मनाला अनुकंपित करणारे सामर्थ्य दडलेले आहे. पण प्रथमतः लक्षात येते ते तिच्या आशय, आकारातील निराळेपण. ती एक प्रदीर्घ कविता आहे.

मराठी साहित्याच्या इतिहासात दीर्घ कवितेची परंपरा स्थूलपणे दोन स्वरूपात आढळते. प्राचीन काळात आख्यान-काव्याच्या रूपाने व अर्वाचीन कालखंडात खंडकाव्याच्या रूपाने. मराठी दीर्घ कवितेची परंपरा या दोन लेखन प्रकारांनी विकसित व समृद्ध झालेली आपणास आढळून येते. आणि ती परंपरा प्रदीर्घ काळपर्यंत टिकलेली होती ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. आख्यान कवितेने तेराव्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यंत वेगवेगळी वळणे घेऊन वाटचाल केलेली आहे. या काळातील महाराष्ट्राचे सबंध धार्मिक व सांस्कृतिक जीवन तिच्या आवाक्यात आले होते असे म्हणता येईल. आणि ज्या ठिकाणी तिची वाटचाल संपली तिथून खंडकाव्याचा प्रवास सुरू झाला. पुढे एका शतकापेक्षाही अधिक काळपर्यंत या खंडकाव्याने मराठी दीर्घ कवितेची परंपरा टिकविली व श्रीमंत केली आहे. असे दिसून येते की, १८५० ते १९६० पर्यंत ही परंपरा सातत्याने टिकून राहिलेली होती. या प्रदीर्घ कालखंडात भारतात व प्रामुख्याने महाराष्ट्रात जी जी राजकीय व सामाजिक स्थित्यंतरे झाली त्यांचा आलेख मराठी खंडकाव्यात सापडतो. आख्यान काव्याप्रमाणे खंडकाव्यालाही महाकाव्याचे अभिजात स्थान घेता आले नाही ही गोष्ट खरी असली तरी त्यांचा आवाका (Sweep) मात्र बराच मोठा आहे. समाजजीवनाच्या विविधांगांचे दर्शन व काळाचे

सादपडसाद यांचा खंडकाव्यात आढळ होतो. रविकिरण मंडळातील कवींनी तर मराठी खंडकवितेला विलक्षण लक्षणीय असा सामाजिक आशय दिला. नवकवितेचा जन्म झाल्यानंतर मात्र मराठी दीर्घ कवितेची ही प्रदीर्घ अशी परंपरा संपली असे म्हणता येईल.

गजमल माळींची "नागफणा आणि सूर्य" ही दीर्घ कविता वरील दीर्घ कवितेच्या परंपरेत मात्र बसत नाही. आशय आणि अभिव्यक्ती या दोहोंच्याही दृष्टीने ती वेगळी आहे. आशयाच्या दृष्टीने सामाजिक खंडकवितेशी ती थोडीशी तोंडओळख दाखवू शकेल. पण हे खंडकाव्य नाही. आख्यान काव्याशी तर तिचे गोत्रच जुळत नाही. तिची जातकुळी निराळी आहे हे सांगण्याची गरज नाही. माळींच्या या कवितेला मी "आत्मकविता" या नावाने संबोधू इच्छितो. ती "soul poem" आहे. ही कविता आत्मशोधाच्या व आत्माविष्काराच्या धडपडीतून निर्माण झालेली कविता आहे. कवीच्या "life-blood" मधून जन्मलेली ती कविता आहे, याची जाणीव प्रकर्षाने होते. कवीच्या जीवनाचे सर्व आंतरिक सत्त्व (essence) तिच्याद्वारे आविष्काराची वाट शोधत प्रवासाला निघाले आहे.

मराठी दीर्घ कवितेची परंपरा खंडित झाल्यानंतरच्या काळात माळींनी ही प्रदीर्घ कविता लिहिली आहे ही एक अतिशय अर्थपूर्ण घटना आहे. एखाद्या गोष्टीची परंपरा अस्तित्वात नसताना जेव्हा ती अस्तित्वात येते तेव्हा तिला एक प्रकारची ऐतिहासिकता प्राप्त होते, ही गोष्ट मान्य करावी लागेल. पण तिला अस्तित्वात आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला जातो, की ती अगोचर, अनाकलनीय व अपरिहार्य अशा कारणांमुळे अवतरते याचाही शोध घेणे या संदर्भात आवश्यक ठरते. दीर्घ कवितेची परंपरा आज खंडित झाली आहे. मराठीत दीर्घ कविता, काही अपवाद सोडल्यास सहसा कुणी लिहीत नाही; आणि म्हणूनच आपण ती लिहावी अशा विचाराने प्रेरित होऊन माळींनी त्यांची ही दीर्घ कविता लिहिली असावी असे मला वाटत नाही. कवी असल्यामुळे ते कविता लिहितात, पण आजपावेतो त्यांनी ज्या कविता लिहिल्या आहेत त्या नवकविता आहेत आणि सध्या अस्तित्वात असलेल्या नवकाव्याच्या पदराला धरून चालणाऱ्या त्या कविता आहेत. स्फुट नवकवितेला एका रात्रीत लाथाडून हा कवी एका सुरम्य सकाळीं ही दीर्घ कविता लिहावयास बसला का ? या प्रश्नाचे उत्तर "नाही" असेच आहे. कवितेच्या फॉर्मचा जाणीवपूर्वक विचार करून ही दीर्घ कविता माळींनी लिहिली असावी असे मला वाटत नाही. मनात दीर्घकालपर्यंत खूप असा सल साचला आणि एके दिवशी धरणासारखा तो फुटला, असेच काही तरी या दीर्घ कवितेच्या निर्मितीच्या बाबतीत झालेले असावे. खूप असे साचलेले फुटल्यानंतर ते वाट फुटेल त्या दिशेत बऱ्याच मोठ्या अंतरापर्यंत वाहत जाते; आणि त्याला वाहण्याच्या वेगात स्वतःचा घाट व स्वतःची लय सापडते. माळींची कविता दीर्घ कविता झाली ती त्यांच्या मनातील तीव्र अस्वस्थता व सल फुटल्यामुळे असे मला वाटते. त्यांच्या अस्वस्थ मनाचा बांध का फुटला ? तो फुटला मराठवाडा विद्यापीठाच्या

नामांतराच्या प्रश्नावरून, मराठवाड्यातील दलितांवर झालेल्या अमानुष अत्याचारामुळे! "नागफणा आणि सूर्य" ही कविता माळींच्या मनात दीर्घ काळापासून तुंबलेल्या वेदनेची वाट आहे. अशा प्रकारच्या एखाद्या घटनेतून मराठी वाङ्मयात एखादी दीर्घ कविता यापूर्वी कधी निर्माण झाली नाही असे म्हणता येणार नाही. मनमोहन नातूंची "युगायुगाचे सहप्रवासी" (१९४६) ही अशाच प्रकारच्या एका अमानुष घटनेतून निर्माण झालेली दीर्घ कविता होती. भारताच्या फाळणीपूर्वी नोआखलीमध्ये जी अमानुष कत्तल झाली त्या घटनेवर आधारलेली ही कविता आहे.

माळींच्या या कवितेला खंडकाव्यासारखी प्रदीर्घता प्राप्त झाली आहे ही गोष्ट उघड आहे. पण तिच्यातील भावनिक उत्कटता (emotional intensity) मात्र नवकवितेची आहे. नवकवितेच्या व्यक्तित्वाचा असा हा प्रभाव तिच्यावर झालेला आहेच. नवकविता ही काही दीर्घ कवितेचा ल० सा० वि० नाही. आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनीही ती वेगळी अशी वाङ्मयीन वस्तू (genre) आहे. तिला दीर्घकवितेचा व्यवहारी अपूर्णांक असेही मानता येणार नाही. ती आकाराने लहान असली तरी ती "पूर्णांक"च आहे. तिची उत्कटता म्हणजेच तिचे सामर्थ्य आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर नवकवितेला मराठी साहित्याच्या इतिहासात अनन्यसाधारण स्थान मिळाले ही गोष्ट निर्विवाद आहे. तिने आपले पृथगात्म व्यक्तित्त्व सांभाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. दुर्बोधतेच्या प्रांतातून वाटचाल करीत या काळातील व्यक्ती व समाजजीवनातील विफलता तिने व्यक्त केली आहे. प्रतिमा व प्रतिकांच्या जंजाळातही ती काही वेळा बरीचशी अडकून पडली. अनाकलनाच्या निसरड्या भूमीवरूनही तिने बरेचसे "स्केटिंग" केले आहे. प्रामुख्याने मध्यमवर्गीय मराठी मन शब्दबद्ध व आशयबद्ध करण्याचा प्रयत्न तिने केलेला आहे. मराठी नवकविता ही तशी रूपवेधी कविता आहे. पण स्वतःच्या भावविश्वापलीकडे तिला फारसे जाता आलेले नाही, ही एक वस्तुस्थिती आहे. छोट्याशा भिंगातून फारसे जीवन प्रतिबिंबीत करता येत नाही. माळींची या आधीची कविताही अशाच स्वरूपाची होती. तिची उत्कटता सांभाळून त्यांनी या दीर्घ कवितेच्या रूपाने विषय आणि अभिव्यक्तीची वेगळी वाट निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. मराठी नवकविताही समाजाच्या तळागाळातील जीवनाला स्पर्श करू शकली नाही, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. माळींची कविता अस्पर्श राहिलेल्या जीवन वर्तुळाला पहिल्यांदाच मराठी कवितेत रूप देत आहे.

मराठी साहित्यात अवतरलेल्या दीर्घ कवितेचे स्वरूप व तिची प्रकृती काळप्रवाहात बदलली असली तरी तिची कथात्मकता व वस्तुनिष्ठता मात्र बदलली नाही. दीर्घ कवितेला प्रामुख्याने कथाच सांगावयाची असते आणि ती कथा सांगत असताना तिला वस्तुनिष्ठ निवेदनही करावयाचे असते. कवी अनिलांच्या "भग्नमूर्ती" सारखी एखादी दीर्घ कविता अपवादाने अकथात्मकही असू शकते. तिची "वस्तुनिष्ठता" मात्र सातत्याने

टिकून राहिलेली आढळते. माळींची "नागफणा आणि सूर्य" ही दीर्घ कविता मात्र "आत्मनिष्ठ" आहे. वस्तुनिष्ठ निवेदनही तिच्यात आहे; पण तिची प्रकृती ही आत्मनिष्ठ कवितेची प्रकृती आहे. सामाजिक खंड कवितेशी या कवितेला एका वेगळ्या अर्थाने दूरचे नाते सांगता येईल ही गोष्ट खरी असली तरी तिला स्वतःचा वेगळेपणा लाभलेला आहे हे वाचकांच्या प्रत्ययास सहजपणे येते. ही कविता एखाद्या "Episode" वर आधारलेली नाही; पण तिला एका विशिष्ट "Event" ची पार्श्वभूमी लाभलेली आहे. ती घटनाही ह्या कवितेचा विषय आहे असे म्हणणे योग्य ठरेल. या कवितेचा निर्माता हा त्या घटनेचा एक साक्षीदार आहे; सहभावी आहे.

खरे तर माळींनी ह्या कवितेद्वारे मराठी साहित्याची खोल रुजलेली सांस्कृतिक परंपराच नाकारलेली आहे. त्या परंपरेच्या विरुद्ध त्यांनी आपला निषेध नोंदवला आहे. प्रचलित समाजव्यवस्थेच्या ज्या स्तरावर ह्या कवीच्या आईबापाला जे व जशा प्रकारचे जीवन जगावे लागले ते जीवन मराठी कवितेचा विषय म्हणून स्वीकारले गेलेले नाही, हे कवीचे दुःख आहे. हे दुःख रास्त आहे आणि अस्वस्थ करणारंही आहे. ज्या प्रकारचं सामाजिक जीवन आपण जगलो किंवा जगण्यासाठी बाध्य झालो त्याचा आढळ व आविष्कार आपल्या साहित्यात कोठेही न होणे ही मनाला खूप अस्वस्थ करणारी बाब आहे. आपल्या साहित्यात आपल्या जीवनाचा आणि त्या जीवनातील वास्तवाचा एखादाही कवडसा सापडू नये ही वस्तुस्थिती विषादपूर्णच आहे असे म्हटले पाहिजे. आणि मग ज्या साहित्याने आपल्याला नाकारलेले असते त्या साहित्याच्या परंपरेचा स्वीकार करणे म्हणजे एक प्रकारची आत्मवंचना ठरते. तिचा स्वीकार म्हणजे तिच्या सांस्कृतिक मूल्यांना आपल्या आत्म्यावर "ग्राफ्ट" करण्यासारखेच ठरते. आपल्या आत्म्यावर ती कदाचित वाढेलही पण तिच्यात त्या कवीचा आत्माविष्कार खऱ्या अर्थाने होऊ शकणार नाही. त्या परंपरेचा दत्तकपुत्र होण्यात काही फायदेही असू शकतात. पण त्या कवीला आपली अस्मिता (Identity) सोडून द्यावी लागते. आपले "घराणे" बदलावे लागते; आपला "बाप" नाकारावा लागतो व परक्याच्या घरातील मांडवावर आपली वंशवेल चढवावी व वाढवावी लागते. स्वतःच्या पडक्या वाड्यातील अंगणात, मोडक्यातोडक्या वाशांचा स्वतःचाच मांडव असणे ही कितीतरी भाग्याची गोष्ट असते. स्वतःच्या मालकीची जागा नसेल तर आजूबाजूला पडलेली मोकळी जागा मात्र ताब्यात घेणे आवश्यक ठरते. ती बळकावण्यासाठी थोडासा गुन्हा करावाच लागतो. एखादा नारायण सुर्वे सारस्वतांना उद्देशून अशा प्रकारचा गुन्हा करण्याची घोषणा करतो आणि मराठी साहित्याच्या परंपरेच्या मळवाटेवरून चालण्याचे अमान्य करून स्वतःची वेगळ्या वळणाची वाट धुंडाळतो. त्या वाटेवरच त्याला त्याचे "विद्यापीठ" सापडते. आणि त्या वाटेवरून त्याच्या जीवनाची "अक्षरयात्रा" आरंभ होते. त्याच्या त्या अक्षरयात्रेत तो ज्या कामगार वर्गात वाढलेला असतो तो कामगार वर्ग प्रतिकात्मक दृष्ट्या मोठ्या श्रद्धेने सामील होतो आणि आपल्या जीवनातील दुःखाचा कलात्मक आविष्कार

करतो. कामगार जीवनातला अनुभव मग ह्या कवीच्या शब्दांच्या शिंपल्यात स्वतःचा सांस्कृतिक आशय शोधतो. या शोधयात्रेत त्याला स्वतःची अस्मिता भेटते. आणि अशा प्रकारे ह्या कवीची अस्मिता ही सबंध कामगार वर्गाची अस्मिता बनते. एखाद्या व्यक्तीच्या जीवनाला समाजजीवनाचा आशय लाभतो तो अशा प्रकारे आणि त्या आशयाला वैश्विकता प्राप्त होते ती अशा प्रकारच्या अक्षर-आविष्कारामुळे.

गजमल माळींनी मराठी कवितेची पारंपरिक वाट प्रारंभकाळी तुडविलेली आहे. त्यांचा "गंधवेणा" (१९६१) हा पहिला काव्यसंग्रह वाचला म्हणजे आपल्या ते लक्षात येईल. मराठी साहित्याच्या परंपरेचा एक जीवनोत्सुक पायिक म्हणून त्यांनी स्वतःकडे व स्वतःच्या कवितेकडे पाहिलेले आहे. पण पुढे त्यांच्या असे प्रत्ययाला येते की, मराठी कवितेच्या बुब्बुळात त्यांच्या अस्मितेची प्रतिमा एकदाही तरळून गेलेली नाही. त्यांच्या कष्टकरी आईबापाचे दुःख मराठी कवितेच्या ओठांवर शब्दरूप धारण करून कधी विसावलेच नाही. तिच्या पापण्या बनलेल्या आहेत त्या केवळ मधुकणांनी ! सामान्यांच्या वेदनेत तिच्या पापण्या कधी भिजल्याच नाहीत. म्हणून कवी म्हणतो :

"मला नाही भेटली
माझ्या बापाची ही असहाय्य तीव्र वेदना
मराठी कवितेच्या वाहत्या प्रवाहातून.
मला नाही भेटलं
माझ्या आईचं दुःख सबंध सारस्वताच्या बागातून.
मला नाही भेटलं कोणीही रानात राबणारं
नाही फिरवलेत आपले मखमली हात
मराठी कवितेन
या वाळलेल्या रक्तहीन देहांवरून !"

मराठी कवितेच्या कक्षा समाजाच्या सर्व थरातील लोकांच्या जीवनक्षितिजापर्यंत जाऊन पोचल्या नाहीत ही वस्तुस्थिती मान्य करावीच लागेल. मध्यमवर्गीयांच्या व मुख्यतः उच्चवर्णीयांच्या उंबरठ्यावरचे माप बनण्याचेच भाग्य तिला आतापर्यंत लाभलेले आहे. तिने त्यांच्या जीवनात संस्कृतीची सुबत्ता आणावी हाच संकेत तिच्या अस्तित्वातून आतापर्यंत व्यक्त झालेला आहे. एका विशिष्ट आवर्तातच तिला नांदावे लागल्यामुळे बाहेरचे विराट जीवन तिच्या नजरेसमोर कधी आलेच नाही. येणार तरी कसे ? त्या आवर्तातून तिला बाहेर काढण्याचा प्रयत्न कुणीच केला नाही असेही म्हणता येत नाही. पण त्या प्रयत्नाला फारसे यश मिळाले नाही. आवर्तातील जीवन जगून काव्यरचना करणाऱ्यांना ते शक्यही नव्हते. वास्तविक मराठी कवितेला येथील पारंपरिक, सांस्कृतिक मूल्यांनी निर्माण केलेल्या आवर्ताला छेदून बाहेर पडता न आल्यामुळे तिला सामाजिक दृष्ट्या पुरेसे प्रक्षोभक होता आलेले नाही. तिच्यात व्यथा आणि वेदना, हतबलता व

विफलता आली पण पारंपरिक मूल्यांना आव्हान देणारी व सामाजिक परिवर्तन घडवून आणू शकणारी बंडखोरी मात्र आली नाही. सामाजिक बदल घडवण्यास इच्छूक असणारा स्वप्नाळूपणा तिच्यात आढळतो; पण स्वप्नाळूपणा उरी बाळगणाऱ्यांना सांस्कृतिक बदल घडवून आणता येत नाही हे सत्य आहे. स्वप्नाळूपणाला छाती वर काढून, वास्तवाला सामोरे जाता येत नाही. त्याचे पाय हे गोगलगायीचे पाय असतात. कठोर वास्तवाच्या काटेरी मार्गावर त्याला चालता येत नाही. वास्तवाशी संघर्ष केल्याशिवाय समाजपरिवर्तन कसे घडवून आणता येईल ? स्वप्नाळूपणाला वास्तवाचा स्वीकार करता आला असता तर तळागाळातील समाजजीवनाचे चित्रण मराठी कवितेत आले असते. मराठी कवितेतील चित्रण एका सीमित आवर्तात जगणाऱ्या मध्यमवर्गीयांच्या सामाजिक जीवनाचे चित्रण आहे. वास्तविक तिच्यात मध्यमवर्गीयांचेही खरेखुरे दुःख समर्थपणे व्यक्त झालेले नाही. मध्यमवर्गाने तरी आपल्या जीवनातील वास्तवाशी किती झुंज दिली आहे ?

ह्या आवर्ताबाहेरील उपेक्षित व बहिष्कृत, पीडित व शोषित समाजात जन्मलेल्या कवींनाच मराठी कवितेला वास्तवाच्या समोर आणून उभी करणे शक्य झाले असते. पण त्या समाजाला शब्दापासून वंचित ठेवल्यामुळे सरस्वतीच्या मंदिराच्या पहिल्या पायरीवरही बसण्याचा अधिकार मिळाला नाही. पण स्वातंत्र्योत्तर काळात उपलब्ध झालेल्या सार्वत्रिक शिक्षणाचा लाभ घेतलेल्या पिढीला मात्र मराठी कवितेला तिच्या सीमित सांस्कृतिक आवर्ताबाहेर आणण्याची जाणीव झाली. सामाजिक जाणिवांची अस्वस्थता ह्या पिढीच्या वाट्याला आल्यामुळे मराठी कवितेचे स्वरूप बदलण्याचा विचार तिच्या मनात आला. नारायण सुर्वे यांनी मराठी कविता गिरणी कामगारांच्या वस्तीत आणून तिथेच "सूर्यकुलाच्या" ध्वजाची प्रस्थापना केली. दलित कवींनी आज मराठी साहित्यातली अनेक शतकांची कोंडी फोडली आहे. मराठी कवितेच्या हातात त्यांनी त्यांच्या जीवनातील दुःखाने काठोकाठ भरलेला "मग"च दिला आहे. गावकुसाबाहेरील जग मराठी कवितेने यापूर्वी कधीच पाहिले नव्हते. ज्यांच्या घरांना कधी उंबरठेच लाभले नाहीत त्यांच्या घरांच्या दारातील ती आज "माप" बनून उभी आहे.

माळींची कविता ही उपेक्षित समाजाच्या तीव्र वेदनेची कविता आहे. ते स्वतः त्या समाजाच्या सुखदुःखाचे वारसदार आहेत. आपले दुःख भूतकाळाच्या अंधारात किती दिवस ठेवायचे ? आपल्या दुःखाची जाणीव ही कवीच्या आत्माविष्काराची सुरुवात असते असे म्हणतात. माळींनी हे दुःख उघड्या-नागड्या स्वरूपात, अतिशय तरल व प्रवाही समर्थ भाषेत आणि संवेदनशील ओल्याचिंब मनाने व्यक्त केले आहे.

"नागफणा आणि सूर्य" ही दीर्घ कविता अस्मितेच्या शोधात निघालेल्या कवीचे आत्मकथन करणारी कविता आहे. कवी हा एक दुःखयात्रिक आहे. He is a journeyman in sarrow. दुःखाचे गाठोडे पाठीवर बांधून डोळ्यात अश्रूंच्या ठिणग्या घेऊन, अनवाणी पायांनी गोदावरीच्या काठांचा आधार घेत घेत व तिच्या

वाहत्या पाण्याला वाट विचारीत विचारीत संतांच्या वाणीत न्हालेल्या मराठवाड्यात स्वतःचे आयुष्य काढण्यासाठी आलेल्या एका संवेदनाशील मनाच्या तरुणाची कहाणी सांगणारी ही कविता आहे. तीन भागात ही कहाणी विभागली आहे. शिवाय तिला एक प्रास्ताविक (Prologue) जोडले आहे. या प्रास्ताविकात कवी आपल्या ह्या दीर्घ कवितेचं मनोगत विषद करतो. तो आपल्या कहाणीचं मन व जीवन उसवून; उकलून दाखवायला आरंभ करतो :

> "ही कहाणी माझी,
> माझ्या नात्याची
> सांडलेल्या माझ्या उदास रक्ताची.
> पाषाणमयी शरीरातच
> शतकांपासून कोंडून पडलेल्या सुदीर्घ श्वासांची."

आणि अशी ही कहाणी आपल्या "ओल्या जखमा" अंगावर घेऊन गोदावरीच्या पलीकडील "उजाड वैराण माळरानावरून" मराठवाड्याच्या प्राचीन भूमीत येते. कवी या भूमीत अक्षरांच्या ओळीत स्वतःची अस्मिता निर्माण करण्यासाठी आलेला असतो. चार पुस्तकांचे ओझे डोक्यावर घेऊन तीस-एकतीस वर्षे परीटघडीचे जीवन तो येथे जगतो. तो मराठवाड्याचाच बनतो. आणि अनेक वर्षांपासून जपलेल्या त्याच्या ओल्या जखमा मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या प्रश्नामुळे, येथील दलितांवर झालेल्या अत्याचारांमुळे फुटतात. त्याची असह्य वेदना जागी होते. त्याला अगतिक जीवन जगलेल्या आपल्या आईबापाची आठवण होते. आणि हीच वेदना दलितांशी नाते जोडण्यास त्याला अंतःप्रेरणा देते. तो आपली भाग्यरेषा शोषितांच्या ललाटावर उमटलेल्या दारुण वेदनेत शोधतो.

कवितेच्या पहिल्या भागात कवीने आपल्या शेतकरी कुटुंबाचे चित्र रेखाटले आहे; आणि त्या अनुषंगाने एका पीडित व दरिद्री शेतकरी कुटुंबाचे प्रातिनिधिक रेखीव चित्र अतिशय प्रभावी व घणाघाती शब्दातून उभे केले आहे. त्याने आपल्या आईबापाच्या जीवनातील स्वप्न व वास्तव, श्रद्धा व वैफल्य आणि आकांक्षा व उद्ध्वस्तता अगदी प्रत्ययकारी, हृदयाला भिडणाऱ्या शब्दातून व्यक्त केली आहे. कवीला आपला बाप पहाडाच्या पायथ्याशी असलेला त्याच्या "हृदयाचा तुकडा" नांगरताना, ग्रीष्माच्या ज्वालेत जळताना, काळ्या मातीत घाम व रक्त सांडतांना व "ओल्या दुःखात" न्हाताना अनेकदा दिसतो. जमिनीच्या मशागतीतच त्याचे सर्व आयुष्य गेलेले असते. जोंधळ्याच्या ताटातून उभं राहिलेलं "स्वप्नांचं इंद्रधनुष्य" त्यानं कितीदा तरी पाहिलेलं असतं व आयुष्याच्या पलीकडील वाटेवर आपल्या जीवनाचा अर्थ त्याने कितीदा तरी शोधलेला असतो. रित्या पोटी त्याला रात्रंदिवस कष्ट उपसावे लागतात. रानातील काट्या तोडताना कुऱ्हाडीचे व कुदळीचे घाव कधी कधी त्याच्या स्वप्नांवरच पडतात. तो निष्काम

कर्मयोगीच बनलेला असतो. दुःख व नैराश्याचे घाव अंगावर पडत असताना तो ज्ञानेश्वरांच्या ओव्यात व तुकारामांच्या अभंगातच बहुधा झिंगलेला असायचा. त्याच्या डोळ्यात दुपारच्या उन्हात जळणारी वाट नागाची फणा होऊन अनेकदा उतरायची. त्याचा उभा संसार उन्हात जळायचा, पण जमीनीच्या तुकड्यावरची त्याची माया कधी आटायची नाही. त्या तुकड्यावर त्याचाही बाप "असाच" जन्मभर राबला होता व हाच तुकडा पुढे आपल्या मुलालाही भाकरी देणार याची त्याला पुरेपुर खात्री होती.

कवीच्या बापाच्या आयुष्यातील किती तरी वर्षे अशा प्रकारचे कष्ट उपसण्यात जातात. आभाळातील वाटांवर डोळे खिळवून जगताना किती तरी पावसाळे त्याच्या आयुष्यात कोरडेपणा मागे ठेवून गेलेले असतात. दुष्काळाच्या काठावर बसून तुकोबाच्या वाणीशिवाय त्याने दुसरे काहीच ऐकलेले नसते. चांदण्यात वरवर सरकणारी दारातील निंबाची साऊली अंगावर ओढून घेऊन कुशीतील आपल्या मुलाला ऊब देण्याचा त्याने कितीदा तरी प्रयत्न केलेला असतो. वेदनेच्या प्रदेशात फिरताना, वाहत्या जखमांवर हळूच हात फिरविताना, त्याने डोळयाआड्न जीवनातील कितीतरी "ओल्या" गोष्टी आपल्या मुलाला सांगितलेल्या असतात. हा आशय व्यक्त करणाऱ्या माळींच्या कवितेतील ओळी आपल्या हृदयालाही भाजून काढतात; अस्वस्थ करतात.

कवीचा बाप "कष्टयोगी" तर त्याची माय दुःखभोगी असते. तिच्या पुढेही दारिद्र्य आपली फणा काढून सतत उभे असते. तिचा विषारी दंश सहन करीत करीतच ती आपले जीवन जगते. अंगाची लाहीलाही करणारे क्रूर ऊन डोक्यावर घेऊनच तिला शेतातील धसकटं वेचावी लागतात. शेतातील बाभळीच्या पिवळ्या फुलात संध्याकाळ उतरली की बांधावरच्या काटक्या वेचून तिला घराच्या चुलीची व्यवस्था करावी लागते. अंगावर फाटक्या चिंध्या; त्यांना गाठी किती मारायच्या व लज्जा किती झाकायची ! तशात उपवर झालेल्या लेकीच्या लग्नाची चिंता तिचं मन पोखरण्याच्या कामाला लागलेली. पण शेतातील पीक स्वप्न होऊन तिच्या डोळयात उतरते. आता सर्व प्रश्न सुटतील अशा वेड्या आशेवर ती जगते. तिच्या आयुष्यातील किती तरी स्वप्नं आकाशातील नक्षत्रांशी भिडलेली असतात. तिफण हाकणाऱ्या नवऱ्यामागे उभे राहून ओटीतल्या "मोहरा" तिने आपल्या काळ्या वावरात पेरलेल्या असतात. खाण्यासाठी घरी दाणाही नसतो; पण हे शेत मोत्यांची रास पिकवील ही तिची भोळी आशा असते :

"बोटामधून धान्य गळे
डोळयामधून आसू
आता येईल पीक नवं
ओठावरती हासू"

पाठीवर बाळ बांधून व डोक्यावर लाकडाची मोळी घेऊन घरी जात असतानाही तिचे स्वप्न आकाशातील पक्षांच्या थव्याबरोबर भरारते. पण आपल्या शेतात स्वप्नं पेरली

आहेत का दुःखस्वप्नं हे नियती तिला कळू देत नाही.

माळींनी आपल्या आईबापाचं दुःख अतिशय संवेदनशील मनान टिपलेलं आहे. कारण ते "त्यांचं" दुःख आहे. आपल्या आईबापाच्या जीवनात त्यांना आढळलेलं हें एकमेव शाश्वत सत्य आहे! आपल्या छोट्याशा वावरात घाम गाळलेल्या बापाच्या हाती दारिद्र्याशिवाय दुसरे काहीच लागत नाही. माळींनी रेखाटलेला बाप पर्लबकच्या The Good Earth या कादंबरीतील वँग लँग (Wang lang) या चिनी शेतकऱ्याची आठवण करून देतो. त्याची आई दुःखाला सामोरे जाते पण जीवनातला आशावाद सोडीत नाही. "Hitch your wagon to the star" असे म्हणणाऱ्या इमर्सनचा आशावाद ह्या शेतकरी कुटुंबात सापडतो. येथील चित्रण इतके प्रभावी व सार्वत्रिकस्पर्शी असलेले उतरले आहे की, शेतकरी कुटुंबात जन्मलेला माझ्यासारखा माणूस यातून आपल्याच जीवनाचा आलेख शोधतो.

कवितेच्या दुसऱ्या भागात कवी मराठवाड्याचं प्राचीन वैभव; त्याचा सांस्कृतिक वारसा, त्याचा विकास व ऱ्हास आणि सध्याची मानसिकता यांचा शोध घेतो. त्याच्या खऱ्या व खोट्या अस्मितेवर भाष्य करतो. या प्राचीन प्रदेशाचं वैभव पाषाणात कोरलेल्या लेण्यातून, संतांनी निर्मिलेल्या साहित्यातून व गोदेच्या पाण्यातून खळाळलेल्या त्याच्या इतिहासातून व्यक्त झालेलं आहे. एकेकाळी मराठवाड्याच्या अस्मितेने येथील ऐश्वर्याची पैठणी नेसून, ज्ञानेश्वराची ओवी ओठांवर तोलून, अजिंठ्यांच्या लेण्यातील बोधिसत्वाच्या हातातील कमळपुष्प आपल्या हातात धारण करून, वेरूळच्या कैलास मंदिराच्या शिखरावर उभे ठाकून, संबंध जगाकडे करुणेच्या डोळ्यांनी पाहिले होते. या अस्मितेच्या वैभवाला थेट इजिप्तपर्यंत जाऊन पोचण्यासाठी समृद्ध वाट सापडली होती. मराठवाड्याचं मन या अस्मितेमुळे पुलकित झालेलं होतं. कवी सांगतो :

"झिरपत होती येथील अस्मिता  
मातीच्या कणाकणातून,  
भव्यतेची होती तीवर झाक  
होती येथील अस्मिता विशाल,  
प्रदेशाची नातीं ओलांडून विश्वकुळाशी बांधलेली."

पण पुढे मोंगली आक्रमणाने मराठवाड्याच्या अस्मितेला अपमानित केले. नंतर तिला प्रदीर्घ काळपर्यंत निजामी राजवटीत बंदिनीचे जीवन कंठावे लागले. तिच्या भौतिक ऐश्वर्याची पैठणीही फाटली व तिला आध्यात्मिक ऊब देणारी पासोडीही जीर्ण झाली. मराठवाडा दुःस्वप्नात सापडला. तरी पण पाणावलेल्या त्याच्या डोळ्यात स्वातंत्र्याचे स्वप्न सातत्याने तरळत राहिले. आणि ते साकारले १९४८ साली. त्यासाठी मराठवाड्याला फार मोठा संघर्ष करावा लागला ही गोष्ट खरी आहे. स्वातंत्र्य मिळाल्या-नंतर त्याची "अस्मिता" पुन्हा एकदा स्वतःला सावरून उभी राहिली. मराठवाड्याच्या

पदरात इतिहासाने "मागासलेपण" टाकल्यामुळे त्याचे मन काहीशा न्यूनगंडाने पछाडले. महाराष्ट्रात बिनशर्त विलिन होऊनही त्याला आपले "एकाकीपण" (alienation) टाकता आले नाही. त्याच्या एकाकीपणाला आर्थिक कारणंही फार मोठ्या प्रमाणात जबाबदार आहेत हे लक्षात घेणं आवश्यक आहे. इतिहासाने मराठवाड्याला एक निराळेपणही दिलेलं आहे. आणि त्याच्या या निराळेपणाला सरंजामी मानसिकतेनेही खूप जपलेलं आहे हे विसरून चालणार नाही. मराठवाड्याच्या मानसिकतेमध्ये जातीय अहंतेचाही परिपोष मोठ्या प्रमाणात झाला आहे. ह्या मानसिकतेचे कवच फोडून मराठवाड्याला बाहेर पडताच आले नाही ही वस्तुस्थिती आहे. सामाजिक प्रबोधनाचा जागरही येथे कुणी घातला नाही. मराठवाड्याचे मन एकसंध सांधण्यासाठी त्याला प्रभावी नेतृत्वही मिळू शकले नाही. निजामी राजवटीच्या मध्ययुगीन वातावरणातून तो एकदम लोकशाहीच्या प्रांगणात आला. मध्ययुगीन मन मात्र त्याला मागे ठेवता आलं नाही.

मराठवाड्याची स्वतःची वेगळी अशी प्रादेशिक पृथगात्मता आहे हे कबूल. त्याच्या अस्मितेने या पृथगात्मतेतून एक निराळा सांस्कृतिक आशय घेतला हेही निर्विवाद. पण ती भूतकाळाकडे तोंड करून वर्तमान काळाच्या पाठीवर उभी आहे. तिच्या भूतकाळावर येथील दलितांना अधिकार सांगता येत नाही आणि तिच्या पायाखालची वर्तमान काळाची वाटही त्यांच्यासाठी मोकळी करून मिळत नाही. एखाद्या समाजाला भूतकाळावर जेव्हा हक्क सांगता येत नाही तेव्हा त्याला वर्तमान काळाचा तरी भागीदार बनण्याचा अधिकार दिला पाहिजे. पण हे सहजासहजी घडायचे कसे ? दलित समाजालाही आपल्या अस्मितेच्या काही ठळक खुणा निर्माण कराव्यात असे वाटते. निदान एखाद्या संस्थेला आपल्या नेत्याचे नाव तरी द्यावे असे त्याला स्वाभाविकपणे वाटते. पण तसे करणे हे प्रस्थापितांना आपला घोर अपमान वाटतो. ते आपल्या अस्मितेला गतिशील सर्वस्पर्शी व सर्वसमावेशक होऊ देण्यास तयार नसतात. They are sleepwalkers going into the past, in hallucination, in search of their lost glory. खोट्या अभिनिवेशातून त्यांचा अभिमान उफाळून अशा प्रसंगी वर येतो. संदर्भ बदलून मग ते इतिहासाचा अर्थ लावतात. संदर्भ बदलेल्या शब्दांना सत्य सांगता येत नाही; त्यांना अर्थ सापडत नाही. ज्या वेळेस एखादा प्रस्थापित समाज ही "आमची अस्मिता" आहे असं म्हणतो तेव्हा "आमची अस्मिता" ही काहींचीच अस्मिता असते. एखाद्या प्रदेशाची अस्मिता ही त्या प्रदेशातील सर्व जाती-धर्मांच्या लोकांची अस्मिता व्हायची असेल तर ती सर्वांच्या सहभागातून, सहभावातून व सहकार्यातून विकास पावली पाहिजे. मराठवाड्याच्याच काय पण भारताच्या एकंदर अस्मितेत येथील दलितांचा काय वाटा आहे ? अस्मिता ही सर्वांची समायिक संपत्ती (Mutual Estate) असावी लागते. भूतकाळात ती तशी नव्हती; पण आता तिला केवळ एखाद्या वर्गाचीच मालमत्ता राहून चालणार नाही.

लोकशाहीला हे मंजूर नाही.

प्रस्थापितांची अस्मिता कशी असते याची कल्पना माळींनी अतिशय आशयगर्भ शब्दात सांगितली आहे. कवी म्हणतो :

"अस्मिता असते हिमनगासारखी
भूतकाळात सबंध बुडालेली,
वर असतात तिचीं चिमूटभर बोचरीं टोकं
नवा संघर्ष उभा करणारी.

□ □ □

अस्मिता असते एक सुखी डाळिंब
रत्नजडित,
सुवर्णाच्या पात्रात ठेवलेलं
राजवशी पुरातन पाखरांच्या गुलजार चोचीत विरघळणारं"

सरंजामदारांची अस्मिता दुर्बलांच्या "हलत्या" प्रेतावरून चालते. बुटांचे पाशवी आवाज करीत सभोवतालच्या वातावरणात भयाचे राज्य निर्माण करीत करीत ती पुढे जाते. वास्तविक अस्मितेच्या डोळ्यात सबंध "सहिष्णु आभाळ" उतरावं असं कवीला वाटतं. तो म्हणतो :

"अस्मिता असावी व्यापक जीवनमूल्यातून
घडलेली,
ती असावी
सारंच झुलतं आभाळ कवेत घेणारी !"

पण अशा प्रकारची "अस्मिता" आणायची कोठून ? निर्माण करावयाची कशी ? या प्रश्नांची उत्तरे सहजासहजी सापडणे कठीण. वास्तविक जे प्रस्थापित अस्मितेवर अधिकार सांगतात ती अस्मिता दलितांच्या घाम, रक्त व अश्रुतून निर्माण झालेली असते. कुठल्याही देशाचा इतिहास त्या देशातील दलितांनी व शोषितांनीच घडवलेला असतो. पण तोच इतिहास एखादे पृष्ठही दलितांच्यासाठी राखून ठेवीत नाही. इतिहासाच्या पृष्ठावर "राखीव जागा" दलितांना देण्यासाठी प्रस्थापितांचा सततच विरोध राहात आला आहे, राहणार हे सांगण्याची गरजच नाही.

इतिहासाच्या संदर्भात कवीने वाचकांना अस्वस्थ करणारे, अंतर्मुख करणारे अनेक प्रश्न विचारले आहेत. गोवर्धन पर्वत उचलणारे हात, सुवेजचा कालवा खोदणारे हात, चीनची प्रचंड भिंत बांधणारे हात, खजुराहोचे शिल्प व अजिंठावेरूळच्या लेण्या पाषाणाच्या छातीवर कोरणारे हात—हे सर्व कोणाचे हात होते ? ते दुर्बल व श्रमिकांचेच हात होते. इतिहास निर्मितीच्या संदर्भात माळींनी विचारलेले प्रश्न वाचकांना

Bertold Brecht च्या "Questions of a Studious Working Man" या कवितेची आठवण करून देतात. हा कवीही असेच जीवघेणे प्रश्न विचारतो :

"Who built Thebes of the seven gates ?
In the books you will find the names of kings.
Was if the kings who hauled chunks of rock to the place ?
And Babylon, many times demelished,
Who raised it up again so many times? In what houses
of gold-glittering Lima did the builders live ?"

सामान्य लोकांना घेऊनच शिवाजी महाराजांनी दुर्बलांच्या स्वराज्याची प्रस्थापना केली. त्यावेळी प्रस्थापित वर्ग मुसलमान राजांनी दिलेल्या उष्टावळीत आपली 'अस्मिता' शोधीत होता. त्यांना उद्देशून कवी म्हणतो :

"तेव्हा राहिलात किती लांब
वंशाची अस्मिता सांभाळीत.
तेव्हाही घडविलेत अभिषेक दुर्बलांनीच
आपल्या दुर्दम्य ताकदीन.
आज झालात वारसदार,
भगव्या गंधाचा टिळा लावून, कालचक्र
बदललेलं पाहून......"

जातीयवाद्यांवर हा कवी अगदी त्वेषाने तुटून पडतो. कारण त्यांनीच या समाजात जातीजातीचे तट उभे केले आहेत. त्यांनीच दुर्बलांना शतकानुशतकापासून बहिष्कृत जीवन जगण्यास भाग पाडले आहे. या देशात आसवांच्या नद्या वाहिल्या, पण गरिबांचं दुःख मात्र त्यातून वाहून जाऊ शकलं नाही. या देशातील श्रीमंती गरिबांना पायाखाली चिरडून वाढत गेलेली आहे. धर्म, स्वातंत्र्य आणि राष्ट्रप्रेम याची सूक्ते रचण्यासाठी व गाण्यासाठी प्रस्थापित तयारच असतात. येथे गरिबांना मात्र स्वातंत्र्य आहे केवळ आपले दारिद्र्य सांभाळण्याचे व दुःख कुरवाळण्याचे. या देशाच्या संस्कृतीने त्यांना दिलेलं एकच शाश्वत सत्य आहे आणि ते म्हणजे—"दुखाचिया डोहीं; मरणाचे डोहाळे!" वेदनेचे उकळते कढ मनात साठवून कवी विचारतो :

"सुकून गेले काय या देशातील
सप्तनद्यांच्या काठी पिकलेले
सहिष्णुतेचे मळे ?
थांबली काय गंगेच्या काठावरील
करुणेची हाक ?"

कबीराच्या दोह्यातील करुणेचे स्पंदन, फुल्यांच्या विचारातील दाहकता, शाहूंच्या धिप्पाड छातीतील कळवळा व गांधींच्या शिकवणुकीतील सत्य-अहिंसा या सर्व गोष्टी कुठे लोप पावल्या असा सवाल हा कवी विचारतो. पण हे असं किती दिवस चालणार ? संघर्षाचा डोंब घेऊन एक दिवस या देशात उजाडणारच याची कवी ग्वाही देतो.

कवितेच्या तिसऱ्या भागात मराठवाड्यात विद्यापीठाच्या नामांतराच्या प्रश्नावरून दलितांवर घडलेल्या अत्याचारांचं वर्णन आहे. दलितांचा गुन्हा तरी कोणता ? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं नाव मराठवाडा विद्यापीठाला द्यावं ही त्यांची आर्जवी मागणी. आपल्या अस्मितेचं एखादं प्रतीक आपल्या डोळ्यांसमोर कुठेतरी असावं एवढीच त्यांची आपसुख इच्छा ! पण येथील तथाकथित वतनदारांना ते कसे पटणार. येथील माथेफिरूंनी आतापर्यंत कितीतरी महामानव व प्रेषित माती आड ढकलले आहेत. महापुरुष हे काळाचे आवरण फोडून या जगात अवतरलेले असतात, नियतीलाही आपल्या जीवनसंघर्षात गुंतवतात व आपल्या युगंधर ओंजळीतून सामान्य जनाला अमृत पाजून सबंध मानवजातीशी नाते जोडतात. अशा महापुरुषांमुळेच उन्हाच्या फांद्यांनाही स्वप्नं लगडत असतात, पण ही स्वप्नं निर्दयपणे खुडली जातात; असे अनेकदा या भूमीत घडले आहे. या देशातील धर्ममार्तंडांनीच अशा कृत्यांना तात्त्विक आधार दिलेला असतो. धर्माने एखाद्या समाजाचे किंवा जातीचे वंशश्रेष्ठत्व मान्य केले की झाले. मग तो समाज शोषणाच्या सर्व वाटा धुंडाळतो. वंशश्रेष्ठत्व हे आज कालविसंगत झालं आहे असं कंठरवाने सांगितलं जातं. पण वस्तुस्थिती अशी असते की ढासळलेल्या बुरूजांच्या मातीखाली आजही गावागावातून जातीय अभिमान दडून बसलेला असतो. येथे जातींच्या प्राचीन तटातटातून सुरूंग पेरलेले असतात. ते सुरूंग ठिणगीच्या शोधात ताटकळत बसलेले असतात. मराठी संतांच्या भूमीत अशाच एका सुरूंगाचा स्फोट झाला आणि त्यात जळून खाक झाली येथील मानवता !

कवी दुःखालाच आपल्या बरोबर घेऊन उद्ध्वस्त झालेल्या दलितांच्या वस्त्यावस्त्यातून फिरतो. त्याचा प्रवास हा "Waste Land" मधला प्रवास असतो. त्याला प्रलयकाळाचे भेसूर दर्शन होते. वेदनेचा थरथरता काळोख व खोल दीर्घ किंकाळ्या यांचीच त्याला पावलोपावली भेट होते. या काळोखातून कण्हणारे दुःख घेऊन उजाड माळरानावर मोडून पडलेली उद्ध्वस्त माणसं तो पाहतो. त्यांच्यासाठी आपण काही करू शकलो नाही या जाणिवेने तो हळहळतो. जातीय मग्रूरांच्या अत्याचारांनी मोडलेल्या गावकुसाबाहेरच्या झोपड्या तो सुन्न मनाने पाहतो. अमानुषतेचा पूर्णाविष्कारच येथे झालेला असतो. दलितांचे सर्व अस्तित्वच खुडलेले असते. आधारापुरती जागाही त्यांची स्वतःची नसते; नव्हे निसर्गातून लाभणारी स्वाभाविकताही त्यांना नाकारली जाते. कवी तीव्र शब्दात सांगतो—

आहे हा देश त्यांचा  
वृक्ष त्यांचे

नद्या त्यांच्या
वारा त्यांचा
प्रकाशावरील हक्कही त्यांचा.”

सरंजामदारांची आंधळी ताकद जेती ठरते. दुर्बलांचे निर्माल्य पाहण्यासाठीच ती आसुसलेली असते. स्मशान शांततेत या भूमीवर उभीआडवी पसरलेली अमानुषतेची भेसूर सावली पाहून कवी विमनस्क होतो. आक्रमकांच्यापासून पळून जाताना एका दलित अबलेचा पदर काटेरी कुंपणात अडकला, ती बलात्काराला बळी पडली, आणि शेवटी अंतिम संघर्षानंतर तिने आतापर्यंत जपलेला आपला देह जवळच्या नाल्याच्या पात्रात टाकून दिला. दुसरी एक तरुण आई छातीवर आपले मूल घेऊन रात्रेत कोसळलेली कवीच्या दृष्टीस पडते. आक्रोशाशिवाय प्रतिकार करण्याचे दुसरे कोणतेही साधन या दलित अबलांच्या जवळ नसते. समाजाच्या रक्तातील सूर्यच मावळून गेल्यामुळे दलितांच्या मदतीला कोणी धावूनही जात नाही. कवीने रेखाटलेली ही शब्दचित्रे मन कासावीस करतात. जिवंत सळसळतं रक्तच या ओळींमधून खळखळ वाहत असतं.

वादळ आले नि वादळ गेले—पण सर्व काही उद्‌ध्वस्त करून गेले ! या वादळातून वाचले ते माळरानावर उभे असलेले बाभळीचे एक जुनाट झाड. क्षितिजावर बरेचसे कललेल्या त्या म्हाताऱ्या झाडाचा हिरवा शेंडा मात्र भविष्यात डोळे लावून सातत्याने उभा होता. दलितांवर झालेल्या अत्याचारांची जगाला साक्ष देण्यासाठीच जणू हे बाभळीचे झाड अंगात प्राण साठवून उभे होते. पण हा पुरावा तरी का म्हणून शिल्लक ठेवायचा ? आक्रमक जमावाने हे झाडच पेटवून दिले. शिल्लक राहिले ते त्याचे अर्धवट जळालेले खोड. क्षितिजाशी संघर्ष करण्याच्या उर्मीने ते जमिनीत खिळून राहिले—उगवत्या सूर्याला डोक्यावर खेचण्याच्या ईर्षेने !

बाभळीच्या या अर्धवट जळालेल्या खोडाद्वारे कवीने संघर्षाचा एक फार मोठा आशय व्यक्त केला आहे. हा अमानुष संघर्ष शेवटी कोणत्या दिशेत आणि कोणत्या वाटा धुंडाळणार आहे याची कल्पना करणे कठीण आहे. फुले–शाहूंच्याकडे घेऊन जाणाऱ्या सर्व वाटा बुजवण्याचे पापकर्मच हा आंधळा समाज आज करतो आहे. शतकानुशतकाच्या आंधळ्या परंपरांना घेऊनच मानवकुळाकडे समाज जात आहे हे भयानक सत्य कवी पेटलेल्या शब्दात मांडतो.

या प्राचीन भूमीत दलितांवर हा अमानुष हिंसाचार का घडला ? तो घडला एका महापुरुषाच्या नावाला विरोध करण्यासाठी. पण ते नाव काळालाही मिटवता येणार नाही. उलट काळानेच आता ते नाव आपल्या छातीवर धारण केले आहे. दलितांच्या बराबरात त्या नावाने प्रकाश आणलेला आहे. त्या संघर्षपुरुषामुळेच नव्या शब्दांनीही आता नवा जन्म घेतला आहे. दलितसमाज यापुढे नागासारखा फणा काढून चालणार आहे. त्याच्या मस्तकावरील मण्यातून फुटणारा प्रकाश दुर्बलांच्या बराबरात

तळपते सूर्य पेटवणार आहे. त्या फण्यावर अन्यायी काठ्या उगारल्या तरी तो मुळीच भिणार नाही. निर्भयपणे तो काळप्रदेशातून सळसळत पुढे जाणार आहे. उद्याच्या संघर्षाची वाट या नागाच्या पाठीवरूनच जाणार आहे. आणि नेमके हे सांगण्यासाठीच आंबेडकर नावाचा तो महापुरुष या देशातील एका मातीच्या घरात जन्माला आला होता. आणि त्या महापुरुषाच्या संघर्षमय विचारातील सूर्य दलित समाजाच्या मस्तकावरील मण्याला सातत्याने प्रकाश पुरविणार आहे. नव्हे त्या मण्यावरच उगवता नवा सूर्य घडविला गेला आहे. कसल्याही प्रकारचा अपरिहार्य अंधार घेऊन पुढे जाण्यासाठी लागणारा प्रकाश त्याने दलितांच्या व दुर्बलांच्या हातात दिला आहे.

कवीलाही "ह्या" सूर्याच्या किरणांचं दान मिळालं आहे. गंगेच्या पात्रात उभा राहून हा कवी ह्या सूर्यालाच आपल्या प्राणांचं अर्घ्य देतो. तो प्रकाशमान तथागत भिक्षापात्र घेऊन धर्मभूमीवर उतरतो. त्याच्या झोळीत कवी आपले प्राण टाकतो. तथागताच्या डोळयात करुणा उतरलेली असते, शब्दात प्रज्ञा तरारलेली असते आणि पापण्यांवर कमळदळे वाकलेली असतात. या उद्ध्वस्त प्रदेशातून त्याची नजर चौफेर फिरते. दुर्बलांच्या वेदनेचे नवीन पर्व आरंभलेले त्याला प्रकर्षाने दिसते—जाणवते. त्या महापुरुषाच्या (आंबेडकरांच्या) सान्निध्यात कवी आपला गलितगात्र देह संघर्षाने पेटवून घेतो. आकाशातील निळे दिवे आपल्या वाहत्या रक्तात उधळून देतो; स्वतःलाच सर्वार्थानं झोकून देतो.

माळींची "नागफणा आणि सूर्य" ही कविता एका फार मोठ्या सामाजिक "क्राइसिस" मध्ये जन्मलेली कविता आहे. हा क्राइसिस कवीने समर्थ व निर्भय शब्दात व्यक्त केला आहे. विशेषतः मराठवाड्याच्या सामाजिक जीवनातल्या एका विदारक "क्राइसिस"च्या पार्श्वभूमीवर आशयबद्ध झालेली ही कविता आहे. पण हा केवळ मराठवाड्याच्या जीवनातला "क्राइसिस" मानता येणार नाही; तो स्वातंत्र्योत्तर काळातील अखिल भारताच्या समाजजीवनातलाच एक अतिशय मोठा "क्राइसिस" आहे असे मला वाटते. कोणताही "क्राइसिस" गतकाळात धुमसण्याऱ्या सामाजिक संघर्षाचा परिपाक असतो आणि त्याच बरोबर भविष्यात पेटणाऱ्या संघर्षाचा संकेतही असतो. सामाजिक जीवनातला अशा प्रकारचा "क्राइसिस" हा इतिहासाला विवस्त्र करून "क्रासरोडस्" वर उभा करीत असतो. आणि मग तो समोरच्या चारीही रस्त्यांना साक्षी ठेवून त्याच्या विवेकबुद्धीला (Conscience) क्रुसावर चढवितो आणि या ठिकाणी इतिहासाला आपले बरेचसे रक्त सांडावे लागते. पुढे कोणता रस्ता पायाखाली धरावा हे काही काळ तरी त्याच्या विवेकबुद्धीला सुचत नाही. पुढचा प्रवास खांद्यावर क्रूस घेऊनच त्याला करावा लागतो. त्या वाटचालीत रक्त ठिबकण्याचे पूर्णपणे थांबेल याची शाश्वती नसते. भारताच्या सामाजिक इतिहासात एका फार मोठ्या संघर्षपर्वाला आरंभ झाला आहे यात शंका नाही. माळींनी या कवितेत या गोष्टीचा सूचक संकेत दोन-तीनदा दिलेला आहे. कालबाह्य संस्कृतीच्या तटबंदीतून दगड

कोसळताना त्यांना दिसतो; उद्याच्या क्रांतीचे रक्तथेंबही त्यांना दिसतात. युद्धरेषेवर ताठ उभी ठाकलेली माणसं त्यांना दिसतात; आणि एका निष्पर्ण बाभळीवर त्यांनी युगायुगापासून लपविलेली जळती शस्त्रेही त्यांच्या दृष्टीतून सुटत नाहीत. या भूमीत सर्वत्र आग पसरलेली त्यांना दिसते. माणसाला व्यथित करणारे हे चित्र आहे. कवी हा क्रांतदर्शी असतो असे म्हटले जाते यात बराच तथ्यांश आहे. हे अशा प्रकारची कविता वाचल्याने पुढच्या पिढीतील वाचकांच्या प्रत्ययाला येऊ शकेल. माळींच्या कवितेतील या ओळी आवेशी, ओजस्वी भाषेत उतरल्या असल्या तरी त्यातील तरल काव्यात्मता ढळलेली नाही हे फार मोठे यश त्यांनी मिळविले आहे. याचे कारण गजमल माळींची ही दीर्घ कविता वेदनेच्या पोटातून बाहेर पडलेली कविता आहे. "स्वांतःसुखाय" लिहिलेली ही कविता नव्हे, हे तिच्या प्रत्येक ओळीतून सातत्याने जाणवत राहते. मानवी वेदनेचे प्रामाणिक व श्रद्धाशील डोहाळे लागल्याशिवाय अशा प्रकारची श्रेष्ठ कविता जन्माला घालता येत नाही. आणि म्हणूनच तिच्या निर्मितीचा उद्देश रसिकांना आनंदाच्या हिंदोळ्यावर बसवून झुलविण्याचा असू शकत नाही. जीवनातील भयानक वास्तवातून अर्थ शोधण्याच्या उद्दिष्टासाठीच प्राधान्याने तिचा आविष्कार झालेला असतो. स्वतः माळींनीच या कवितेत या उद्दिष्टाचा संकेत दिलेला आहे. उलट हे उद्दिष्ट पेलण्याचे सामर्थ्य आपल्या शब्दांमध्ये यावे अशी त्यांची धडपड आहे. मराठी कवितेच्या लफ्फेदार पैठणीला वेदनेचा पदर असावा असे त्यांना प्रामाणिकपणे वाटते. सामाजिक वेदनेत मोहरलेली ही कविता आत्ममग्न चिंतन व्यक्त करते, सारा आशयच शोकमग्न चिंतनाचा अपरिहार्य घटक बनतो.

माळींना ज्या वेदनेच्या कळा सोसाव्या लागतात त्या त्यांना करुणेकडे खेचतात. ह्या वेदना त्यांच्या स्वतःच्या जीवनातल्याही आहेत आणि ज्या विराट समाजात ते जन्मले व वाढले त्या समाजाच्या—नव्हे निर्विवादपणे सर्वंकष समाजाच्याच त्या वेदना आहेत. पण ह्या वेदना त्यांना विद्रोहाकडे खेचीत नाहीत. म्हणून त्यांची ही कविता "विद्रोही" कविता नाही. माळींची हीच कविता नामदेव ढसाळ किंवा यशवंत मनोहर यांनी लिहिली असती तर तिचे स्वरूप फारच वेगळे राहिले असते. वास्तविक कविता ज्याची त्यांनीच लिहावयाची असते, याची मला जाणीव आहे. पण मला काय अभिप्रेत आहे याची वाचकांना कल्पना येऊ शकेल. माळींची कविता ही त्वेषाने मूठ आवळणारी कविता नाही. पण करुणा आणि विद्रोह या दोन्हींचाही जन्म वेदनेच्या पोटीच होत असतो हेही आपण लक्षात ठेवले पाहिजे. करुणा आणि विद्रोह मानवता या संकल्पनेचे परस्परांना पूरक असे दोन आयाम आहेत. "मानवता" हेच मानवी समाजाचे अंतिम मूल्य असते. शरच्चंद्र मुक्तिबोधांनी "सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य" या त्यांच्या ग्रंथात "मानवता" या मूल्याचे अतिशय मर्मग्राही विवेकी विवेचन केले आहे. "मानवता" हे सामाजिक मानवी जीवनाचे आंतरिक सत्त्व (essence) आहे. मानवी समाजात ज्या मूल्यांना आपण शाश्वत मूल्ये म्हणून

ओळखतो त्या मूल्यातूनच "मानवता" साकारते. आणि ती शाश्वत मूल्ये मानवतेच्या भक्कम अधिष्ठानावर उभी असतात. माणसाला आपल्या अस्तित्वासाठी (existence) सामाजिक द्वंद्वातून वाटा काढाव्या लागतात. निसर्गाशीही द्वैत साधून त्याला आपले अस्तित्व टिकवावे लागते. त्याला ज्या वाटा सापडतात त्यांना अंतिमतः "मानवते"-पर्यंत पोचवावयाचे असते. त्या वाटा ज्या प्रदेशातून पुढे जातात त्या प्रदेशात सामाजिक मूल्यव्यूह रचलेले असतात. त्यांना घेऊनच त्यांना पुढे जावे लागते. माणसाच्या अस्तित्वाला ज्या ज्या ठिकाणी विरोध होईल त्या त्या ठिकाणी सामाजिक द्वंद्वाला जाणीवपूर्वक विद्रोहाचे स्वरूप देणेही अपरिहार्य ठरते. माणसाचा विद्रोह त्याच्या सामाजिक अस्तित्वासाठीही असतो आणि मूल्यधारणेसाठीही असतो. विद्रोह हा अमानुषतेविरुद्ध असतो, पण तो पेटवला जातो तो अमानुषतेला बळी पडलेल्या पीडित माणसांसाठी व त्यांच्या शोषित विराट समाजासाठी. या विद्रोहाच्या तळाशी पीडित माणसांसाठी व समाजासाठी जपलेली मानवी सगुण करुणा असते. या विद्रोहालाही शेवटी "शाश्वत मानवता" गाठावयाची असते. तिकडेच या वाटांची वळणे असतात.

एखादा माणूस ज्या समाजात किंवा संस्कृतीत राहतो त्या समाजात किंवा संस्कृतीत स्वातंत्र्य, समता, बंधुभाव व न्याय यासारख्या शाश्वत मूल्यांचा आविष्कार किती प्रमाणात झालेला आहे यांच्यावर त्याच्या संघर्षाचे स्वरूप व त्याची तीव्रता अवलंबून असते. विषमतेला बळी पडूनही त्याच्या सामाजिक जाणिवा जाग्या झाल्या नसतील तर त्याला "अमानुषते"च्या अवस्थेतच जगावे लागते. ती अवस्था नामशेष करण्यासाठी संघर्ष अटळ असतो आणि त्या संघर्षात शाश्वत मूल्यांचा आविष्कार झाल्याशिवाय "मानवतेची" पुनर्स्थापना केली जाऊ शकत नाही. "मानवतेचा" आविष्कार मात्र जाणीवपूर्वक मनाने करावा लागतो. पण "विद्रोहा"ला या अंतिम मूल्याचा विसर पडला तर माणसामाणसाला व समाजासमाजाला विभागणारी एक भिंत पाडून त्या ठिकाणी दुसरी भिंत तो उभा करील. म्हणून "विद्रोहा"च्या मनाच्या तळावरची "करुणा" त्याच्या डोळ्यात पावसाचे वरदान देणाऱ्या आकाशासारखी उतरली पाहिजे. करुणेला समाजव्यवहारामध्ये मूल्यरूप धारण करण्यासाठी आविष्काराच्या वाटा सापडल्या पाहिजेत. "नागफणा आणि सूर्य" या कवितेद्वारे माळींचे कारुणिक मन मानवतेच्या या वाटा शोधताना दिसते. सामाजिक द्वंद्वातून व निसर्गाशी द्वैत साधून त्यांची कविता "मानवता" या मूल्याचा भावाविष्कार करते. समाजात होऊ घातलेल्या विराट संघर्षाची त्यांना विवेकी जाणीव आहे; तो अपरिहार्यही आहे म्हणून आपल्या रक्तात त्यांनी आकाशातील निळे दिवेही पेटवले आहेत; पण त्या संघर्षाची परिणती शेवटी मानवतेत व्हावी अशी आंतरिक उत्कट ओढही त्यांनी व्यक्त केली आहे. माणसाला त्याच्या "असण्याचे" (being) मूल्य सापडल्याशिवाय त्याच्या "होण्याचे" (becoming) त्याला अर्थगर्भ साधन सापडत नाही; त्या आंतरिक

ओढीने माळींच्या कवितेला विलक्षण देखणी एकात्मता (organic unity) दिली आहे.

माळींची ही कविता बऱ्याच ठिकाणी "गद्यप्राय" बनलेली आहे व तिला बऱ्याच अंशी "बोध" कवितेचे (didactic) स्वरूप प्राप्त झाले आहे; अशा प्रकारची टीका तिच्यावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ती बऱ्याच ठिकाणी विधानं करते, विवाद करते व विचार व्यक्त करण्यात व्यस्त होते आणि त्यामुळेच तिला गद्यप्रायतः व बोधकाव्यात्मकता प्राप्त होते अशा प्रकारची प्रतिक्रिया व्यक्त केली जाऊ शकेल. ती विधानं करते आणि विचार व्यक्त करते म्हणून ती गद्यप्राय होते किंवा बोधकविता बनते असे मला स्वतःला मात्र वाटत नाही. ह्या कवितेचा सबंध आवाका, तिने हाताळलेला विषय आणि तिचा समग्र प्रभाव (total impact) लक्षात घेतला तर ही टीका अवास्तवच ठरेल. कवितेने कुठेच व कधीच विचारानुभव व्यक्त करायचा नाही ही कल्पना मान्य होण्यासारखी नाही. उलट आता हिंदी साहित्यामध्ये "विचार कविता" हा नवीन काव्यप्रकार रूढ होतो आहे. "विचार कविता" ही समस्याप्रधान कविता असते आणि तिचा आविष्कार समकालीन जीवनाच्या संघर्षातून होत असतो. तरी पण "नागफणा आणि सूर्य" ही कविता "विचार कविता" नाही. तसे म्हणण्याचे कारणही नाही. माळींनी जी संवेदनशील भाषा वापरली आहे ती विचारांनाही भावनेचे रेशमी वस्त्र नेसविते. विचारांनाही भावनेचे "रूप" देणारी ती भाषा आहे. त्यांच्या शब्दांना व प्रतिमांना जे लयत्व मिळाले आहे ते अतिशय लक्षवेधी आहे. या कवितेला एक आंतरिक गतिमानता प्राप्त झालेली आहे आणि वास्तविक तिच्या आंतरिक गतिमानतेतूनच तिला लयत्व मिळाले आहे. ती सर्वार्थी ललितकृती आहे हे कबूल करावे लागेल. कारण विचारानुभवांचे श्रीमंत बळ या कवितेच्या मागे उभे आहे.

माळींच्या कवितेची अर्थगर्भताही अतिशय मोलाची आहे. तिला "स्वयंपण" प्राप्त झाले आहे ते त्यामुळेच ! ती विचार निश्चितच व्यक्त करते. तिने अस्मिता, जीवन, धर्म व इतिहास यावर विचार व्यक्त केलेले आहेत. विचार म्हटला की बौद्धिक प्रक्रिया आलीच. दीर्घ कवितेत विचारांना जागा द्यावी लागते ही गोष्ट निर्विवादपणे मान्य करावी लागते. वास्तविक कोणतीही दीर्घकविता emotional intellectual axis वर आधारलेली असते. कवितेचा वैचारिक आयाम हाच तिच्या दीर्घत्वाला जबाबदार असतो. काही समीक्षकांच्या मते वैचारिकता किंवा बौदिकता ही कवितेच्या सृजनशीलतेच्या आड येते. कलानिर्मिती ही निखळ बौद्धिक प्रक्रिया नाही हे मलाही मान्य आहे. खरे तर कलावंताचे जीवनविषयक चिंतन तिला व्यक्त करता येत नसेल तर ती अर्थगर्भ ठरू शकणार नाही. कवितेला लयत्व प्राप्त होणार नाही. पण मानवी अनुभवातला अर्थ आणि आशय टिपूनच तिला लययुक्त होता येते. ललितकृती ही एक भाषिक संघटना असेल तर तिला बौद्धिकता पूर्णपणे टाळता येत नाही. भावनेला स्पर्श करणाऱ्या व आवाहन करणाऱ्या भाषेत विचार व्यक्त केल्याशिवाय कवितेला जीवनावर

भाष्य करता येणार नाही. जीवन, विज्ञान, इतिहास व तत्त्वज्ञानही भाष्य करते, पण काव्याच्या ओंजळीत जे जीवन येते ते विज्ञान, इतिहास किंवा तत्त्वज्ञानाच्या ओंजळीत येऊ शकत नाही. म्हणूनच मॅथ्यू अरनॉल्ड म्हणतो :

"More and more mankind will discover that we have to turn to poetry to interpret life for us, to console us, to sustain us." जीवनावर भाष्य करावयाचे असेल तर कवितेला विचारांनाही प्राधान्य द्यावे लागेल. म्हणून अर्नॉल्डचे पुढे असे म्हणणे आहे की—"for poetry the idea is everything; the rest is a world of illusion of divine illusion. Poetry attaches its emotion to the idea; the idea is the fact."

माळींच्या कवितेचा विचार या संदर्भात केला पाहिजे.

एखाद्या कवितेला "काव्यत्व" यावयाचे असेल तर तिच्यात "काव्यात्मक सौंदर्य" (poetic beauty) आणि "काव्यात्म सत्य" (poetic truth) या दोन्हीही गोष्टींचा अढळ असला पाहिजे असे अर्नॉल्डचे प्रांजळ मत आहे. "काव्यात्मक सौंदर्य" हे भावनेच्या आविष्कारातून तर "काव्यात्म सत्य" हे विचारानुभवाच्या आविष्कारातून साकार होते. आणि जेव्हा "काव्यात्म सौंदर्य" व "काव्यात्म सत्य" एकरूप होतात, कवितेच्या अंतःप्रवाहात विलीन होतात तेव्हा तिचे खऱ्या अर्थाने कलात्मक सर्जन होते. आणि मग अशी कविता एक आगळाच अनुभव देऊन जाते. "Beauty is truth, truth beauty,—that is all we know on earth" अशा शब्दात कीट्स या कवीने अशाच कलाकृतीसंबंधी उद्‌गार काढले आहेत. म्हणून कवितेचे श्रेष्ठत्व तिच्या कलात्मक अभिव्यक्तीतून आविष्कृत झालेल्या जीवन भाष्यात आढळू शकते. अर्नॉल्डच्याच शब्दात पुन्हा सांगायचे तर—"The noble and profound application of ideas to life is the most essential part of poetic greatness."—कवितेला मूल्यगर्भता यामुळेच प्राप्त होऊ शकते; आणि अशा प्रकारची मूल्यगर्भता प्राप्त झाली की तिला आपोआपच एका व्यापक अर्थाने नैतिक आयाम मिळतो. जीवनाचे खरेखुरे दर्शन घडविणे ही 'नैतिक' बाबच आहे. मानवी जीवनातील समस्यांविषयी संवेदनशील मनाने लिहिणे ही गोष्टच मुळी "नैतिक" प्रेरणेतून घडणारी असते. माळींची कविता एका फार मोठ्या सामाजिक "क्राइसिस"मध्ये सापडलेल्या समाजजीवनावर भाष्य करते, म्हणून ती मला अतिशय मोलाची वाटते.

माळींची ही कविता निर्भय आत्मविश्वासातून व सामाजिक बांधिलकीच्या उत्कट जाणिवेतून जन्मास आली आहे. सामाजिक जाणिवांचा कलात्मक आविष्कार करण्याच्या या काव्यप्रवासात त्यांना यश प्राप्त करता आलेले आहे. समकालीन मराठी काव्याच्या क्षेत्रात ह्या कवितेला एक वेगळे स्थान प्राप्त होणार आहे अशी माझी निश्चित समजूत

आहे. सामंतवादी मनोवृत्तीवर आणि वतनदारी अहंगंडावर कठोर प्रहार करणारी, सामान्य माणसांच्या वेदनेला जिभा देणारी आणि पीडिताच्या जीवनाचे सांस्कृतिक सर्जन करणारी एक प्रभावी कविता म्हणून तिला मराठी वाचक ओळखतील. पण ती लिहित असताना माळींमधील कवी सातत्याने जागा आहे. त्यांची ही कविता पुढे चालत चालत सभोवतालच्या निसर्गातील रंग टिपत जाते. माळींच्या कवितेतील प्रतिमा व प्रतिके ही त्यांच्या जीवनाच्या जवळ असणाऱ्या निसर्गातून आलेली आहेत हे वाचकांच्या चटकन लक्षात येण्यासारखी गोष्ट आहे. त्यांच्या प्रतिमांनी व प्रतिकांनी ह्या कवितेला समृद्ध आशयगर्भता मिळवून दिली आहे. "पाषाणमय शरीरात शतकांपासून कोंडलेले सुदीर्घ श्वास," "ग्रीष्मातील थरथरणारे सूर्यकिरण," "तळ्यात नांदणाऱ्या ज्वाळा," "देहात उतरणारी उदास फिकट साऊली," "तारी-गोदेच्या पाण्यात गुंतलेला जीव," "पाषाण लेण्यातील रंगात भिजलेली धून," "ओल्या दुःखात न्हाणारी रानमाती" "जोंधळ्याच्या ताटातून उभं राहणारं इंद्रधनुष्य", "डोळ्यात उतरणारी नागफणेसारखी दुपार", "बाभळीच्या पिवळ्या फुलात उतरणारी संध्याकाळ", "डोळ्यात उतरलेल्या आभाळातील वाटा", "अंगावर कडुनिंबाची साऊली ओढून घेणारा बाप", "पाण्यामधून ऐकू येणारी तुकोबाची वाणी", "काळाच्या पानावर अलगद उतरलेला इतिहास", "झुलतं आभाळ कवेत घेणारी अस्मिता", "उन्हाच्या फांदीला लगडलेली स्वप्ने", "छातीवर दिवे पेटवलेली मातीची घरं", "वाहत्या रक्तात उधळलेले आकाशातील निळे दिवे",—अशा किती तरी आशयप्रधान प्रतिमा माळींच्या या कवितेत ठिकठिकाणी विखुरलेल्या आहेत. आणि "आपले अस्तित्व टिकवून उभं असलेलं बाभळीचं खोड हे तर दलितांच्या उद्‌ध्वस्त जीवनाचं प्रतीक म्हणून त्यांनी फारच कल्पकतेनं व प्रभावीपणे वापरलेलं आहे. या खोडाप्रमाणे दलित वर्ग आता संघर्षात उभा आहे. माळींनी वापरलेलं हे प्रतीक फारच अर्थवाही आहे. myth निर्मितीचे—स्वरूप' यासारख्या अनेक प्रतिकांना या कवितेत लाभले आहे.

माळींच्या या कवितेला आगळे महत्त्व प्राप्त होते ते त्यांनी वापरलेल्या नागाच्या "मिथ्"मुळे. पृथ्वी आपल्या फणेवर घेऊन, त्यावर असलेल्या मण्याच्या प्रकाशात तो नाग चालतो. आणि ज्या प्रदेशात तो राहतो व संचार करतो तो प्रदेश नागभूमी म्हणूनच अर्थात ओळखला जातो. भारतीय बौद्धांच्या इतिहासात या नागभूमीला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. बौद्ध धर्माची दीक्षा घेतलेल्या भारतीय दलितांच्या संदर्भात माळींनी हे "मिथ्" वापरले आहे. ह्या नागाच्या डोक्यावर प्रकाशाने तळपणारा मणी असल्यामुळे तो स्वयंप्रकाशित आहे. या "मिथ्"मुळे माळींच्या कवितेला अर्थगर्भता प्राप्त झाली आहे. कवितेचे शीर्षकही या "मिथ्"मधला अर्थ ध्वनित करणारे आहे.

रचनाबंधाच्या दृष्टीनेही माळींनी या कवितेकडे पुरेसे लक्ष दिलेले आहे. ललितकृतीचे लावण्य हे तिच्या बांधेसूदपणात बऱ्याच प्रमाणात आढळते. तिचा

"घाट" सुंदर असेल तर तिला आपोआपच लयत्व मिळते. ललितकृतीचा "घाट" संवाद–विरोध–समतोलातून साकारत जातो असं मर्ढेकरांसारख्या समीक्षकांचं मत आहे. केनेथ बर्ग (Kenneth Burke) या अमेरिकन समीक्षकानेही अशाच आशयाचा विचार व्यक्त केला आहे. त्याच्या मते Purpose–passion–perception मधून ललितकृतीचा आकृतीबंध निर्माण होतो. ती उद्दिष्टाकडून (purpose) भावोत्कटतेकडे (passion), आणि भावोत्कटतेतून बोधनाकडे (Perception) स्वयंप्रेरणेने गतिमान होते. माळींनी "नागफणा आणि सूर्य" ही कविता तीन भागांमध्ये विभागली आहे. स्थूलमानाने तिचा पहिला भाग तिचे उद्दिष्ट विशद करतो, दुसऱ्या भागात तिची भावोत्कटता वाढते आणि तिसरा भाग तिच्या विषयाच्या बोधनेचा अनुभव देतो. पहिल्या भागातून दुसऱ्या भागात प्रवेश करताना कुठेतरी सांधा निखळल्यासारखे वाटते. कवितेचा शेवटही थोडासा विस्कटलेला आहे. "वाहत्या रक्तात आकाशातील दिवे उधळणारा" कवी वास्तविक संघर्ष पेटवायला तयार झाला पाहिजे. पण तो होत नाही. समोर पसरलेल्या काळ्या जमीनीच्या ढेकळात आणि वैराण माळरानावर त्याला दारिद्र्याने खंगलेल्या बापाची क्षीणकाय सावली अमूर्त–अस्पष्ट होताना दिसते. हे काळे वावर युद्धभूमीत परावर्तित होण्याचा संकेत देत नाही. तसा संकेत त्याला देता आला असता तर संघर्षमूल्यांचा मळा फुलविण्याचे अभिवचन त्याला देता आले असते.

मराठी वाचक माळींच्या या कवितेचे उत्सुकतेने स्वागत करतील याचा मला विश्वास वाटतो.

—जनार्दन वाघमारे

राजर्षी शाहू महाविद्यालय,
लातूर —४१३५१२
दि० २१ जून १९७९



Ah gits Weary
  an' Sick of try-in'
Ah'm tired of liv-in'
  an' Skeered of dy-in'
But Ol'man river,
He Jus,
keep roll-in' a-long.

ही कहाणी माझी,
माझ्या नात्याची
सांडलेल्या माझ्या उदास रक्ताची
पाषाणमयी शरीरातच,
शतकांपासून कोंडून पडलेल्या सुदीर्घ श्वासांची.

आत्म्याच्या घळीत फुटलेली,
माझ्यातून आपसुख विलग,
गळावे विदीर्ण फांदीवरील फुल शिशिरातील,
गळावा शोकमग्न स्वर गोहरच्या कंठातील!

ही काढणारी बाहेर माझ्यातून मला,
मनस्वी माझी.
नाही केवळ जन्मलेली,
तुमच्या कमळकोमळ हृदयपर्णावर
थरथरावा ग्रीष्मातील सूर्यकिरण!
ही जन्मली
हिच्या आतील खोलवरच्या कलावर,
नको आहे हिला तुमची चंद्रकिरणांची पखरण!
ही जन्मली : हिला जन्म हवा होता म्हणून.

ही गूढ आतली, कोरत होती दडून
ही मोही.
नव्हती राहत माझ्यापुरती, माझ्याजवळ.
ही होती—
होत्या ज्वाळा नांदत तळ्यात केवळ!

ही होती माझ्यामागे उदास फिकट साऊली,
होती देहात उतरलेली काचपात्रातून,
उद्ध्वस्त प्राचीन नगरातील पिशाच्च बाहुली.
ही हलवीत होती वृक्षांना,
प्रदीर्घ लांब व्याकुळवंशी हातांनी खळखळून.

अनेकदा मन विश्रब्धलं
दत्तक राजकुळी सवयीन.
अनेकदा पाहिले प्यालयातील तांबूस तरंग मोहान.
मन भरकटलं कितीदा आडवाटांनी,
गळून पडलो अनेकदा विछिन्न पाषाणदेहान.
निर्जीव चाललो त्या वाटाही कुणाच्या
दाट स्नेहाळ परिचयान.
ही मात्र होती भरून आत, आत्मली बनून.

गोदावरीच्या काटावरून
ही आली सूंसाटत,
पलीकडून—
उजाड वैराण माळरानावरून—
आली खळखळत, सांगत
आकाशाचं माझं नातं,
पाहिला होता हीन तापी-गोदेच्या पाण्यात
गुंतलेला माझा जीव,
ऐकली होती हीन
पाषाणलेण्यातील रंगात भिजलेली माझी धून.
पाहिले होते हीन
येथील मातीत आहेत सांडलेले माझे प्राण
माहीत होती हिला माझी ओली जखमी जाण!



मी पाहिलाय,
पहाडाच्या पायथ्याशी उभा माझा बाप
ग्रीष्माच्या ज्वाळेत पोळणारा.
अंगावरील फाटक्या वस्त्रातून
निथळणाऱ्या पवित्र घामाच्या धारांनी,
मी पाहिलीय,
भिजलेली काळी जमीन
वळवाच्या पहिल्या पाऊसासारखी समुत्सुक.

मी पाहिलय त्याला,
अनवाणी उदास पायांनी,
हृदयाचा तुकडा नांगरतांना,
पायात मोडलेल्या काट्यान फोडलेल्या
रक्ताच्या तुषारात रानमाती ओल्या दुःखात न्हातांना!
काळ्या टणक पाषाणातून उसळावेत
श्रावणी पाण्याचे झरे अनिर्बंध,
काळ्या मातीच्या ढेकळातून
सारं ओसंडलंय त्याचं निर्भय कष्टाळू रक्त.

मातीत सांडलेल्या रक्ताच्या रेषांतून
त्यान पाहिलंय आयुष्याच्या पलिकडलं
वाटेवर असलेलं,
जोंधळ्याच्या ताटातून उभं
स्वप्नांचं इंद्रधनुष्य...

त्यान पाहिलेय रंग मातीचे,
काळ्या ढगांचे
वाहत्या घामाचे,
मावळत्या किरणांसोबत विझून जाणाऱ्या
इंद्रधनुष्याचे आणि
अलगद गळून पडणाऱ्या
चुकून तुरळक आलेल्या स्वप्नघनांचे!
मी पाहिलय त्याला
हातात भाकरीचा तुकडा घेऊन

काळ्या मातीत कष्ट उपसतांना,
रोजंदारीने दुसऱ्याच्या शेतात काऱ्या
कुदळीच्या अणुदार टोकांनी खोदतांना,
आपल्याच स्वप्नांवर घाव घालतांना.

मी पाहिलय त्याला,
मळे फुलवितांना मालकांचे
भावनांना अलिप्त ठेवून राबतांना,
श्रीकृष्णान गीतेत सांगितलेल्या
कर्मयोगाचा निर्मोही आचार करतांना.


मी पाहिलय त्याला,
बरसत्या मेघात चिंब होतांना.
टोंग्याभर चिखलातून पाय
घराकडे वळवितांना,
साऱ्याच नाल्या ओढ्यांना
ओलांडतांना, ओढीन आमच्या
मी पाहिलय त्याला, शोधतांना
मिणमिणत्या चिमणीच्या मंद प्रकाशात
दमून आल्यावर रात्रीच्या प्रहरीं
आईच्या डोळ्यात, ओटीत तिचा
चंद्र झुलतांना...

मी पाहिलय त्याला,
दिवसभराच्या कष्टान कण्हतांना,
'उद्यासाठी पीठ नाहीय'
या शब्दांनी विमग्न, उद्विग्न
सर्वांग वेदनांनी ठणकतांना.
मी पाहिलय त्याला रित्यापोटी
हाडांचा उरलेला सापळा घेऊन शेतात जातांना
उगवत्या लाल किरणांकडे पाहात
तुकारामाचा रात्रीच्या कीर्तनातील अभंगाचा तुकडा गुणगुणतांना...
दुपारची उग्र उन्हे खांद्यावर घेत
भाकरी घेऊन—

जनलाजेसाठी फाटकें जुनेर नेसून,
येणाऱ्या
माझ्या आईची वाटुली बघतांना...

दुपार टळून जाते
सबंध वाट वेटोळे करून,
डोळ्यात उतरते नागफणीसारखी.
आसन चक्रातून उसळते ती दिव्य शक्ती
भूकेची,
मणिबंधातून सूंसाटत वाहू लागते
उर्ध्वगामी;
बसतात धक्के मस्तकावर
उपडी होते ती ओव्यातून भेटलेली ज्ञानेश्वराची
अमृताची वाटी.
सारेच रंग तरळतात त्याच्या
डोळ्यासमोर.

मला वाटते, बाप
ओव्यात झिंगलेला...
मी पाहतो



त्याला भूकेने कासावीस झालेला,
मातीच्या ढेकळात कोसळतांना.
मी पाहतोय माझा बाप,
तुकारामाच्या अभंगात दुभंगतांना···

तापता सूर्य
ग्रीष्मात वर चढतो,
माझा बाप अनशान पोटान नांगर हाकतो.
सारी भेगाळलेली जमीन
लाहा लाहा करीत बाजूला
सरकते, फाळाला जागा करीत
डोळ्यात येऊ पाहणाऱ्या श्रमाच्या धारा
फाटक्या विटलेल्या फेट्याच्या सोग्यान पुसतो त्यांना
आणि पुटपुटतो,
‘ मह्या बाप अस्साच राबला आन्
ह्यो तुकडा सोडून गेलाय. ’
माझा बापही राबराब राबतो
आम्हाला पोसून, हा तुकडा मागे उरावा म्हणून.

मी उन्हाचा झाडावर चढतो,



साऊली अंगावर घ्यावी म्हणून
सारी होते अंगाची लाही,
झळा तुटत असतात डोंगर माथ्यावरून.
साऊल्याही येतात हिरमुसल्या
वृक्षांच्या बुंध्याजवळ
पक्षी येतात चित्कारत
झाडांच्या वाटांनी दुडदुडत,
लांब धापा टाकीत हरिणांच कळप
शेवडीच्या रेखान.
सुतारपक्षीही करतो झाडावर टकुटकु
उन्हाच्या भयान.

वावरातील धसकटं वेचणारे ते दोन हात
फाटका पदर डोक्यावर घेतात कपाळभर आणि
पुसतात तो घामेजला, मलूल
भर उन्हात निथळणारा पळस !
झळा वहात येतात रानझुडुपातून
बापाच्या फाटक्या अंगाला
लपेटून घेतात सावधपणान
त्यांना तोच सर्वांही सज्जनातील
सोयरा वाटतो जवळचा.

संध्याकाळ,
बाभळीच्या पिवळ्या फुलात उतरते,
माय बांधावर काड्या वेचते.
घरी पीठ असलं तर—
हव नां चुलीत जाळायला काही.
"आत्ता नको ना वेचू

दिस आलाय मावळतीला." माझा
शाळकरी आवाज ऐकून एकदम वसकते,
'काय जायू हाडं मही चुल्ह्यात राती
पोटाले लागतेय नं तुह्या गरम भाकर'
माझा आवाजच सहज नित्याच्या सवयीन



खुडून टाकते—
बसल्या बसल्या खुडावा एखाद्या पिंपळाचा
नुकताच वर आलेला लाल
लसलसता कोंभ खेळात गमतीन.
तीच आयुष्यभर
वाऱ्याला आलेलं सारं दुःख
प्रत्येक शब्दास धार देत माझ्याजवळ वाहात येतं.

शब्दागणिक तिन सोसलेलं असतं आणि
शब्दागणिक माझ्या संवेदनाहीन
मनाच्या काठावर घरंगळतं, ओसरून जातं.

कुठे ठेवावा शब्द जपून तिचा ?
सारं आयुष्यच जर पेटलेलं
कसे देऊ मी रेशमी वस्त्रांचे घागरे ?
शब्दच उघड्यावर जन्मला तर.
कसं लिंपू तिचं मन ?
मडक्याच्या तळातील थंड पाण्यान...
कसा झाकू तिचा देह ?
वर्षात एकही उत्सवी सण घरात आला नाही तर.

कसं सांगू ? काय सांगू ?
उमलू दे ग तुझा जीव उन्हाच्या
आडोशान ?
फुलू दे गा एकदा तुझं मन
दुःखाच्या पहाडी वाऱ्यान ?
झुरू दे गा तुझं हृदय
निदान माहेरच्या आठवान ?

झाडाच्या झावळ्यांतून मी पाहतो
माय, बाप, ऊन, शिवार, जित्रप आणि
शाळेतील कवितेतून भेटलेलीं रानपाखरं.
मी कविता म्हणतो कुण्या कवीची झाडावर बसून
शाळेत मास्तरांनी पाठ करून घेतलेली.

(कुण्या डेपुटीसमोर म्हणायची होती म्हणून...)

छान वर्णन असतं रानाचं
मनाला भुरळ पाडणारं.
छान वाटतात तीं रानपाखरं
कवितेतून चिवचिवणारीं.
छान वाटते त्यांची शाळा
पिंपळाच्या पारावर भरणारी.
छान वाटतात त्यांच्या पंखावर सांडलेले
कवितेतून नानाविध रंग...
चिमण्यांच्या रंगीत पोरांनी घातलेल्या गोंगाटात
मीही झालो ना अनेकदा दंग !

मी कविता म्हणतो आणि
ग्रीष्म तापत असतो.
बाप राबत असतो.
माय अंगाला काटे ओरबाडीत
वाळक्या मांडीवरील
उघडी लज्जा झाकावी म्हणून चिंध्या बांधत असते.

मी शोधतो या कवितेतील माझा शब्द
शब्दामागचा कलाकुसरीन दडविलेला गूढ अर्थ
अर्थामागचं वास्तवातील जीवन आणि
समोर
माझ्या बापाचा रानातील उभा संसार
उन्हात जळत असतो...

मला नाही भेटली
माझ्या बापाची ही असहाय्य तीव्र वेदना
मराठी कवितेच्या वाहत्या प्रवाहातून.
मला नाही भेटलं
माझ्या आईचं दुःख सबंध सारस्वताच्या बागांतून.
मला नाही भेटलं कोणीही रानात राबणार
नाही फिरवलेत आपले मखमली हात

या मराठी कवितेन
वाळलेल्या रक्तहीन देहांवरून !

फुललेत या कवितेतून
शब्दांचे पारिजातक,
मोत्यांचे घोंस
कुंकुमरसात चुभळलेत कित्येकांनी.
कित्येकांनी
नुसत्याच लावल्यात शब्दांच्या पणत्या—
कालगतीत विझलेल्या.
काहींनी तुपाची धार ओतीत
रिचविले शब्द.
काहींनी गायिले पोवाडे
सोनकड्याच्या रंगेल पेशवी मोवदल्यात.
म्हटल्यात काहींनी उसन्या शृंगाराचा
फुलसडा घालीत
मस्तवाल जीवनशून्य लावण्या.

तर एकानच सांगितलं,
मजूरांवरील उपासमारीचं दुःख
बुडत्या सूर्यापाशी
काहींनी गायिलीं मोटेवरची मचूळ गाणीं
'नव्यानेच शोधलाय जानपद प्रदेश'
असा कोलंबसाचा आव आणून.
काहींनी पाहिला आंबराईतील शृंगार
शब्दांना चांदीची टरफलं घालून.
काहींनी रंगविली मीठभाकरींची चव
बापाच्या हृदयातील उन्हाळा बाजूला सारुन
काहींनी कबंध
नुसतेच नाचविले शब्दांच्या जादूवर.
'तुझ्या घामामधून
तुझ्या कामामधून'
ही सेवादली तबकडी लावली कोणी
कलापथकासाठी जमलेली गर्दी पाहून.

मीही ऐकली ही कविता
जमान्याची सोय म्हणून !
मीही अपराधी, फिरलो
रेशमी गुलछब्बू सभामंडपातून.
अत्तराचे फाये लावून मीही हिंडलो
हिचा नखरेल बाज पाहून.
मीही आकंठ प्यालो
मधुघटाचे द्रोण भरभरुन !

बापा रे ! खरेच सांगतो,
तेव्हा नव्हता रे हा दुःखाचा कंठ फुटला;
बाप हो ! मीही गुन्हेगार
तेव्हा नव्हती ही वेदनेची जाण मजला.

सकाळचीं उदास उन्हं
तुळशीच्या झाडांवर उगवत,
दीर्घ जांभई देऊन
गव्हाणीतील म्हातारी खाट जागी होई.
कुठे तरी किरकिरणाऱ्या मुलाचा
भुकेचा आवाज येई
आणि सकाळ मोडक्या मातीच्या घरात फिरत राही.

चिमण्या दारी येत
टाकावेत चार दाणे त्यांना
फिरवावा पोपटी पाखरांच्या पंखावरून हात
पाहावेत काळ्या मांजराच्या निळ्या डोळ्यातील;
खोलवर उभी असलेलीं गूढ व्रतस्थ स्वप्नें
मला सारखं असं वाटायच,
बापाचा कण्हणारा हात अंगावरून फिरायचा
...आणि चिमण्या लांबून सारं टिपायच्या.

चिमण्यांनाही होतें माहीत बापाच दारिद्य
त्यांनाही होतं माहीत
या घरात येतात सतत उदास दिवस.

त्या जवळ यायच्या अलगद आणि
भुर्रकन उडून जायच्या समोरच्या घराच्या धनवंत खिडकीवर.

असत त्याचे खारकेसारखे डोळे
दूरचे बघत काही
मन त्याच लांब कुठे
जीवन सारं उकरीत राही
मी मात्र बघत राही
त्याच्या डोळ्यांकडे,
मी केवळ पाहात राही
त्याच्या डोळ्यात उतरलेल्या आभाळातील वाटांकडे.

सायंकाळचीं उन्हें यायची
कापऱ्या हातांनी भूक घेऊन
पडक्या घराच्या म्हाताऱ्या भिंतीवर
थांबायचीं उदासवाणी थरथरुन

पहिल्या गळून गेलेल्या काळोखात
बाप बसायचा ओट्यावर.
पूर्वेला चंद्राची पिवळी किरणावळ,
प्रकाशात चमकायचीं
गरीबीचीं गात्रं केवळ !

कडूलिंबाची साऊली दारची
चांदण्यात वर सरकायची,
ओढून तिला जवळ कधी
बाप अंगावर घ्यायचा
साऊल्यांची सोबत त्याला
मनापासून आवडायची.

वेदनेच्या प्रदेशातून
अशा वेळी फिरायचा,
जीवनातल्या ओल्या गोष्टी
डोळ्याआडून सांगायचा,

वाहत्या जखमांवरून बाप
हळूच हात फिरवायचा
स्वतःतच बुडून लांब
दूर कुठे निघायचा...

दूर कुठे निघायचा,
रान समोर बघायचा...
रान घेऊन डोळ्यामधी
खोल खाली उतरायचा...

रानामधल्या वृक्षांवरती
उन्हाळ्याचे दिवस येत,
पंखामधून, पक्षांनाही
उन्हें कळत,
डोंगरामधील घेत वारे
झाडांकडे पक्षी वळत !

रान सारं उदास, उदास
डोंगर उदास,
पहाडातील टेकड्यामधून
दिवस फिरत
व्याकुळ उदास...

पानं पानं गळून पडत
वृक्ष उभे,
डोंगरावरती बाप उभा
आहेत जशी हाडं जळत !

उन्हाळ्याचे दिवस
असे उदास, चालत येत
उन्हाळ्याला घेऊन बाप
राबत राही त्यांच्या सोबत...

जमीन अगदी मऊशार



नांगरुन वखरुन व्हायची,
सायंकाळी कलत्या उन्हात
रेशीम लव घ्यायची.
चांदण टिपूर चैत्रामधलं...
काळी काया झिरपायची
अंगाअंगामधून माती
सोळा कळा खुलायची.
कडूलिंबाच्या पानामधून
मोहर फुटे, मोहर गळे
दिवसभरच विसरुन ओझं
माती झुरे, रानात उले!

रात्री मागून रात्री येत
दिवसांमागून दिवस सरत.
आकाशाची कूस उजाड
ओढे-नाले, सुकून जळत
रानपाखरं भिरभिरभिरं
थेंबासाठी लांब फिरत
जमीन काळी चोच वासून
पडून राही नुसती कण्हत.

बाप माझा डोळे देई
आकाशाला दान,
दिसत मेघ पश्चिमेचे
पाहात राही रान.
सागराच्या काठावरून
नुसते वादळ येई,
पानपान मन त्याच
वाऱ्या संगे जाई
कुठे केव्हा मेघ चुकून
झाडावरती उठे,
माझा बाप पक्षावाणी
आतुरतेन भेटे.

मेघ काळा, बाप मोळा
पाहून केवळ हसे...
दूर डोंगरात वळून
मनात भरे पिसे.

मृग आला, मृग गेला
डोळ्याला ना डोळा,
अंथरुणावर निजत उठत
जीव चोळामोळा.
डोळे त्याचे भरुन येत
मेघ उतरत खाली,
डोळ्यामधल्या पाण्यानेही
जमीन थोडी ओली.

चांदण्याला महापूर
रानोवनीं लाटा,
बाप, माझा जाऊन बसे
दुष्काळाच्या काठा...

काठावरती एक दिवस
नदीस आले पाणी,
पाण्यामधून ऐकू येई
तुकोबाची वाणी !

पाऊस पाऊस झिमझिम
रानावरती पडे,
बाप माझा माय जवळ
आनंदान रडे !

आनंदान रडे बाप
माय माझी भोळी...
" पुढल्या वर्षी घेईन, म्हणे
अंगावरची चोळी.

लुगड्याच्या चिंध्या बांधून
अंग किती झाकू ?
नवी जोडी पातळांची
दिवाळीला मागू.

किती दिवस पोटभर
अन्न नाही पोटीं,
दुधाचा तं थेंब नाही
तान्हुल्याच्या ओठीं.

पोर पारु चंद्रावाणी
आली लगनाला,
तुळशीच्या झाडाखाली
पुरु सपनाला...
माय भोळी माझ्या घरी
नाही आली कधी
किती वर्स नाही गेली
दिवाळीच्या मधी

नाही केलं भाच्यासाठी
कोणासाठी काही,
गरीबीच घर माझं
पाहिलं ग आई.

आता मात्र दिवस बरे
येतील संसारात
पीक चांगलं येईल ग
काळ्या वावरात."

तिचीं स्वप्नं उडत उडत
नक्षत्रांशी भिडत...
दानागोटा बांधून दोघे
रानाकडे वळत.

मातीवरती पाय ओल्या
फुल फुल पडे,
कळी तिच्या मनामधी
हळू हळू खुले

तिफणीला बैल जुंपून
बाप हाकू लागे
ओटीमधल्या मोहरांची
ज्वारी, माती मागे

ओल्या मातीं, पडे ज्वारी
ज्वारीसोबत मन
त्याच्यासह राबत राही
त्याच भोळ धन
तिफण चाले पुढे
माय मागे पेरी,
पाखरांचे थवे आता
येतील रानभरी!

मातीमधी ज्वारी पडे
घरी नसे दाणा
झाडाखाली अन्नासाठी
रडे बाळ तान्हा

बोटामधून धान्य गळे
डोळ्यामधून आसू
आता येईल पीक नवं
ओठावरती हासू.

दिवस जाता पश्चिमेला
बाप तिफण सोडी,
बांधावरती माय काढी
सरपणाची मोळी

कमरेवरती बाळ तान्हं
डोक्यावरती मोळी,
माय निघे बापा माग
भूक दोघा जाळी.

गवताचा भारा घेऊन
मीही सोबतीला,
मावळतीचा लाल रंग
दिसे विझलेला !

ओल्या मातीत
सजतात कण,
नियतीच शेवटी असते काय नियंत्रक ?
देते मातीलाही मोल ?
पेरते सामर्थ्य चैतन्य फुलविण्याच
असते जादू कशी ? कोणाची ?
इवल्या दाण्याच्या पोटातील
बाहेर येतं ताट दडलेलं अलगद,
आकाशगीतांना झेलणारं.

वळतात असंख्य पक्षांचे थवे
अंग असतं पक्षांच
ताटव्यांवर झुलणारं
मन असतं पक्षांच
रानगंधात भिजणारं.

मेघ काळे, काळे मेघ
काळ्या मातीत कोसळतात
कणसामधले अर्धे दाणे
काळ्या मातीत मिसळतात.

नियतीचे खेळ अनेक,
कळत नाहीत बापाला,
कळतात का या मेघाला ?

वाऱ्याला ?
डोळ्या मधल्या पाऱ्याला ?
ताऱ्याला ?
निदान पंचांगातील सूर्याला ?
सांगा, कळतात कोणाला ?
अर्धेच पीक घेऊन बाप
चालत येतो शिवेला...

शिवेवरचे वाटेकरी
वाटा त्यांना दिला पाहिजे
आपल्यावाणी त्याच पोट
या अन्नान भरलं पाहिजे.

बाप असा
घर कसं ?
सांगू आता कोणाला ?

चार बुकं घेऊन हाती
मीही निघतो वाटेला...

घेऊन असं दुःख उभं,
मी अक्षरांच्या शोधात निघालो
मी फिरलो विद्यापीठीय
अक्षरांच्या ओळी शोधीत.
अर्थावाचून,
जमविलीत सोनवर्खी अक्षरं,
झोळी भरुन झाली. थांबलो
एका एकाकी वृक्षापाशी...

काळ सरकत गेला
बुडत होता सूर्य म्हणून...
मी स्वीकारलं सारं विसरुन
परीट घडींच जीवन
सुखासीन होऊन.

काळ वाहात होता
काळासोबत होतो वाहात.
पाहिले काही दिवस
होतो काही साहात.

तुटली एकदा उल्का पायाजवळ
गेलो शोधत जखमा,
गेलो दुखऱ्या शब्दांजवळ

शब्दच माझे नाजुक
नव्हते पेलत दुःखही त्यांना
केले हलवून जागे
दुःखच शब्द मागे

मी शोधीत वाटा,
आलो खामनदीच्या क्षीण प्रवाहाकाठी
केला प्रवास येथून
पाहिल्या—
येथून निघाल्या वाटा
पोहचल्या कुठ ? आणि कुणाच्यासाठी ?



मी पाहतो घाट पुढचा
चालतो वाटा तुटलेल्या कड्याच्या महागनी वृक्षांच्या वनराईतील
पाहतो डोंगराच्या कपारीतून
श्रावकांच्या फाटक्या चिन्मय झोळीतून
आहेत काहीं रत्नें गळालेलीं गुहेतील पाषाणातून !

उमटली येथे रंगांची किमया
अद्‌भुत
स्वप्नच या देशाच सुंदर पाषाणातून वर आलेलं !
यावेत मातीतून चंद्र
निळ्या नभातील वाहात...
रंग येथील
मनाच्या काठावरून आहेत ओघळलेले केवळ,
की स्वर हे दैवी,
धरित्रीच्या प्रणव केंद्रातील रंगात न्हालेले !
आहेत जगातील सारे उगवते सूर्य
येथील अद्‌भुताच्या दर्शनाने स्तंभित झालेले !

पुढे दरवाजा चढत्या वाटेवर,
उत्तरेकडील मोंगली वाऱ्याची
ही तर भग्नशेष पहिली उदास खूण
या प्रदेशाने साहिलेल्या
ओल्या ठिबकत्या जखमेतील काळोखाची...

आलेत उत्तरेकडून पुष्ट मुलतानी देह
अरबी घोड्यांवरून,
थांबलेत धापा टाकीत
एका चिमुकल्या तळ्याकाठी.

मुरगाळून काही पक्षांच्या माना
मारून काही हिंस्र श्वापदांना
ठेवलीत येथील
वृक्षांच्या भयभीत फांद्यांवर टांगून
दुर्बलांना व्हावी
त्यांच्या संभाव्य अवस्थेची जाणीव !

जमविले या प्रदेशातील श्रमिकांना
हुकमी जरबेन
फोडून रक्ताच्या चिरकांड्या
उभारला हा दिल्ली दरवाजा प्राचीन
आहेत आजही त्याचे खिळे निखळलेले
आहेत त्याचे दरवाजे भव्य
काळाचे उदयास्त मोजीत मूक विव्हळलेले !

सभोवती भव्य तट
उभारलेत जेत्यांनी
दुर्बलांचे मेंढरासारखे कळप वळवून...

असते दुर्बलांची एकच प्रतिमा अशी
सत्तेच्या सिंहासनाने कोरलेली,
स्वातंत्र्याच्या तरुण उन्हातही
आहे दुर्बलांचे कोकरांचे कळप कुरणात निःशब्द फिरणारे.
वळवितात त्यांना अजूनही
हिरव्या कुरणातील नगरांवर आधिराज्य गाजविणारे.

तटही आज विकलांग,
कालगतीच्या वादळात खचलेला,
भुकेच्या आशीर्वादाने जशी
व्हावीत गात्रं लुळीं गरीबांचीं !
जावेत पायांवरून त्यांच्या वारे,
येऊन स्वातंत्र्याचा प्रकाशही,
आहे त्यांचे संबंध शरीरच थरथरणारे !
आहेत तटाचे जीर्ण संदर्भही
राजनीतीत जरतारी अवरणात नव्याने उतरलेलें.

का काठ गोदेचा—
येथे उमटलेत ते शब्द
आकाश ज्यात उतरलेलें,
सागरानेही आपल्या हृदयात आहेत त्यांना भिजविलेले.
सूर्यानेही श्वासांनी
आहेत ज्यांचे पंख निमिषात हलकेसे उघडलेले.

चंद्रमेने ऋजुतेत
आहेत ज्यांना अखंड चुमळलेले.

गोदेच्या काठावर
फुटलेत शब्दांना प्राण
प्राणात होते हो उतरलेलें त्रिकालाचे भान !
पाहिलेत या प्राचीन नगरीने
अवकाशात लखलखते उदय आणि अस्तही,
शब्दातून गळून पडावे
उपभोगलें गत काळांत राजकुळीं वैभव जे.

गोदेच्या पाण्यावरील लाटांनी
मोहरलेले वारे,
होते क्षिप्रेकाठी विसावलेले !
होत्या येथून निघालेल्या वाटा
रोमकडे वळलेल्या,
होत्या तेरवरही तेरणे काठीं
या नगरीच्या नजरा विश्रब्धलेल्या.
होत्या राजवैभवी सोनदळी साऊल्या
विश्वातील साऱ्या राजवृक्षांवर पसरलेल्या.

झिरपत होती येथील अस्मिता
मातीच्या कणाकणातून,



भव्यतेची होती तीवर झाक
होती येथील अस्मिता विशाल
प्रदेशाचीं नातीं ओलांडून विश्वाकुळाशी बांधलेली.
होती ठायी ठायी देऊळें
अखंड मानवतेचीं ज्योत पाजळणारीं
होते येथील मातीत उगवलेले संत,
आहेत ज्यांचीं निश्वसितें विश्वात आजही पसरलेलीं !

होता इतिहास भव्य
हा प्रदेश जगलेला;
होती येथील अस्मिता
असीमतेत श्रद्धाशील पाऊलें रोवलेलीं.
प्रगाढ मानवी निष्ठांचा इतिहास येथील,
होता काळाच्या पाना-पानावर अलगद उतरलेला.

थांबत नाहीत सूर्य, चंद्र
आणि नाही थांबत तारेही
नाहीत पसरलेल्या साऊल्या शाश्वत
त्या फिरतात विश्वातून
प्रकाश शोधीत,
प्रकाश गळतो पृथ्वीवर
दिवस रात्रीच्या फिरत्या चक्रांतून !



गेला सारा काळ सरकून
वृक्षांच्या गळणाऱ्या पक्व पानांतून
उन्हामागून मावळलींत उन्हें
वृक्षावरील गळाव्यात शिंदोळ्या
पहाडावरील शिंदीच्या पिवळ्या लोंगरांतून...

उरला आज इतिहास—
उराव्या मागे आठवणी
पांढऱ्या भुरभुरणाऱ्या म्हातारीच्या केसातील.
उरतो केवळ अहंकार
इतिहासातील सत्याचे जेंव्हा जाते तेज लोपून...

माणसं पाहतात स्वतःच अस्तित्व
इतिहासाच्या आरशात, चुकीच्या संदर्भात जेव्हा—
स्पर्श करते त्यांची साऊली
आभाळातील झुलत्या मेघांना.
ते असतात थिटे
वास्तवात, उभे असलेले ठिसूळ वाळूवर.

डोळ्यात असतात त्यांच्या
सूर्य विझलेले,
रक्तातील लाटाही असतात
मंद, बर्फाळलेल्या.
असतात त्यांचे शब्द
सत्त्व हरवून, निस्तेज झालेले.
असतात त्यांचे पंख
अभिमानानेच कापलेले !

गेल्या इतिहासातील व्यक्ती
प्रकाशाच्या ज्या वाटांनी,
असतात त्यांनी वाटांचे संदर्भ—
नव्याने बदलवून घेतलेले !
असतात वाटांवर पाऊलें उमटलेलीं
महात्म्यांची,
त्या वाटाच असतात त्यांनी अभिमानाने टाळलेल्या.

वापा, अहंकाराच्या काळोखात,
असतात रे, त्यांनीच त्या मिटविलेल्या.

उरतात मागे भयाण साऊल्या—
नुसत्या साऊल्या,
मृत्यूच्या वाटेकडे वळलेल्या
इतिहासाने जेव्हा असतात
घेतलेले स्वतःजेच स्वार्थी संदर्भ बदलवून.

इतिहासातील सत्य
देतें मिळवून सन्मान मानवाला,
खोट्या अभिनिवेषातून येतात मात्र जन्मास
वृथा अभिमान,
दाखवितो इतिहास मूळं
खोलवर रुजलेलीं पृथ्वीच्या नाभीकेंद्राजवळचीं.
उभारले जातात घनदाट वंशवृक्ष
गचगार मायावी साऊल्यांचे;
असंख्य जमतात पाखरं फांद्यांवर
नोंदली जाईल तेवढीच जवळीक आणि
येईल सांगता इतिहासाशी होतें
आमुचेही नातें जवळचें...

यातून घडतात अस्मितेचे नवे कंगोरे
जन्मास येतात अनुदार नवे अभिमान !
साऱ्यांचीच असतात टोके लखलखती
इतिहासाच्या कालविसंगत तेजाबी पाण्यात पाजळलेलीं,

भूतकाळाचा एवढाच आधार हवा
असतो काय मानवाला
भविष्यांचीं अहंकारीं स्वप्नें पाहण्यासाठी ?

अहंकारीं स्वप्ने असतात तरंगत भविष्यात
वास्तवाचे भान हरपून;
यातून येते जन्मास नवी अस्मिता
वंशाचा, प्रदेशाचा अन् भाषेचा आधार घेऊन.

चालावे काय मानवाने चिखलातून
वंश, प्रदेश, भाषा यांच्या
अतिरिक्त अभिमानातून ?

अहंकाराच्या अभिनिवेषातून उमटतात
विनाशाची पाऊलं,
अहंकार नेतो
मंत्र म्हणत भारलेल्या प्रदेशात लांब—
असतात जिथे अंथरलेल्या मुलायम साऊल्या राजवंशी !
होतात जिथे आत्मे मूक
लोपते जिथे अंर्तदृष्टी
सत्यालाही होते पारखी !

असते जिथे सुरक्षित तटबंदी—
असतात पाषाणही जेथे मिरवत धूसर विजयध्वज
दीर्घ काळातून;
येतात रे, शिखराचे दगडही तेथून—
घरंगळत खंदकाच्या पायथ्याशी, पडतात उन्मळून !

अभिमान रोंदतो माणसांच्या आत्म्यांनाच,
फुटतात यातून दीर्घकाळ दबलेल्या हाका.
विझत नाहीत त्या पेटल्यावर निमिषात
जातात प्रदेशाची मर्यादा ओलांडून लांब
जातात रे, त्या काळवाटा तुडवीत
भविष्याच्या इलाख्यातून;
अनेक शतकानंतरही
येतील त्या ऐकू,
ओलांडीत प्रदीर्घ काळ
पहाडात उगवणाऱ्या घनदाट वृक्षातून.
आणतील या असहाय्य सुदीर्घ हाका
प्रलयाचे रक्तवाही दिवस
हलक्या पाऊलांनी जवळ
निळ्याजांभळ्या स्वप्नगर्भ नक्षत्रांच्या थव्यातून.
या वेळी बापा रे ! होते मला तीव्र जाणीव

ढासळतो आहे दगड कालबाह्य संस्कृतीच्या
तटबंदीचा
दिसतो आहे रक्तथेंब त्यातच मला
दडलेल्या क्रांतीचा.

दिसते आहे एक लवथवते पाते
रक्ताच्या प्रवाहांत वाढणारें,
जुळतें आहे एक स्फोटक गीत
जुन्या बुरसटलेल्या सरंजामदारीला उन्मळून टाकणारें.

अस्मिता असते हिमनगासारखी
भूतकाळात सबंध बुडालेली,
वर असतात तिची चिमूटभर बोचरीं टोकं
नवा संघर्ष उभा करणारीं.
ती असते,
म्हणून येते अस्तित्व काही पिढ्यांना
खरे तर ती असते,
अनेकदा चिखलात रुतलेली खोल—
सोन्याचा वर्ख लेवून देखणा.
ती असते संस्कृतीचा ढोल वाजवीत
काळाच्या खोल गुहेत काळोख्या,
ती सांगते पूर्वजांचे प्रताप चिरंतन
प्रमादांना टाळून.
शिंपल्यात मावणारे जयिष्णू क्षण
असतात तिने बंदिस्त केलेले,
चांदीच्या पानदानात मांडता यावेत सणासुदीला म्हणून.
मस्तीत न्हालेले हें क्षण असतात शब्दांच्या
फुलोऱ्यातून ओसंडणारे,
रुप असते त्यांचें मोहक, भुरळ पाडणारे!

अस्मिता देते माणसांना मेंढरांचे कळप
सहज नेतृत्व करता येईल असे,
अस्मिता बोलाविते अज्ञात हुकमी
दणकट पाऊलांना खिळ्यांचे बूट घालून.

अस्मिता जगते एक निष्ठा,
जगवते एक नेता,
मायावी शब्दांचे मोहजाळ विणून !

अस्मिता चालते अनेकदा—
दुर्बलांच्या हलत्या प्रेतांवरून
बुटांच्या टाचांचे पाशवी आवाज करीत;
दुर्बलांच्या अंगांगावर असतात खिळ्यांचे
व्रण ओलें रक्ताळलेलें !
अस्मितेच्या मागे असतात असंख्य
आवाज कण्हणारे, दडपलेले, चिरडलेले···

अस्मिता असते एक सुखी डाळिंब
रत्नजडीत,
सुवर्णाच्या पात्रात ठेवलेलं
राजवंशी पुराण पाखरांच्या गुलजार चोंचींत विरघळणारं!

ती तर एक चंद्रफुल
सम्राज्ञीच्या केसात शोभणारं—
काळाचे सात पहाड ओलांडून
नेत्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी शोधून आणलेलं.

जुंपलेल्या सात घोड्यांच्या रथातून
अस्मिता निघते माणिकपोवळ्यांच्या
वृक्षराजीतून
दुतर्फा उभे असतात तिची स्तोत्रं गाणारे
नवे भाट,
मंत्रजागरात गुंतलेले नवे मयासूर यशोपजीवीत.
नवीं सूक्तें रचून, गाणारे
शब्द वेल्हाळ पोपट आणि
लोण्यात बोटे खुपसून बसलेले
उन्मत्त नरपुंगव सत्तेत झिंगलेले !

रथाच्या मग्रूर वाटा जातात दुर्बलांच्या
हृदयांवरून,

फोडतात किंकाळ्या असहाय्य व्याकुळ जीव;
उडतात रक्ताच्या चिरकांड्या आकाशव्यापी—
भिजतात दुर्बलांच्या वाहत्या
रक्तात, नभातील कोवळे मेघांचे निरपराध स्पंज !

आकाशातून रथ चालतो
अस्मितेचा डौलदार,
तेजस्वी लालनिळ्या नक्षत्रांचीं झुंबरे लावून,
सारे अस्मितेचे उपासक
हातात उत्फुल्ल शेंदरी गुलाब घेऊन
पाहतात गर्वोन्नत तापसी सहस्र सूर्य उतरलेले
बेदरकार भगव्या पाकळ्यातून !

अस्मिता असावी व्यापक जीवनमूल्यातून
घडलेली,
ती असावी
सारंच झुलतं आभाळ कवेत घेणारी !
ती असावी घननीळासारखी
समाजाच्या साऱ्याच तुकड्या, तुकड्यांना
भिजविणारी;
ती असावी शोषितांच्या
विकासाच्या वाटा शोधणारी !
अस्मिता असावी उदार
मानवतेच्या उबदार कुसेतून जन्मलेली !

असावं सहिष्णु आभाळ संबंध
तिच्या डोळयात उतरलेलं,
असावं पृथ्वीलाच तिन
पक्षासारख हातात कुरवाळलेलं !

चंद्रालाही असावं तिनं
आपल्या हातावर गोंदलेलं,
सूर्यालाही असावं
आपल्या छातीतून पेरलेलं !

राहते अस्मिता उभी
ज्या भूमीवर दुर्बलांच्या
घट्ट पाय रोवून.
त्या भूमीच्या ताकदीच
असावं अस्मितेन
महत्त्व स्वीकारलेलं.

झाला काय तिचा आविष्कार
असा विशाल,
दुर्बलांच्या हृदयांना
स्पर्श करणारा ?

तिच्यात होत्या काही
आदिम खुणा
तिच्या जवळ होती
मानवाच्या संस्कृतीची भाषा उद्दाम,
कालचक्रालाच मागे खेचण्याची.
तिच्या जवळ होतीं हिंस्र साधनें
मानवकुळालाच
समूळ पेटविण्याचीं !

ब्रह्मगिरीच्या पायथ्यापासून
होतं ना प्राचीन काळी निबीड अरण्य
होत्या ना सुसाटत वाहात नद्या आवेगान
होती ना गर्द झाडी दाट
सूर्यालाही ओळख न देणारी
नक्षत्रें फिरावीत रानारानातून तसे
होते ना भटकत लालनिळे डोळे श्वापदांचे !
भक्ष्य शोधीत,
होते फिरत प्राचीन काळात
धिप्पाड माणसांचे जथ्थे झाडीतून.
टोळ्यांनी केल्या वसाहती
जमेल तेथे
जमेल तेवढी जमीन घेऊन.

लाल डोळ्याचा धिप्पाड हिंस्र मानव
झाला तोच नायक टोळयांचा,
भयातून आली माणसं त्याच्या जवळ—
दाखविली ना त्यान भीती
शत्रूच्या हिंस्र शस्त्रांची ?

जपला त्यानही मंत्र अस्मितेचा
सैरभैर होणाऱ्या माणसांसाठी !

हवं असतं हो कवच
माणसांना सुरक्षितेच,
हवं असतं साधन माणसांना
स्वतःच्याच स्वार्थाच्या पूर्ततेच
होते सुवर्णाच्या रत्नजडीत कोषात
अस्मितेची अशी निर्मिती
येते तिलाही मुलायम शब्दात सजविता
मोहवश होणाऱ्या माणसांसाठी.

यातून बदलतात संदर्भ देशाचे,
माणसांचे आणि
बदलविले जातात संदर्भ इतिहासाचेही.
घेतो इतिहास जन्म
सबळांच्या लेखणीतून
होतो इतिहास बोलका
प्रस्थापितांच्या लखलखत्या जयिष्णू वाणीतून !

पेटलेल्या युद्धात
कोसळावेत असंख्य अनाम जीव
प्राण ओतून
आणावेत विजयी ध्वज आकाशातून
उरावीत नावें
युद्ध रेषेपासून लांब असलेल्या नेत्यांची केवळ.
इतिहास या देशाचा
अनाम दुर्बलांना विसरलेला,

इतिहास या देशाचा
लेखणीच्या बळावर प्रस्थापितांचे
स्तोत्र गाणारा !

इतिहास या देशाचा पाहिलाय का कधी
तुम्ही विवेकी मनान तपासून ?
घटनांचे संदर्भ ?
व्यक्तींची चपळ नातीं गुंतलेलीं ?
त्यातील खरं सामर्थ्य राहिलें उभे कोणाच्या मनगटांतून ?

लिहिलाय काय इतिहास कोणी
या लेण्या बोलतात निखळ
नग्न वास्तव माझ्याशी तसा—
महागनी वृक्षांच्या उंच वनराईतून
पाझरणारं माझ्या हृदयाच्या काठावरील
खळाळ संगीत,
मस्तकात सरळ भिनणारी
ही 'बिरहा द सुलतान' गझल
की उस्ताद अल्लाउद्दीन खाँच्या सतारवादनातून
गळणाऱ्या निळ्या प्रकाशलाटांसारखा स्वच्छ
की फणींश्वरनाथ रेणूच्या कथातील
माणसं छिलतात माझी
कातडी अणुदार रंध्यान,
इतिहास लिहिलाय काय कोणी असा—
सत्य पाजळत
हृदयाच्या वेदीवर वास्तव, स्वतःला लांब ठेवून ?

सारा इतिहास या देशाचा दुर्बलांच्या
मनगटातून उभा राहिलेला.
गोवर्धन उचलला गुरे राखणाऱ्या
गवळ्यांनी
आपल्या सामुहिक एकात्म ताकदीन.
आहे ना निदान यामागे एक सत्य ?
दुर्बलांच्या संघटित एकात्म ताकदीन

घडतो नवा साक्षात्कार,
उगवते एक नवी स्वप्नवेधी धगधगती पहाट...

खोदले प्रचंड खंदक पाण्याचे
श्रमलेत ना येथे रोमचे दुर्बल ?
सांडले ना त्यांचे लाल ताजे लखलखते रक्त खंदकातून ?
सुवेजचा कालवा तर श्रमिकांची
विजयी पताका,
चीनच्या प्रचंड पुराण भिंतीतून येतात आजही
श्रमिकांच्याच दुर्बल ओल्या हाका!
कोरलींत पाषाणात सूर्यचक्रें कोणी ?
खजुराहोचे निथळतें शिल्पसौंदर्य
ओघळलं ना श्रमिकांच्या बोटातून!
वेरुळची उभी पाषाणसृष्टी
दुर्बलांच्या घामातून,
पाझरतात ना आजही चंद्राचे कोवळे किरण
दगडांच्या वाकल्या पोलादी रेघांतून ?
आहेत कोवळे रंग ओले गच्चगार
अजिंठ्याच्या लेण्यांचे,
आहेत ना मागे उभे सृजनशील हात श्रमिकांचे ?

असंख्य पसरलीत या प्रदेशात पाषाणशिल्पें
वाटेवाटेवर, .
गातात ना तीं गाणीं मानवी व्याकुळ जीवनांची.
देतात ना ती ओळख
राबणाऱ्या श्रमिकांच्या थबथबत्या वेदनेची.
आळवितात हे पाषाणही प्रदीर्घ सूर
आकाश भरून येते तेव्हा
सांगतात ना ते प्राचीन कहाणी
मानवी नभव्याकुळ शोकात्मतेची !
इतिहास या देशाचा दुर्बलांचा
सत्यात उगवणारा;
इतिहास पराजित घटनांचा
दुर्बलांच्या असहकारातून जन्मलेला.

ऐका कालवृक्षावरील पक्षांची गाणीं
मोकळया मनान, खुल्या दिलान—
ध्वनींच्या वाहत्या धारेतून,
उमटते दुर्बलांच्या ताकदीची रक्तरेघ.
पाषाणही सांगतात इतिहास घामाचा
मंदिरातूनही येतात प्रतिध्वनी
दुर्बलांच्या श्रद्धाळू भावनांचे.
प्राचीन नद्यांमधून वाहते पवित्र पाणी,
दुर्बलांच्या परिश्रमाचे.
दुर्बल या देशाचे भाग्यविधाते;
पुसलीत मात्र नावें त्यांची
देशाच्या इतिहासातून मिजासखोरांनी.
आहेत काहीं पानें व्यापलेली, दिमाखात
किल्ल्यात दडून बसलेल्या इथल्या वतनदारांनी.

उभारले मराठी राज्य शिवरायाचे
दुर्बलांनी, माझ्या पूर्वजांनी
पहाडाखाली रावणाऱ्या माझ्या नात्यातील मावळ्यांनी;
या इलाख्यातील माझ्या रक्ताच्या साऱ्या कष्टकऱ्यांनी
अरे ! आठवा सारे प्रसंग मिरासदारांनाही
टाळता न आलेले
दुर्बलांच्या अभंग, अक्षय निष्ठांचे
अरे, उघडी करा आपल्या हृदयांची बंद कवाडे
येऊ द्या मुक्त प्रदेशातून वाहात येणारा
मोकळा वास्तव, समजूतदार गार वारा.
व्हा थोडे उदार,
निदान इतिहासाशी राहा प्रामाणिक जमेल तेवढे,

अज्ञान घटना दडपता येत नाहीत रे
नाही दडपविता येत सुदीर्घ आक्रोश, आकाश विंधणारा
आग विझवता येत नाही सत्याच्या शोधाची
सागरालाच लागलेली···

कोठे होता वतनदारांनो तुम्ही ?

घडली ललामभूत घटना अभिषेकाची या
देशाला ?
पहिल्यांदाच उभविलं मराठी राज्य एका
दुर्बलाने तेव्हा ?
हा तर पहिला प्रारंभ इतिहासाचा
सूर्यपुत्रा जिजाऊच्या कुसेतून जन्मलेला !
आठवा ते सोनकंपित अभिषेकी दिवस
दुर्बलांनी काळातून खेचून आणलेले !
तेव्हा होता वतनदारांनो तुम्ही
वंशावळ मांडीत,
जुन्या अस्थींना विचारीत...
किती दूर,
तेव्हा थांबलात किती लांब प्रतिष्ठेच्या सोनकोषात.
तेव्हा राहिलात सुदूर
वंशाची अस्मिता सांभाळीत.
तेव्हाही घडविला अभिषेक दुर्बलांनीच
आपल्या दुर्दम्य ताकदीन,

आज झालात वारसदार,
भगव्या गंधाचा टिळा लावून, कालचक्र
बदललेलं पाहून—
आहे काय नोंद इतिहासात या
दुर्बलांच्या अथक ताकदीची ?
आहेत काय त्यांची सारी नावं
पानावर अम्लान रक्तात कोरलेलीं ?

या देशाचाच इतिहास घडविला दुर्बलांनी
नावाची हाव न धरता.
असंख्य अनाम पहाडी दरिद्री हातांनी
उभविलीं स्वराज्याची तोरणें.
विसरलात हीं नावं सोयीन
झालात हक्कदार स्वार्थाच्या प्रेरणेन

बाप हो ! गरीबांची मनं असतात उदार,
झुलतं त्यांच्या खोल डोळ्यात स्नेहमय विशाल आकाश !

पण बापा,
भूकेच्या वाटेन चालतात रे गरीबांचे
क्रांतीचे आरक्त सूर्य,
उमलतात त्यांच्या करपलेल्या ओठांवरही
प्रीतीचे कोवळे चंद्र!
त्यांचही रक्त सळसळतं अन्याय,
अत्याचार साहून,
त्यांची हृदयें भरून येतात
सहानुभूतीचे आषाढी मेघ खांद्यावर उतरलेले पाहून.
तीही असतात माणसं,
माणसांसारखी
वाहते ना लालच रक्त त्यांच्या धमन्यामधून ?
फुलतात ना सर्वत्र रानगुलाब
डोंगराच्या घळीत
उंच, खुरट्या तरारलेल्या झाडांवरून ?
झोपडीतील कण्हणारा क्षीण मंद प्रकाश,
असतो ना ?
एकाकी ओसाड मंदीरातील मौनव्रती प्रकाशासारखा ?

जन्मच त्यांचा का ठरावा शापीत ?

जन्म हाच एक अपघात.
तो घडतो तर्काच्या वाटा बुजल्या जातात तेथे.
मनही कुंठीत होते,
शब्दांच्या पोटातच कसे असतात दडलेले
तरल, चैतन्यमयी अर्थांचे प्राण!
जेव्हा मेघही सागरातील दडून बसतात मृगातील
कशीं फुटतात पानं काटेरीं झुडुपांना ?
कसे उगवतात सागवानी वृक्ष पोलादी खडकातून ?
कसा बाहेर येतो जीव
हिवराच्या काटेरी फांदीवर लोंबणाऱ्या
गवती खोपटातून !
कशीं पाझरतात आकाशवेधीं गीतं
सूरदासाच्या आंधळ्या जिवंत डोळ्यातून !

कशीं उमटतात झुरणारीं वलयं
सीतारादेवीच्या मातीच्या पाऊलातून
कसे उसळतात प्रणवी अभंगाचे तरंग
चोखोबाच्या उपेक्षित उद्ध्वस्त गाळतळातून ?

या प्राणांना होते काय हक्क बाजारातून
कूस विकत घेण्याचे ?
त्यांना होते काय स्वातंत्र्य
घरंदाज वैभवी कूस निवडण्याचे ?
बदलवून घेता येईल काय माय त्यांना

बदलवून घेते नाजुक कमरेवरची नवी साडी
गुलहौशी मॉडेल राजविलासी प्रदर्शनातून !
बदलवून घेतात चतुर राजकारणी
आपल्या निष्ठा रात्रीतून,
बदलवून घेतात व्यवहारी राजकारणी
आपले नेते सहज उंबरठे ओलांडून.

बदलवून घेता येईल काय
या सडलेल्या समाजरचनेतील जात त्यना ?

त्यांचीही कूस असते पवित्र
आपल्या आईच्या कुसेइतकीच.
बाप हो ! तेही असतात ना इतरांसारखेच
रक्तमासांच्या चिखलात वळवळणारे जीव ?
आहे ना सर्वांचेच नाते शेवटी
टेकडीला वळसा देऊन वाहणाऱ्या
नदीतील पाण्याशी एकच ?
या विशाल देशातील निळ्या आकाशाखाली,
नक्षत्रें गातात ना मंगल गाणीं त्यांच्याहीसाठी ?
त्यांच्या सुकलेल्या शतकांच्या बहिष्कृत चेहऱ्यांवरून
फिरतात ना
ते अज्ञात दिव्य हात,
क्षितिजाला टेकलेल्या
पर्वताच्या टेकड्यावरील घनःश्यामाचे ?

चर्चमधून येतात ना मंद स्वरांचे पांढरे सुगंध
उत्तररात्रीं सर्वांनाच मोहरून टाकणारे ?
कबरीतून ऐकू येते मला नझरुलच्या
आत्म्याची करुणेची अखंड हिरवी हाक
साऱ्या मानवजातीला भिजविणारी !
येते ना लेण्यातून पिवळी करुणा
पोळलेल्या मनावर सुखाची पखरण घालणारी ?
येतात ना तीर्थंकाराचे हुंकार
पांढऱ्या अबूच्या तपोवनातून सर्वंकष मानवजातीच्या
कल्याणासाठी निघालेले !

ऐकू येते मला या प्रेषितांच्या परंपरेतील
मराठी कवितेतील एकच ओळ माझ्या नात्याची
'मानव तेहि, मानव आम्ही.'

बाप हो ! मी नाकरीत नाही तुमच नातं
सूर्यकुलाच्या कवितेशी,
मी नाकारीत नाही दुःख,
यंत्राच्या चाकातून चकऱ्यांशी फेऱ्या मारणाऱ्या आत्म्याच.
मी नाही नाकारीत त्यांचा रक्तशोष,
स्तब्ध बसू देत नाही प्रज्ञाकांतांना.
मी पाहतो दैन्यात न्हाणारें या देशाचे राजमार्ग,
मी जाणतो मुडक्या हाडाचे वावरणारे सापळे
फिरतात यंत्रावर मालकांच्या,
मीही कळवळतो : या देशात नसतें घर, ना दार माणसांना.
आकाशाच्या फाटक्या चादरीत
उब घेत पडलेले मार्गावरील माणसे मीही पाहतो.
मासोळ्या याव्यात टोपलीत भरलेल्या विक्रीसाठी तसा—
मी पाहतो देहाचा विक्रय उघड्या बाजारात,
गिरणीतून घरी बसलेल्या बापाचे पोट भरणारा.

मी पाहतो काचमहालातील निळ्या प्रकाशात
गुलाल सडा,
एका रेशमी उबेसाठी
अनोळखी दणकट बाहूत कोमलगात्रांनी सांडलेला !

नियतीची किमया अतर्क्य—
गरीबीतही असते भूक जाळणारी,
श्रीमंतीतही असते भूक जळणारी!

बापा रे! गरीबी भरते या देशात नजरेत
आहे तिला अजूनही स्वतंत्र अस्तित्व रचनेत,
तिचा दिसतो मुक्त आविष्कार
फिरते ती मंद
पाऊलं टाकीत या वसाहतीतून.
सारेच येथील आहेत बुडालेले
तिच्या कृपावंत बधीर अंगघोळ साऊल्यातून!

तिच्या गूढ मेहेर नजरेने
आहे येथे साऱ्यांनाच पांगळं केलेलं.
समोरच्या पहाडातील रानझुडूपासारखं,
आहे साऱ्यांचच जीवन वाळलेलं.
तुटलेल्या पाण्याच्या प्रवाहात
उभीं राहावींत फांद्यांची सरळ बोटं
निळ्या आकाशात
गावींत नक्षत्रांना ऐकू येतील अशीं
व्यथेच्या प्रवाहातून वाहात येणारीं गाणीं!
वाहतात येथे आसवांच्या नद्या
गरम निळ्या पाण्याच्या.
आहे या देशाची कृपा,
निदान आहे त्यांना स्वातंत्र्य आपलेंच
दुःख कुरवाळण्याच,
रक्तहीन डोळ्यांच्या वाळलेल्या पापण्यांच.

आहे गरीबीन एक दीर्घ किंकाळी फोडलेली
आहे संबंध धरती देशाची
सत्तेच्या उबदार दुलईत
अजूनही पेंगुळलेली!

आहेत त्यांना आदेश
हात जुळविण्याचे न बोलता,

आहे ना पोट रित तुमच ?
ऐका तर—
आदेश एक कतारवाल्यांचे !
भरा पोटात काठोकाठ—
राष्ट्रप्रेम,
ओसंडू द्या हृदयाच्या बाहेर त्याचे थेंब !
व्हा देशप्रेमात भिजून चिंब आणि
जुळवा आता आपले
वाळलेल्या निष्पर्ण फांद्यांचे हात सायंकाळी फडफडणाऱ्या
या ध्वजासमोर

आणखी हा एक सोहळा
या देशाच्या स्वातंत्र्यदिनाचा—
करा वंदन जमून सारे वर्तुळात मुकाट्यान.
म्हणा आणि गाणीं स्वातंत्र्याची—
आहे ना तुम्हालाही पटलेलं
झाला आहे देश गुलामीतून मुक्त, अगदी मुक्त !
आहात ना तुम्ही स्वतंत्र आता,
खुल्या प्रांगणात वावरणारे नागरिक ?
आहे ना तुम्हाला खरं स्वातंत्र्य
कष्टान मिळालेलं—
तुमच भाग्य घडविण्याच ?

पाहिलत ना—
असतं किती सुख स्वातंत्र्यात ?
निदान स्वतःच दारिद्र्य सांभाळण्याच—
हृदयाच्या काठावरून ओसंडणारं,
कोरडं हास्य करण्याच मुक्त मनान ?

ऐका ते भाषण नेत्याच—

वाहते आहे पाहा ती दिव्य परंपरा
या देशात,
शुभ्र बर्फाच्या शिखरावरून घरंगळलेली
कन्याकुमारीच्या निळया पाण्यात आताच उतरलेली.

मित्रा रे ! फुलतात इथे हिवाळे वर्षभर
काश्मीरच्या सफरचंदाच्या तांबूस बागातून,
हिमालयाच्या शुभ्र शिखरांवर
उतरतो येथे सूर्य,
सहस्र सूर्यांत होते त्याचे परिवर्तन.
वाहतो तो खळाळ प्रकाश
गंगेच्या पाण्यात काठाकाठाने.
उतरतात येथे चंद्र फुलांत,
मोहरतात त्याच्या पाकळ्या पाकळ्या येथील सोनेरी वेल्हाळ केसातून.
रंगतात येथे मधयी विडे
तांबूस गौर रुक्मिणींच्या कंठातून
उतरतात येथे निळीं नक्षत्रें
महालांच्या प्रांगणातील कृष्णकमळाच्या वेलीतून !

विसावतात येथे प्रचंड बेहोषी मद्यपी साऊल्या
उंच इमारतींच्या जवळ,
अफाट पसरलेल्या या समुद्राच्या प्रकाशकंपीत पाण्यातून.

होता हा देश समृद्ध तुमचा—
आहे हा देश आज
तुमच्या रक्तावर पोसलेल्या गुलहौसी पाखरांचा.
उभ्या राहतात उंच इमारती ज्यांच्या श्रमातून,
आहे हा देश
इमारतींना स्वच्छ करु पाहणाऱ्या उपेक्षितांचा.
उभा केला हा देश
जीवनाच अर्घ्य देऊन ज्यांनी
आहे हा देश
त्या इमारती खालीच झोपड्या
उभारून राहणाऱ्या श्रमिकांचा.
उगवलीं नाहीत कोवळीं सुखं स्वातंत्र्याची
पहाडावर,
आहे हा देश
दरीडोंगरात अजून अर्धपोटी राहणाऱ्या विजनवासींचा,
शेतात राबणाऱ्या कष्टाळू श्रमिकांचा.

मी पाहतो हा देश असा आणि
वाटते मित्रा,
गळून गेले तुझ्या कवितेच्या मुठीतून—
या देशाच्या संस्कृतीच्या कृपेन,
शतकांपासून धडा वेगळीं बधीर झालेलीं दुर्बलांची मुंडकीं
मेलेलीं गुरं वाहून वाहून
चट्टे पडलेले अनारंभ काळापासून दुबळे हात आणि शेतात
कोयत्याने कापलेल्या बोटातून सांडलेलं माझ्या बापाच
काळं टिक्कर, वाळलेलं रक्त लाल!

रात्रंदिन असतो रे इथेही प्रसंग युद्धाचा,
रात्रंदिन येतो रे इथेही महापूर,
तुमच्या हृदयातून वाहणाऱ्या वेदनेचा.
सुख येतं इथं हिमप्रदेशातून येणाऱ्या
हंगामी पक्षांसारखं.
उडून जातात रे चुकून आलेले
सोन्याने मढविलेल्या पाऊलांचे सुखाचे काऊ,
या उजाड हृदयातील दुष्काळी इलाख्यातून.

आहे इथं एकच शाश्वत, एकच सत्य
'दुःखाचियां डोहीं, मरणाचे डोहाळे!'

मी पाहतो—
दलितांची वस्ती येथील :
एक यातनांचा शेवाळलेला पुरातन कुंड,
गावाच्या स्मशानासारखी वैराण नदीच्या काठावर.

पडतात येथे दुःखाचीं सनातन उन्हें.
पासाळ्यात येथे
उगवतात रखरखते उन्हाळे!
उन्हाळ्यात येथे फिरतांना पाहतो
भूकेकंगाल देहाचे सापळे...
'भाकर दे गा माय' येतात व्यथाकुल हाका रात्रभर.
मरून पडतात काही उकीरड्यावर, ढीगभर.



अडकवीतात वस्तीतील मुलं रिकाम्या फाटक्या पिशव्या खांद्यांवर
फिरतात वणवण प्राण्यांचीं, माणसांचीही
हाडे जमा करीत.
सहज येईल मोल बापाच्या चहापुरतं
घेऊन गेले शहरात तर खताच्या कारखान्यावर.
कधीं हीं मुलं,
वेचतात उकीरड्यावर काचतुकडे,
रांगोळ्या मांडायच्या असतात
शुचिर्भूत घराघरातून.

उचलतात काचकुंड भुकेल्या पोटीं
पाहतात रंगांची विविधता,
सूर्याच्या किरणांना गुंतवून तुकड्यात.
मोहरतात त्यांचीही मनं आदिम,
मृगजळी इंद्रधनुष्यांच्या रंगांच्या वर्षावातून !
'तुकडा किती नाजुक'
म्हणतो कोणी.
कोणी आणि
'हवेलीतील सावकारकन्येच्या
बिल्वरांचा फुलदेही.'
'वक्रभाग अजूनही याचा लहान
नाही रे पुरता मोहरला हात
रसरसत्या यौवनान.'
'आहेत रे बिल्वर भरले
हृदयशून्य राकट हातान'
'हा रंग याचा हिरवा'
'याचा आणि...जांभूळगाभा'
'हा लाल'
'तो गुलाल आणि...'
'हा मलूल जीवघेणा
आहे येथे दबलेला मनोभंग टिचका दिवाणा.'

पाहतात सारे रंगांची दुनिया
काचकुंडाच्या ढिगातून,
हातात कुरवाळतात तुकड्यांना,
लाभते त्यांना सुख कल्पनेतील —
काचकुंडासोबत उकिरड्यावर आलेल्या
सावकारकन्येच्या हातांना स्पर्श करतांना.

बापा रे, या देशात
मुलं तुकडे वेचतात,
आणि पोट भरतात.
मुलं तुकडे तुकडे होतात,
आणि पोट भरतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय
आव्य
२४५९
२२८९६

मुलं तुकडे वेचीत वेचीत
बेवारस कुत्र्यासारखं
भुकेनं गळून पडतात.

सकाळ येथे चिखलात उगवते
कोवळ्या किरणांनीं ओल्या पिरगाळलेल्या पातळासारख्या
चिरगुटल्या अंगावर
चुकून सोनसडा घालते.
झोपडीच्या मोडक्या पांगळ्या दाराजवळ
इवल्या मुलाच्या फाटक्या पोटात भूकेनं करकरते.
पुरात वाहत आलेल्या गाळावर
पडाव्यात उन्हानं तडकलेल्या भेगा
सुरकुतलेल्या चेहऱ्याची जख्ख म्हातारी,
सकाळ बघते बाभळीच्या पानात गुंतलेली.
पाहिली पाहिजे निदान नजर आहे तोवर
या संस्कृतीसंपन्न आर्यांच्या प्रदेशात
उमलू पाहणाऱ्या निळ्या पहाटेची स्वप्नं !

सारींच गात्रं झडून गेलेला म्हातारा,
सरकत तिच्या जवळ येतो.
पाखराच्या मलूल चोचीनं,
गावातून रात्री भीक मागून आणलेले
भाकरीचे तुकडे,
चघळत बसतो एकट्यानच !

आणि म्हातारी,
सुरकुतलेल्या पिवळ्या,
वांग्यासारख्या एका खोल डोळ्यात
पोटातील आग दाबीत,
त्याच्या हातातील सोन्याच्या पिठाळ तुकड्यांकडे
पाहात राहाते एकसारखी आणि
दुसरा आंधळा डोळा,
समोरच्या मुडक्या खोपटाकडे वळविते सहजतेनं...

गवती खोपटात
काशीच्या झिपऱ्या केसात
उवांच्या अंगावरुन,
हलक्या पाऊलांनी सोनेरी सकाळ फिरत असते.

तोंडातील जांभई दाबीत,
केळगाभ्या अंगावरील उत्सवी ठसे मिटवीत
पारु चवन्नी टाकीत चाय मागवीत असते आणि
हुन्नरी सकाळ,
ऊस मळ्यातून आलेल्या नवागताला
अर्धी मांडी दाखवीत
रात्री सुरमा घातलेल्या डोळ्यांन
खोपटात,
कोवळया उन्हाचा पानविडा देते!

अरे, वस्ती येथील पुरातन तिमीराची
पलीकडे उगवतात अभिषेकी सूर्य,
येतात काही तांबूस किरण
उपेक्षेचे निरोप घेऊन.
हालत नाही येथील पाषाणमयी प्राचीन गुहेत
राहावा साचून
घनदाट ओला काळोख.
किरणांची पाऊलं पडतात दबकत,
भीतीच पाझरते येथे पानं झडलेल्या
बाभळीच्या काटेरी बनातून.
येथं घोंगावते नुसतं वादळ,
केवळ वादळ
शतकांच्या ओल्या ठिबकत्या वैफल्यातून!

इथं येतात नुसते वारे
ढोरकुंडावरुन दुर्गंध वाहून आणणारे,
इथं करतो निसर्गही प्रहार,
कठोर प्रहार
दुबर्लांनाच भरल्या प्रहरी संपविणारे!

बापा, मी पाहतो रे, येथील माणसांच्या
सडलेल्या जखमी गात्रातील पू
होरपळतात रे येथील जीव
या देशातील प्रस्थापितांनीं लावलेल्या वणव्यातून.
कचाकचा कापले जातात
माणसांचे उभे हिरवे वृक्ष
फोडले जातात माणसांच्या डोळ्यातील सूर्य,
तापलेल्या सळईन.
फेकले जातात लखलखणारे क्रांतीगर्भ
डोळे,
सागराच्या अथांग काळोखात
थांगही लागू नये या वाहत्या
प्रवाही दिशेचा
फुलं फेकावीत सहज गमतीन !

बापा रे, येऊ दे रे हे वेदनेचे पदर
तुझ्याही कवितेच्या लफ्फेदार पैठणीला
येऊ दे रे ! कवितेतून त्या ओल्या आर्त अब्रूदार हाका
लांबच्या पहाडाच्या कुशीतून फुटलेल्या.
ऐकू दे रे ! तुझ्या शब्दांना,
त्या असहाय्य अबलेने बलात्कारानंतर
फोडलेल्या, रक्ताळलेल्या सुदीर्घ किंकाळ्यांना.
पाहू दे रे ! त्यांना माणसांनाच जाळणाऱ्या
त्या हिंस्र भगव्या अहंकारी ज्वाळांना !
इथ आहे साम्राज्य दहशतींच.
इथ वाजतात रोज पडघम अन्यायाचे,
घडतात येथे अत्याचार सूर्याला साक्षी ठेवून
झोपड्यामधून वावरते येथे दबलेली गूढ भीती-
मस्तवाल प्रस्थापितांची,
दुर्बलांच्या छातीत बसतात इथं लाथा
मुडतात इथं हाडं,
रानातील जोंधळ्याच्या पेरकंडांसारखीं.
कापले जातात इथं पाय अन्यायी करवतीन,
पळविल्या जातात दुर्बलांच्या बायका

रानाच्या अंधार वाटान.

मी पाहतो सारं उघड्या डोळ्यान
डोळ्यात पडावेत तेजाब थेंब जळजळीत
कानात पडावा लाव्हारस उकळलेला
खदखदतं माझं मन, मनच माझं दुबळं!

मनच माझं शब्दांशी बांधलेलं
गात्रंच सारीं सुखान मंत्राळलेलीं!
शरीरच दत्तक सुखांनी सडलेलं,
हृदय माझं,
स्वतःच्याच बांधवांना पार विसरलेलं!

उठतो रे तरीही आवाज आतून
होतो मीही ओलाचिंब,
फिरलेले अत्याचारी नांगर पाहून.
उठतात आकाशव्यापी प्रश्न माझ्याही मनातूनं—

सुकून गेले काय या देशातील
सारे सप्त नद्यांच्या काठी पिकलेले
सहिष्णुतेचे मळे?
थांबली काय गंगेच्या काठावरील
करुणेची हाक?
तुटली काय कबीराच्या दोह्यातील
स्पंदनाचीं नातीं!
विसरला काय फुल्यांनी पेटविलेला
संघर्ष, दुर्बलांच्यासाठी?
विरला काय शाहूच्या
धिप्पाड छातीतील महामंत्र?
मावळली काय या देशाला दिलेली
ती महात्म्याची अहिंसेची शिकवण?
मावळलेत काय आग्रही समर्थ हातांनी आणलेले
स्वातंत्र्यातील सत्याचे किरण?

सुकला काय तो अंगावरचा
गुलाब विश्वप्रीतीचा ?
विसरलात काय खरा धर्म
विश्वाला दिलेला
या देशातील 'विवेकी' मनाच्या मातीचा !
'स्वातंत्र्य कशासाठी ? कोणासाठी स्वातंत्र्य ?'
झाले काय,
या स्वातंत्र्यवीराच्या शब्दातील जादूचे विस्मरण !
झाली काय सुजलाम् सुफलाम् ही धरणी
देशातल्या मग्रूर धनवंतांसाठी केवळ ?

असतात काय राष्ट्रगीताचे अर्थ,
फडफडावेत राष्ट्रदिनाच्या समारंभासाठी केवळ ?

बाप हो ! येथील माणसं मुर्दाड
बनवलीत आम्ही शतकांच्या ओझ्यान.
त्यांना नाहीं स्वतःचं मन
त्यांना नाही आलं स्वतःचं अस्तित्व
त्यांना नाही जगू देत कोणी
सहजात प्रेरणांच्या वाटांनी,
त्यांना नाही उमलू देत कोणी,
फुटावेत पहाडी गुल्मोहर लालभडक रंगात
स्वच्छंदपणान.

बाप हो, तुमच्या झोळया आहेत
भरभरुन अस्मितेच्या मोहरांनी,
तुमच्या छातीत आहे रग
प्रस्थापनेतून पाझरत आलेली.
तुमच्यात आहे झुलतं पौरुषत्व,
परंपरेच्या आधारान जन्मलेलं.
तुमच्यात नांदते उफाळलेली धग,
दलित वसाहतींना जाळून टाकणारी.
या देशात आहे खुनशी धनवंत संस्कृती

दलितांच्या अब्रूदार बायांनाच
नागव्यानं हिंडविणारी,

आहेत मातीवर श्वापदांचीं काळीं पाऊलं
भगवे हुकमी ठसे उमटविणारीं.

तुमच्या कपाळावर आहेत शेंदरी टिळे
लक्ष सूर्यांना बंदिस्त करुन.
ओंजळींत आहेत तांबूस सप्तसागर
'अर्घ्य देहिं' साठी.
कळवळतात मात्र इकडे जीव,
दयेच्या एका कृपावंत थेंबासाठी !

धडपडतात इकडे माणसं
एका नव्या आकाशासाठी,
किंचाळतात खोपटात पीडित
या आकाशात उगवणाऱ्या
एका मुक्त सूर्यासाठी !

बापा रे, मला लागतेय गूढ चाहूल
युद्धरेषेवर माणसं ताठ उभी ठाकलेली,
आहेत एका निष्पर्ण बाभळीवर
त्यांनीही युगापासून
पाजळती, जळती शस्त्रे लपविलेली...



पांढऱ्या ढगांच्या वाहत्या थव्यातून
होतात काही भास,
सूर्यास्ताच्या वेळी सागराच्या तांबूसनिळ्या पाण्यावर.
चकाकतात काही विचल क्षण
सायंकाळच्या ओल्या व्याकूळ वेळी.
खोपटात येतात अथक पाखरं
निष्पर्ण झाडाच्या रक्तवांझ डहाळ्यांवर.
फुटतात सूर मेघमल्हाराचे
विझून जाणाऱ्या जीर्ण देहातून.
फुटतात शब्द चिरंतन
उजाड पहाडी एकाकी प्रदेशातून.
पर्णगळ झालेला पळसही
ढाळतो फुले लाल—
ओघळावीत लाल गालांवरून रमणीच्या
आनंदात बुडून गेल्या नंतरची
टपोरी खंडित आसवांची रांग,
लगडावेत पुष्कराजखडे पळसाच्या डहाळ्यांवर
गुंतवून लाल तांबूस कंपीत किरण
मावळत्या सूर्याचे !

खरखरत्या उन्हाळी नभातून
येतो तेजस्वी लालफिका तारा
पसरतात त्याच्या अंधूक छटा
वाळलेल्या पांढऱ्या गवती
भकास पहाडी टेकड्यांनाही अस्वस्थ करणाऱ्या
मुलायम उमटतो स्पर्श अनेकदा
काळ्या पाषाणाच्या अंगावरून
लांब क्षितिजकडेतून उगवत्या कोवळ्या चंद्रकोरीचा
हसतात अनेकदा वाळलेल्या
वृक्षांच्या फांद्या उत्सवान
ओल्या वाऱ्याच्या लाटा दुरून येतात
कळाहीन क्षीण अंगावर तेव्हा.

सोंदळच्या झाडातही असतें लोंबलेलें

मधाचें पोळे लपलेलें.
वारूळातून निघालेल्या पाहुण्या
मुंग्यांच्या अंगावर
असतात पोळ्याच्या काळ्या जिवंत नभातून
काही अमृताचे थेंब गळालेले!
सृष्टीचे आहेत हात विशाल
पाझरतात त्यातून दयाकुल
अमृताचे झरे त्रिकाल!

अमृताच्या चैतन्यथेंबातून
घेतात जन्म
मातीतून वर आलेले महामानव
येतात बाहेर काळाचे आवरण फोडून
उसळत्या तेजस्वी सूर्यासारखे!

नियती जन्म देते त्यांना
ते जन्म देतात नियतीला.

आपल्या अदम्य कर्तृत्वाच्या बळान
घडतात ही माणसं काळाशी संघर्ष देत.
त्यांच जीवन असते
एक न तुटलेल्या ओळींचे अक्षय संग्रामगीत!
आकाशात फिरणाऱ्या सायंकाळच्या
पहाडी टेकड्यांवर
विहरणाऱ्या पाखरांच्या रांगासारख अखंडित.
यावेत ढग गच्च काळे—लाटाच लाटा
समुद्राच्या काठावरून स्वयंवेगात
भिजवावी सारी काळी माती आवेगान.
असावा वाहता प्रकाश आकाशगंगेच्या
उतरावेत शेवटचे प्रकाशथेंब लांबच्या
धूसर पहाडावर—
महामानव वावरतात तेथे विदेही मनान.
ते असतात अम्लान ज्वाळेचे आरक्त प्रतिनिधी
दूरच्या काळावरून

प्रवास करीत आलेले राजहंस !
ते असतात धुमील प्रदेशातून आलेले काळपक्षी
जांभळ्या नक्षत्रांवरून
मातीवर खाली उतरलेले, पंख फुलारलेले प्रेषित कृपावंत !

सरावेत दिवसांमागून दिवस
शिल्प कोरतांना पाषाणात,
उतरावा त्या घावातूनही वाहता
निसटता क्षणमयी काळ.
उभं राहावं लावण्य रेषेतून,
व्हावी काळाची जाणीव
उमटलेल्या सखल साऊलीतून.
सारंच आसमंत जावं ओठंगून
साध्या कलत्या नजरेच्या जरवेतून
काळही घेतो अस्तित्व अशा वेळी
विशाल इतिहासाच्या फडफडत्या पर्णांतून.
उमटतात कर्तृत्वाचे ठसे
शब्दांच्या मुलायम हृदयाच्या गाभ्यातून.
उरतात महामानव अलांछन चंद्रमेसारखे
मंद प्रकाशाने वाट उजळीत,
असते शांत तेवत पणती अस्तित्वाची
मोडक्या गवती खोपटातून.
महामानवाची दृष्टी असते हो पसरलेली,
देशाच्या लांबच्या वाटांना आधार देणारी.
ऐकू येतात त्यांना लांबचे स्वर
येऊ पाहणाऱ्या शतकातील दिवसांचे,
असते त्यांना अचूक निदान
घडणाऱ्या भविष्यवेधी घटनांचे.
उकरतात ते पापुद्रे,
भविष्यातील मानवी जीवनाच्या संभाव्य प्रपातांचे.
कानावर पडतात त्यांच्या झंकार
झाडांच्या फांद्यातून घुमणाऱ्या स्वप्नवेधी संगीताचे.
ओल्या मातीतून यावेत नवे कोंभ तरारत
येतात त्यांच्या मनात रुजून प्रसंग,

अवकाशात बद्ध पाहणाऱ्या मानवी जीवनातील नाट्याचे!
थांबतात मानवी डोळे जेथे
त्याहून पलीकडचे,
पाहतात त्यांचे डोळे घुमसत्या नभाच्या कोपऱ्यातले!

चिमण्यांनी माराव्यात टोचा
आरशात उतरलेल्या प्रकाशाच्या तुकड्यांना
माणसांनीही धरावा चंद्र ओंजळीत
तळ्यात उतरलेला फिका,
जावा वाहात लांब प्रवाहात, वाहत्या मनासारखा
राहाव्यात रित्या चोची, आणि हातही रिते.

नाही गळत मानवी जीवन असं
महामानवाच्या युगंधर ओंजळीतून.
शब्दात असते जादू त्यांच्या
वास्तवाच्या मर्यादा ओळखणारी,
दृष्टीत असतात मंत्र पाझरत
कल्पिताच्या धुमील प्रदेशाचा शोध घेणारे.

असतो हो त्यांचा एखादा शब्द
झोकून द्यावी,
स्वतःची उभी जिंदगी ज्याच्यासाठी.
असते त्यांचे नाव कोरलेलें संदेशवाही
देशाच्या इतिहासात अक्षय,
नव्या पिढ्यांच्या कोवळ्या अंगावर
व्हावी उगवत्या चैतन्य किरणांची बरसात;
मिळावे मातीत उगवत्या रोपांना अभय.
महामानव असतात अखंडित मानवतेचे
ते असतात या पिकाऊ मातीचे,
देशाचे
ते असतात सारीं नातीं तोडून,
माझे, तुमचे, साऱ्या मर्यादा ओलांडून सर्वांचे
निदान जन्म घेऊ पाहणाऱ्या पुत्र-पौत्रांचे

घडतात या देशात खून मात्र
अशा महामानवांचे,
पडतात मुडदे पुण्यशील आत्म्यांचे !
जाळल्या जातात येथे भावना पावित्र्याच्या,
करपतात या देशात कोवळे कोंभ
सत्याला सामोरे जाणारे,
फिरतात जेव्हा घारीसारखे अपवित्र दिवस
वर्णवर्चस्ववादी हुकमी मनोवृत्तीचे.
हलतात जेव्हा काळ्या साऊल्या भयाण
एक कतारवाल्या प्राचीन उद्ध्वस्त
नगरीतील राजकुळी फेरीवाल्यांच्या.
पडतात जेव्हा महालातील झुंबरातील
अत्तराचे रूप घेऊन हिंसक
सोनेरीवर्णाच्या तत्त्वज्ञानाचे तेजाबथेंब,
जळून जातात या देशातील
पांढरे गुलाब अहिंसेचे !
महामानवाच्या दयाकुल हातातील
मालवून जातात दीप
काळभूमीवर प्रकाश पसरणाऱ्या सत्याचे !
खणून काढले जातात पहारींनी
प्रेषितांनी दाखविलेले,
राजरस्ते दबलेल्या जनतेच्या मुक्तीचे.
खुडलें जातें उन्हाच्या फांदीलाच लगडलेलें स्वप्न
भयमुक्त होऊ पाहणाऱ्या मानवाचे.

पाहा जरा डोळे उघडे ठेवून
मानवी जीवनाचे उदयास्त,
ज्ञात इतिहासाच्या कुसेत लांबवर शिरुन
उघडलेत डोळे मानवाने जेव्हा
पसरलेल्या कोवळ्या विस्तीर्ण कुरणातून.
आला उतरत पहाडाच्या रांगा
सखल, काळ्या मातीच्या सपाट प्रदेशातून,
फुलविल्या नदीच्या काठाकाठाने
उदात्त जीवनमूल्यांच्या श्रद्धेय वेली

आत्म्याच्या विकासाच्या,
शोधल्यात त्यांनी चंद्रवाटा नभांगणातून.

शिंपडलेत त्यांनी अमृताचे थेंब
प्रज्ञाकांत तपस्वी क्षीण शुभंकर ओंजळीतून.
पाहिलीत त्यांनी भव्य स्वप्नें
व्हावीत साकारीत
अखंड मानवांच्या उदयांतून.
पाहिलीत त्यांनी सुखाचीं पाखरं
मुक्त विहरणारीं
दुर्बलांच्या डोळ्याच्या विशाल आकाशातून !

शब्द वापरलेत त्यांनी,
मानवाला नव्या वाटेकडे घेऊन जाणारे.
हात उभविलेत त्यांनी,
प्रेमाचे दिव्य संदेश देणारे.
डोळ्यातून पाझरली त्यांच्या
करुणा, केवळ ओथंबलेली करुणा...
पाहिलींत त्यांनी भविष्याचीं स्वप्नें
पाहात होते त्यांचे डोळे लांबचे
मानवांनाच अखंडित
एकाच छताखाली वावरतांना.
महामानव घेतात जन्म मातीच्या खोपटातून
गाळालाही देतात मोल
उपेक्षित कुसेतून दीप होऊन !
उजळतात आकाशाच्या कडा
धुसरलेल्या शतकांपासून,
दिसू लागतात वाटा दुर्बलांना
केल्या होत्या बंद धर्ममार्तंडांनी
जुनाट परंपरेचा अहंकारी अंधार शिंपडून.

धर्म असतो काय माणसावाचून
जगत,
धर्म करतो काय उपेक्षा केवळ काहींचीच,

धर्म असतो काय वटिक हितवर्धिनी परंपरेच्या वारसदारांचा
धर्म राहतो काय नजरकैदेत केवळ मंदीरांच्या रक्षकांच्या ?
धर्म असेल जर गुलाम
या उन्मत्त परंपरेच्या प्रतिनिधींचाच,
फुटतील कशा वाटा त्यातून
विशाल मानवी जीवनाच्या विमुक्ततेच्या ?
धर्म नाही जाणत खोटी परंपरा
भिंतीच जणु उभारलेल्या मानवाने गर्वाच्या.
धर्मास नाही कळत विषमता,
कालप्रवाहात धर्माचेच अस्तित्व संपविणारी.
धर्म असावा वननीळ,
बरसावे ज्यातून प्रकाशसंगीत
साऱ्याच समाज घटकांचीं हृदयें भिजविणारें !

धर्म हा आचार
आतल्या हाकेतून उगवतात त्यातून
प्रज्ञाकांत डोळे नक्षत्रांचे,
सर्वांनाच समवेत घेऊन जाणारे.
धर्म घडवतो मानवी जीवन
एका वर्तुळातून फुटणारं नवं वर्तुळ उर्ध्वगामी.
धर्म नाही सांगत
वाहावें मानवी जीवन
कालविसंगत परंपरेने आखून दिलेल्या
एका सरळ रक्तरेषेवर !
धर्माची धाव असावी असीमतेत
मानवांच्या शाश्वत कल्याणी स्वप्नप्रदेशातून.
उधळलीं जावीत सर्वांवरच सुखाचीं फुलें
फुलविलें जावेत वृक्ष
उपेक्षितांच्या हृदयातील बरड मातीतही प्रीतीचे !

अमृताच्या अक्षय पाण्यान
द्यावी धर्मान चेतना मृत शरीरांनाही,
वाट दाखवावी चेतनेची
दुर्बलांकडे शक्तिस्रोत वळविणारी.

धर्माने शिकवावी मानवता आचारातून
सागराच्या विशाल प्राणांशी नातें सांगणारी !

इथं राबविला जातो मात्र धर्म
माणसांनाच माणसांपासून लांब नेण्यासाठी,
इथ वापरला जातो धर्म,
उपेक्षितात जन्मास आलेल्या महामानवाच्या नावावर
नवा संघर्ष उभा करण्यासाठी !

धर्म देतो काय श्रेष्ठत्व वंशाचे
उभ्या राहाव्यात अभेद्य भिंती
मानवतेचे प्रवाहच खंडित करणाऱ्या !
धर्म देतो काय सनद पावित्र्याची
आले आहेत जसे दूरच्या ग्रहांवरून
पहाडी पंख घेतलेल्या गंधर्वांना ?
धर्मच जेव्हा रचतो उतरंडया
मातीच्या मडक्याच्या
येतात तेव्हा चालत भयाण रात्री
धर्मालाच सुरुंग लावणाऱ्या.

वाटते बापा रे ! आहेत येथे सुरुंग पेरलेले
जातींच्या प्राचीन जीर्ण तटातून,
आहेत येथे कालविसंगत अभिमान
लपलेले, मातीच्या बुरुजातून.
आहे येथील समाज
जीर्ण विचारांनी पोखरलेला.
आहे हा समाज
शक्तिहीनांना गुलामीत डांबणारा.

उगवतात येथे दिवस
सरंजामदारी मनोवृत्तीचे.
पाहतात काही माणसं स्वप्नें
जुन्या राजकुळी सत्तेची.

पेटतात यातून संघर्ष
सर्वांनाच संपविणारें.
पेटतात यातून वणवे
सबंध मानवकुळालाच जाळणारे.
पाहतो मी माझ्या पायाजवळ,
जमीन येथील हादरलेली.
पाहतो मी,
आहे या प्राचीन सहिष्णु प्रदेशातून आज आग सर्वत्र पसरलेली !

बापा रे, होती ओळख मला
तुझ्या वाहात्या वेदनेची,
आली होती जाण मला
खांद्यावर उतरलेल्या तुझ्या आकाशव्यापी सघन दुःखाची.
घेतो मी तुझं दुःख सोबत आणि
फिरतो या प्रदेशातून,
पेटलेल्या सर्वस्वाही वणव्यातून.

पाहतो उघड्या डोळ्यातही न मावणारे आकाश
वितळून गळालेलें, झिरपतें दुःख...
उन्मळून पडलेल्या शोकमग्न खोपटातून.
यावें वादळ प्रलयकाळातील,
सारे वृक्षही खोल रुजलेले
ढासळावेत आणि सारीं घरें चिरेबंदी.
पुरातन भिंत संस्कृतीची
जावी कलंडून
व्हावेत जळक्या मातीच्या ढिगात बंदिस्त क्षणार्धात.
जावें सारें अपराधीं अवकाशच झाकोळून,
यावा एकच एक थरथरता काळोख
हुंकारीत ओला वेदनेचा,
यावा एकच एक कापरा सूर सर्वत्र
फुटलेल्या असहाय्य खोल दीर्घ किंकाळ्यांचा !

डोळे व्हावेत मूक, भकास
कान व्हावेत बधीर, सुन्न

जावेत प्राणही शरीरातून कोमेजून,
पडावं आकाशातील उगवतं फुलही गळून,
राहावा काळोख, नुसता भयाण प्रलयकालीन काळोख
सबंध सुनसान अवकाशात भरुन.

मी फिरतो या काळोखबनातून
हातावर कण्हणारें दुःख घेऊन,
मी फिरतो गळत्या विदीर्ण हृदयान
ओल्या जिवंत जखमा बांधून,
मी फिरतो उजाड माळरानांत ठणकत्या मनान
खांद्यावर झोळी घेऊन,
पाहतो मोडून पडलेलीं माणसं
दूरस्थ, सन्यस्त राहून.

(बापा रे ! मी जाणतो,
येथेही मी गुन्हेगार
येथेही मी ओळखल्या
माझ्या मर्यादा;
मी केवळ
मुसीत शब्द घडविणारा शिकलगार)

पाहिल्यात मस्तवालांनी लावलेल्या आगी
जळाल्यात वाळलेल्या गवती झोपड्या
दुर्बलांनी कष्टाने उभारलेल्या.
ऐकल्यात मग्रूरांच्या विषारी धमक्या
माणसांनाच आगीत लोटणाऱ्या,
जळक्या मातीच्या भिंतीही
वाकल्यात आक्रमकांच्या भीतीन,
अर्ध जळून उरलेलीं
पाहिलीत वाकडीतिकडी झालेलीं
घरावरील भीतिग्रस्त, चरे उमटलेलीं जीर्ण पत्रीं
ओथंबलेल्या मनान !
पाहिलींत काहीं बसकीं घरं मातीचीं
आहेत अजूनही अर्धवट जळालेलीं,

आहे उपेक्षित खिडकीही एकाकी तशीच अर्धवट सरकलेली.

यावा थोडा वारा
यावा थोडा प्रकाश
इवल्या खिडकीच्या दीनवाण्या फटीतून
नाही मिळू दिलं तेवढंही
मिळत होतं जें स्वाभाविक अवस्थेतून.

आहे हा देश त्यांचा
वृक्ष त्यांचे
नद्या त्यांच्या
वारा त्यांचा
प्रकाशावरील हक्क त्यांचा.
सृष्टीत आहे जे जे चराचर
पडतो त्यावर शिक्का हक्काचा
येथील मग्रूर सरंजामदारांचा, जेत्यांच्या ताकदीचा,

समोर आहेत ओलीं लाकडं अर्ध जळालेलीं
आहे अजूनही त्यांत पेटती ठिणगी
दीर्घ काळ धुमसणारी,
आहे थंड लाकडांत आता आग दडून
येईल एक दिवस,
आता
डोक्यावरील आकाशाचं संबंध उफाळलेलें पेटून !

आहे पडलेला उखड्यावर विकलांग संसार
सूप, टोपल्या, दुरड्यांचा.
आहे एक ठसा गर्विष्ठ पायाचा दुरडीवर
निवांत इच्छातृप्त पहुडलेला,
पाहतो ठशातून रंग श्वापदांसम
खुनशी पाऊलांची,
पाहतो त्यातील भावना
गर्वोन्नत अनिर्बंध हिंस्र उन्मादाची.
दाखवितो हा ठसा

आदिम रानटी अवस्थेची दिशा,
दण्डकारण्यात होती फिरत
डोळ्यात लाल उतरलेली हिंसक नशा !

प्राचीन उद्ध्वस्त नगरीतून
उत्खननात सापडावेत दाणे धान्याचे
जावेत कुजून,
यावा दुर्गंध त्याचा,
असते ना ऐतिहाहिक मोल या दाण्यांना
सांगतात ना ते कण एक प्राचीन परंपरा
धान्य पिकवणाऱ्या उत्क्रांत मानवाची ?

आहे यातही लपलेली एक गाथा
धान्य भरुन ठेवणाऱ्या राजकुळी वतनदाराची.

आहेत आजही येथे जळक्या खोपटात
अर्ध जळालेले कण धान्याचे विखुरलेले.
आहेत त्यांच्याही अंगावरून फिरलेले वणवे
निर्दयी रानटी संस्कृतीचे.
फिरतात त्या मातीत कोंबड्यांचे थवे,
धान्याचा वास घेऊन
उचलतात त्याही कण चोचीत,
वेचतात कराल ज्वाळेतून उरलेले, पारखून.

इतिहासाच्या अभ्यासकांनो,
आहे ना तुमच्या संग्रहालयात जागा अजून या कणांसाठी
आहे ना तुमची बुद्धी तल्लख
वेचतात ना हळुवार उत्सवी हातान
उत्खननात सापडलेले कण,
घेतात ना तुम्ही पारखून त्यांचे ऐतिहासिक मोल.
रचतात ना इतिहास तुम्ही
कल्पनेचा आधार घेऊन,
जुळवतात ना अज्ञात धूसर काळ इतिहासाचा
प्राचीन नगरीतील वाटा शोधून.

करतात ना उभा लखलखता इतिहास
वैभवी राजघराण्यांचा,
उत्खननातील पुरातन वस्तूंच्या अभ्यासान.
चिकटलेल्या अमूर्त घटना
करतात ना जिवंत शब्दातून.
सांगतात ना तुम्ही नातीं चैतन्यमयीं
माणसांच्या परस्पर संबंधांचीं.
करतात ना उभा सारा सनातन इतिहास
उज्ज्वल सळसळत्या स्वरांनी.
उमटलेल्या पाऊलांचे ठसे
गाडलेल्या ओल्या मातीच्या घरातील
जातात ना शोधत अनुमानाची पणती घेऊन.

बाप हो! ठेवा हेही अर्धे जळके कण जपून
आहे यातही स्पंदनाचा इतिहास दडलेला.
गातात हे कण शोकगाथा, वास्तवात
पायाजवळ घडलेली
सांगतात हे कण दुःखाच्या विराट मनव्याकुळ कहाण्या
झोपड्या झोपड्यात जन्मलेल्या.

आहेत त्यांचे शब्द
लाल रक्तात थरारलेले,
आहेत त्यांचे स्वर
कोमट आसवात चिंब भिजलेले.

आहेत हे कण मोलाचे
आहे यात इतिहास सागराचा खवळलेल्या
आहे रे! यातही अम्लान अन्यायी इतिहास
काठोकाठ भरलेला,
आपल्या डोळयासमोर
स्वातंत्र्याच्या पक्व पिवळया उन्हात घडलेला.
आहे हा इतिहास,
विश्वबंधूत्वाचा संदेश देणाऱ्या या पुरातन सहिष्णु देशाने पाहिलेला!

आहे हा इतिहास ओल्या व्यथांचा
गोदावरीच्या महापूरासारखा प्रवाही,
आहे हा इतिहास या भूमीवर व्यापक
विराट, सामाजिक जीवनात उतरलेला
आहे मराठीचा समर्थ कोंभ जेथे जन्मलेला
घडला हा इतिहास तेथे, तेथेच
प्राचीन काळानेही धूसर स्वप्नातही कदाचित न पाहिलेला.
घेतलें मूल कडेवर
समतेचा मंत्र म्हणत ज्या महात्म्याने,
आहे त्याच गोदावरीच्या काठावरील
हा वारसा ढासळलेला,
उद्ध्वस्त कणाकणांनी टिचून,
आत्मतृप्त भोगचिंब मातीवर उन्मळलेला.

मी चालतो पुढे,
असते झोळीत माझ्या दुःखाचें थारोळें जमा झालेलें.
तीही ओलीचिंब लाल,
असतात वाटेवाटेने तिच्यातील रक्तथेंब सांडलेले.
थेंबागणिक आदिम आत्मे
या प्रदेशातील, अराजकात बळी गेलेले.
राहतात उभे हे आत्मे साऊल्यांसारखे
चालतात माझ्या बाजूबाजूने.
सांगतात दुःखीत दर्दभरी कहाणी.
उर फुटते,
ठणकतो माथा सुखाला चटावलेला.

मी चालतो वाट उन्हात
सुगावची पाहतो गावशीव आणि
मीच पाहतो बाप रे! माझे डोळे थिजलेले,
गात्रें थंड बधीर झालेलीं
साऱ्या नसांतून संवेदनाच गळून गेलेली !
पडावें पांढरें अंडे पक्षाचे
वाऱ्यांच्या झोताने,
काळ्या पाषाणावर खाली,

सांडावा कणकण वलकाचा तसे—
हृदय ठेचाळलं या घटनेवर
झालं विदीर्ण शोकमग्न !

घेतो सावरुन स्वत:ला आणि उठतो
पाहतो सामुदायिक हत्याकांड झालेले !
मीच पाहातो माझे,
चैतन्यहीन गुन्हेगार हात
फडफडणाऱ्या स्वतंत्र देशाच्या मानचिन्हाला अजूनही
वंदन करणारे !

बरड माळरानात जळालेले
पाहतो कुठे जळके बुंधे वृक्षांचे.
सर्वत्र पसरलेल्या काळ्या भयाण राखेच्या
वैराण भूमींतून
असते स्मशान शांतता पाऊले टाकीत निघालेली,
असतात तिच्या खांद्यावर
जळालेल्या बकऱ्या माना मोडून पडलेल्या.
असतात काळ्या मेंढ्या
अग्नीच्या धगीने होरपळलेल्या,
असतात कुठे कोंबड्या
मानेत मुरगाळलेल्या;
खुडाव्यात शेंगा वालाच्या वेलीवरील सहजतेन.

स्मशान शांतता चालते आत्म्यांसोबत
उठून दिसते तिच्या साऊलीची उंची,
फिरते ती काळातून रूप घेऊन अमानुष
चालते ती झाडांचे शेंडे स्पर्शीत
विदेही लांबसडक हातांनी,
उडतात तिचे काळे पिंजारलेले केस लांब
घोंगावणाऱ्या वाऱ्याच्या झोतांनी.

आहे या अर्धराख झालेल्या मातीच्या भिंतीवर
तिच्या विस्फारलेल्या केसांची धुरकट घनदाट नक्षी उतरलेली !

आहेत तिच्या हातांची नखं
निरपराध मानवांच्या प्रतिकारशून्य मानेत रुतलेली.
आहेत तिच्या धिप्पाड पावलांचे ठसे लांब
जळालेल्या गवताच्या राखेत उमटलेले !
आहेत तिच्या पायाच्या बोटांच्या करवती नखांचे
वक्राकार चरे प्रेतांच्या छातीवर रक्ताळलेले.

फिरतो विमनस्क मनान
जातात नसांतील नक्षत्रें विझून
उद्‌ध्वस्त झालेले दलितांचे बांबूचे मोडकें संसार पाहून.
उठतात हृदयात कळा
त्यांच्या
काटेरी झुडुपांच्या जीवनाचें जळालेले कुंपण पाहून.
पाहतो काटेरी फांदीत पळतांना
अडकलेला कोवळा पदर लुगडयाचा अजून हुंदके देणारा.
पाहतो कपाळावरचा गोल लाल टिळा
तिच्या चंद्राचा, अर्ध्यातून पांढऱ्या बलात्कारी रेघेने दुभंगलेला.
पाहतो नाल्याच्या पात्रात
उष्ठावलेला पिवळसर देह
अंतीम संघर्षानंतर विझून गेलेला.
पाहतो गोदेच्या काठावर फिरणारी
एक चाफेकळी, नभात हातवारे करणारी !

बापा रे ! आपलं दुःख होतं रे,
निसर्गाचं वरदान,
इथं नरपशूंनीच केले रे मग्रूरीन
भीषण उत्पात.

करतो आहोत शतकांपासून त्यांच्यावर अन्याय
लादतो आहोत त्यांच्यावर
शेंदरी प्राचीन संस्कृतीचा बेहिशेबी न्याय.
शोषतो आहोत त्यांच्या नसांतील रक्त
अपार श्रमाची जोख लावून
कुरतडतो आहोत त्यांचे आत्मे,
सामाजिक प्रतिष्ठेचा सोनवर्खी अभिमान दाखवून.

दिसतात जळालेल्या घरात, राखेच्या ढिगात
उभे टकमक
केस पिकलेल्या म्हाताऱ्याचे वाळलेल्या बोरासारखे गूढ डोळे.
स्वातंत्र्याच्या प्रौढ नभात सर्वस्व गमावून
उगवत्या दिशेवर आहे त्याचं मन खिळलेलं!
फिरतात काही म्हाताऱ्या कमरेत वाकलेल्या
खाली माना टाकून चालाव्यात,
काळ्या मेंढ्या दबलेल्या भीतीन
मडक्यांच्या ढासळलेल्या उतरंडीत
शोधतात : आहे काही कण उरलेले!
होतात हताश, पडतात सुरकुत्या चेहऱ्यावर अपार वेदनेच्या
उमटावेत असंख्य पाय पाखरांचे चिखलावर,
पडाव्यात काळ्या साऊल्या फांद्यांच्या
दुपारच्या रणरणत्या उन्हात
शेवाळलेल्या डोहावर!
देहावरील वयस्क रेषांतून पाझरतें त्यांचे सनातन
सगुण दुःख, हृदय फोडणारें!

तुटावीत रक्ताचीं नातीं
व्हावी दाही दिशांना पांगापांग
युगातून पडणाऱ्या भीषण कोरड्या दुष्काळात तशी.
गळून पडलेत सारें रक्ताचें संबंध
आकस्मिक उठलेल्या युगान्त वादळात.
फिरलेत वाळलेले जीव स्वतःच्याच
जीवाच्या अस्तित्वासाठी.
निघालेत सूंसाटत काही माणसं
उजाड झालेल्या
दिसेल त्या क्षितिजाच्या दिशेतून!
नाही पाहिले पळतांना त्यांनी
ज्वाळेत आहेत हृदयांचे तुकडे अडकलेले.
नाही पाहिले त्यांनी,
कण्हणारा जीर्ण शरीराचा बाप
आहे काही क्षणापुरताच उरलेला.
नाही पाहिली त्यांनी वैधवी पेटलेली पांढरी फाटकी साऊली


खोपटात जीवन कंठणारी.
नाही वाचवली त्यांनी
शापित नवत्या देहालाच स्वतःहून विहिरीत ढकलणारी!
पाहतो एक तरुण आई
राखेत कोसळलेली
आहे छातीवर एक मुल भीतीन गच्च बिलगलेलं.
नाही आली दया श्वापदांना
दिले आहे पेटवून दुबळ्या मायलेकरांना!

उन्हाची पेटती आंब्याच्या डहाळीची साऊली
पडावी पडक्या ओसाड बारवजवळील
मातृकेच्या अंगावर
होती बाभळीच्या फांदीची साऊली
कललेली
आईच्या जळालेल्या शरीरावर.

हे गांव संस्कृतीच्या रक्षकांचं
जमीन येथील प्राचीन यज्ञभूमी, देवभूमी!
घुमलेत येथे ध्वनी आसमंतात
'सर्वे सुखिनः सन्तु' मंत्राचे प्राचीन काळात.
राहतात म्हणे येथे मानवतेचे ठेकेदार
(होतो आज नित्य जीवनमूल्यांचा व्यापार.)
आहे येथेही आग पसरलेली.
आहेत महात्म्यांच्या तसबीरी फोडलेल्या.
काढली आहे प्रेतयात्रा
त्याच्या प्रतिकाची,
टाकले हो मुखात पाणी गटारीचे खेटरांनी;
घातली भीती पोतराजांनाही
आहे डफाच्या आवाजात अंतयात्रा प्रेषिताची निघालेली!

सारं घडतं या देशात राजरोसपणान
उमटत नाही प्रतिक्रिया अगतिकतेन.
उल्का तुटावी अंतरावरुन
जावा लोपून प्रकाश

पडावी, पाषाण होऊन नदीच्या काठावर.
माणसे या मातीवरची मुर्दाड
कातडीच्या आत
आहेत साऱ्यांचेच प्राण विझून गेलेले!
आहे आकाशातील नातीं सर्वांनीच अशीं तोडलेलीं!
आहेत रक्तातील वाहते सूर्य
साऱ्यांच्याच नसातील मावळून गेलेले!
आहे विझल्या समयीत
काळया राखेचे भेसूर निर्जीव ढीग भीतीचे साकळलेले!



बुडून जावा सूर्यच दुपारचा
व्हावा प्रलयी काळोख विश्वाच्या अंताचा
आकाशच पडावं उलथून
या प्राचीन पालथ्या उद्ध्वस्त पैठण नगरीसारखं,
यावेत घोंगावत रौद्र वारे कराल लाटेचे
गळून पडावीत प्रचंड हिमवर्षावात
फांद्यावरील सोनपाखरं टपटप
पोळलीत हो माणसं ज्वाळेच्या वर्षावात अशीं नित्यरोज !

चालत जातील काय हे गूढ भीतीचे दिवस



येऊ घातलेल्या प्रलयकालापर्यंत !
फिरत राहतील काय
या काळ्या साऊल्या एका निबीड काळोखापर्यंत !
कधीच उमटणार नाहीत काय प्रकाशाचीं
समजूतदारं पाऊलं ?
राहील काय घोंगावत हे विराट वाऱ्याचं
संघर्षमय वादळ
माणसांनाच घेऊन जात तुटलेल्या पर्णासारख दिशाहीन !
गळतील काय या साऱ्या सुगंधभरल्या
पाकळ्या पिवळ्या करुणेच्या
अवकाशात साऱ्या लाटा दरवळण्या अगोदर !
झडून जातील काय सारे दयाकुल सूर
शब्दांच्या हृदयात खोल रुजलेले
होणार नाही काय तो आविष्कार
दिव्यत्वाचा मानवी देहातून
काळोखचित्र काळात इतिहासाच्या घडला अनेकदा.

उमटणार नाहीत काय ती अखंड
मानवतेचीं पाऊलं
ओल्या मातीत जीं उमटतात या देशात उत्सवान.

बुजून जाणार नाहीत काय
या समाजासमाजातील युद्धरेषा
अस्मितेच्या दिशाहीन आविष्कारातून
आल्या जन्मास ज्या परस्परांच्या अविश्वासातून ?

वाटते फिरतो आहे
युद्ध संपल्या नंतरच्या मोकळ्या भूमीतून
भयाण निरवतेच्या अवकाशातून—

आहेत कुठे रथाचीं सुवर्ण चाकें फिरलेलीं
आहेत कुठे घोड्याच्या
गतिशील उमेट टाचा उमटलेल्या
आहे कुठे योध्याने बांग दिलेली

आहे कुठे सूत्रधाराने युद्धाच्या भूमीतही
न उतरता,
युद्ध संचालन केलेले!
आहेत कुठे नारे देऊन, सैन्याने
प्रचंड विजयी हल्ले केलेले
आहेत कुठे वेशीला तोरणें बांधून
विजयी शोभायात्रा निघालेली!
आहे हे युद्ध घडलेलें
आहे त्याने संबंध भू-प्रदेश व्यापलेला.
आहे युद्धाच्या भूमीवर
एक काटेरी बाभुळझाड वाचलेलं.
प्रहार होता मुळ्यांवर
आहे क्षितिजात तेंही कललेलं.
तें आहे समजूतदार, वयस्क,
होतं डोळ्यात साठवीतं सारं
उभं राहून तटस्थ
मावत नव्हतं तरीही त्याच्या मनात अपार दुःख.

त्याचीही निस्पर्ण फांदी शहारली
वाऱ्याच्या एका लाटेन,
आला मत्सराने पेटलेला जमाव चित्कारत
पेटविलं झाड समजूतदार
काही पेटून मुळ्या झाड काहीसं कललेलं
मुळ्या होत्या काही खोल जमीनीत रुतून
त्यान एकवटल्या साऱ्या प्रेरणा सर्वस्व ओतून.

होता शेंडा हिरवा
भविष्यात दृष्टी लावून,
होते धगधगतें प्राण बाभुळझाडात अजून!

होतें बळ खोडात
क्षितिजाशी एक संघर्ष उभा करण्याचें
होतें पानात स्पंदन
वाहत्या वादळाला सामोरें जाण्याचे.

होती त्याच्यात अदम्य इच्छा,
काळ्या मेघांना वाटेत अडविण्याची
होती मनात ईर्षा,
उगवत्या सूर्यालाच डोक्यावर खेचण्याची.

मी जातो झाडापाशी,
तेंही होतं हादरलेलं आतून
तुरळक तुरळक साऊल्या पसरलेल्या,
होतात पापण्या ओल्या.
जातो सरकून इतिहास घडलेला झावळ झावळ
या देशाचा डोळ्यापुढून केवळ.
पाहतो हा इतिहास
या विरळ बाभळीच्या साऊल्यांतून.

वाटते बापा रे,
खुडतो आहोत आम्ही साऱ्या वाटा
फुले-शाहूंकडे घेऊन जाणाऱ्या
नाकारतो आहोत साऱ्या आर्त हाका
शिंदे-आमटे महर्षींनी
हृदयाच्या ओल्याचिंब तळापासून दिलेल्या,
तुटलींत सारीं मनं
महात्म्यांनीं आयुष्य वेचून विणलेलीं
पांगलींत सारीं पाखरं
मानवतेच्या विशाल वृक्षांवर विवेकान एकदा थांबलेली!
पाडतो आहोत दऱ्या
महात्म्यांनी एकसंघ प्रीतीने बुजलेल्या.

मी मनव्याकुळ उभा अस्वस्थ
शोधतो आकाश,
चांदण्या प्रीतीच्या
आहेत ज्यात उतरलेल्या.
शोधतो मी वाटा
आहेत ज्या मानवकुळाच्या मुळात भिजलेल्या.

त्या प्रकाशमयी दिशांनी
येतात लांबहून हाका साद घालणाऱ्या
मी पाहतो त्यातून मला,
प्राचीन इतिहासातून
निघालेल्या वाटांना,
मी पाहतो
आलो ओलांडीत कोणत्या प्रदेशाला?

चालत आलोत काय आपण
तीं पाषाणयुगें,
आलोत काय,
विज्ञानाने शोधलेले गंधर्वांचे प्रदेश!
धर्म, जात, वंश प्रदेश पृथ्वीवर सोडून
आकाशपुत्रांनी उभारलेल्या
निखळ मानवतेच्या चंद्रवनात!
थरथरतं हृदय माझं
या वाटा ओलांडताना, वाटते–
की चालत आहोत आपण
अजून त्याच पुरातन काळातून
जगत आहोत जीवन मातीच
त्याच प्रारंभ अवस्थेतून.
अजूनही आहेत वस्त्र अंगावर
वृक्षांच्या हिरव्या फांद्यांचे.
अजूनही पेटवतो अग्नी मानव
प्राचीन लाकडांच्या घर्षणातून.
राहतो भीषण पावसात
स्वाभाविक कपारींच्या आडोशाला.
शोधतो साऊल्या वैशाखात
नदीच्या पाण्यात नग्न उतरलेल्या!
भोगतो सुदेही नारी
उघड्या मैदानात अक्षता पहुडलेल्या,
शोधतो भक्ष्य
नुकत्याच उमललेल्या अर्भकांचे!
विंधतो हिंस्र श्वापदांना

घडवून शस्त्र अगुदार पुराण पाषाणांचे.
दगडांनीच कोरतो दगडावर
भारदस्त हत्तींचे मस्तवाल चित्र
पहिल्या जाड रेषांनी.
कोरतो सिंहाचे खुनशी छावे
चंद्राच्या विझत्या प्रकाशात
सूडभरल्या तरारलेल्या लाल डोळयांनी ?

शोधतो मानवालाच
त्याच रेषांतून
पेटलेल्या उन्मत्त आनादि भावनांनी !
चालतो त्या वाटा
प्रारंभ काळातील पहिल्या पाऊलांच्या.
ओलांडतो पहाडामागून पहाड
भक्ष्य शोधात जशा मानवी टोळयां निघालेल्या.

बुडता सूर्य टेकडीच्या दगडा आड ठेवून
विसावतो पहाडाच्या पायथ्याशी
झडतात संघर्ष
मावळत्या उन्हात
वनातून तोडून आणलेल्या कच्च्या
मांसाच्या तुकडयासाठी ?
जातो वृक्षावर, एकट्यानेच
हिसकावलेले ओले मासाचे तुकडे चघळण्यासाठी !

होतो काय पुलकीत सर्व गात्रांनी
सूर्य बुडता, सरकतो—
पूर्वेकडून अद्‌भुत गोल दगड नभातील पाहून.
होतो काय आजही स्तंभित
मातीतच मिसळलेले परावर्तीत किरण पाहून.
निघतो काय किरणात न्हावून
उन्मत्त बेहोषीन !

शोधतो काय असावा देह

स्वाभाविक वासनेच्या तृप्तीसाठी,
कुरवाळतो काय राकट हातांनी तोच देह—
निघाला प्रकाशाचा किरण जेथून
या विश्वाच्या अंतिम यात्रेसाठी!
विसरतो काय अजूनही नार्ती
रक्तातील वाहती जाग जन्माच्या वेदनेची!

नाही ना ठेवीत लक्षात अजून
देहातच जन्मलेली काळी साऊली,
अंतिम क्षणीं सरकणाऱ्या मृत्यूची?

आहे रे सर्वांनाच एक दिवस
निघायचे लांब प्रवासाला
उमटेल मागे खूण कृतीची
असेल ती प्रकाशाची वा अंधाराची!
आहे अजून चाललेला प्रवास
जन्ममृत्यूच्या रेघेवर केवळ
नाही घेत अजून झेप आत्मा,
थांबावें अस्तित्व जीवनाच
या विशाल मानवतेच्या ओल्या विश्वकेंद्राजवळ!

होतात काय अजूनही तसेच हल्ले
एका टोळीने दुसरीवर केलेले
क्षुद्र हेतूंच्या पूर्ततेसाठी,
पेटविलीं जातात गवती खोपटीं
निवाऱ्याच्या पहिल्या जाणिवेतून
निर्माण केलेलीं कोवळ्या अर्भकांसाठी
आहेत काय मत्सराच्या मशाली पेटत्या
आंधळेपणान काळोखात स्वतःच्च अस्तित्व संपविण्यासाटी

अजूनही भिडतात काय तलवारी
पाणी उतरलेल्या
प्रकाश हरवलेल्या, पूर्वजांच्या दयाशीलतेचा
आहेत मात्र ढाली लकाकणाऱ्या

कमळाच्या फुलासारख्या कोमल
असाव्यात वादळी पावसात
डोक्यावर छत्र धरण्यासाठी.

ओलांडीत शतकांमागून किती शतके,
किती लांब ?
लांबच लांब रण मैदानातून आलो चालत
पडलेल्या पुरातन प्रेतांना टाळून
उदार समजूतदार प्रदेश शोधत
पाहिला भरल्या डोळ्यांनी
उद्‌ध्वस्त मानवतेचा प्रदेश माझ्याजवळ.

आहेत प्राचीन नगरांचे भरभक्कम कोट
आता ढळू लागलेले,
आहेत त्यांच्याही विटा काळभाराने ढासळलेल्या.
आहेत आता त्यांच्याही कोमल गात्रांवरून
शांतीचे वारे गेलेले,
आहेत त्यांच्याही डोळ्यातील आता
तळपत्या सूर्याचें तेज संपलेलं
आहे पाषाणाच्या मनात आता
क्रांतीचे लाल रक्त पेटलेलं!
साचलेल्या डोहातील पाणी
आहे तळाशी आता उकळू लागलेलं.

मातीच्या घरांनीही आहेत
छातीवर दिवे पेटविलेले
निस्पर्ण वृक्षावर आहेत
क्रांतीचे लाल डोळे लगडलेले!
चिखलातूनही आहे आज
नक्षत्रांसह आकाश खाली उतरलेलं!

शब्द होता चैतन्यहीन, दबलेला
भीतीनेच झडून गेलेला,
आज त्यांनाहि फुटले आहेत पंख

आत्मतेजात आहेत तेही न्हावून निघालेले!
जाळल्यात ज्या गवती झोपड्या
नरश्वापदांनी
आहे रे प्रत्येक मातीच्या जळक्या कणात
कांतीचे नवे सूर्य तेजाने लखलखलेले!

घडलें सारें क्रंदन ज्या नावासाठी
आहे त्यानेच आपलें नाव टाकलेलें,
आहे प्रत्येक मातीच्या घरात आता
त्याचेच नाव उगवत्यांनी धारण केलेले!

आहे पडक्या घरातील
क्षीणकाय देहातून
वाहती लाव्हा स्पंदनाची!
आहेत येथे नारींच्या गर्भागर्भात
कांतीचे रक्तथेंब सांडलेले!
आहेत येथील वज्रदेही पुरंध्रींनी
पदराखाली हळूच पेटते सूर्य झाकलेले!

होते का रे सुरू झालेलें
हें सर्पसत्र पुराण काळातले?
बापा रे!
आहे रे आकाश आता बदललेलें.
आहेत रे मातीनेही प्राण वेचलेले.

आहे रे तीनेही आपली कुस वळविलेली.
आहे सागरानेच आता नवी गाज दिलेली.
आहे आता अक्षरांनाच
नव्याने जन्म लाभलेला.
आहे आता देहच नव्याने
मनासह घडविलेला.
उगारु नका रे अन्यायी काठ्या
'नागा'नेच आहे रे आता
ही पृथ्वी फण्यांवर घेतलेली!

फण्यांवरील मण्यांचेच आता
उपेक्षित दुर्बल मनगटांनी
आहेत तळपते लखलखते सूर्य घडवलेले !

किती शतकांतून आले जीवन वाहात,
किती योजनं केला प्रवास मानवी मनान
किती वैराण प्रदेश पाहिलेत,
किती पाहिलेत पानथळ प्रदेश,
भिजलेले मानवतेन !

जीवन असते रे खंडित व्यक्तीच
वाहतें जीवन अविरत मानवाच;
संपणारं जीवन
सळसळतं नव्यान पुत्रपौत्रांच्या वाटेन
असते ना त्यांच्या खांद्यावर ओझं
दिव्यत्वाच्या प्रदेशातून पुढे जाणाऱ्या मानवतेच !

असतात जीं स्वप्न फांदीवर लगडलेलीं
फुलतात नातीं कालगतीत
असतात व्यक्तीच जीवन संपल्यावरही उमललेली.
स्वप्नच जीं असतात
काल ओलांडूनही उरणारीं
तीं असतात अक्षय अखंड झळाळणारीं !

संपेल जीवन व्यक्तीच, पिढ्यांच
आहे रे जीवन अक्षय प्रवाही मानवाच !

जीवन म्हणजे खिडकीतून आत आलेला
उतरत्या उन्हाचा एक तुकडा,
गर्द झाडीतून आलेला पाखरी स्वर
निळे पहाड ओलांडून विझणारा.
ही आहे दिवेलागण,
बघता यावीत अधुरीं स्वप्नं अस्पष्ट
पवळ्या मंद प्रकाशात.

ही आहे उघडण अंतीम विश्वफुलाची
मिटणारी त्या अतीत क्षणातील!
जीवन आहे फुल, फुलच नुसतें
फुटणारें आतून गंधाने, गळणारे केवळ !
जीवन म्हणजे उल्का,
क्षितिजांचे तोडून नाते, ही आली
सुखद भूमीवर
जीवन हीच निळाई
पसरून विश्वभर, उतरते निजसर
समुद्राकाठी देऊळ !

अरे जीवन म्हणजे क्षण, नुसता क्षण
क्षणास येतो जोडून
जीवन म्हणजे थेंब, नुसता थेंब
नदीत जातो वाहून
जीवन म्हणजे वीज, नुसती वीज
घनांत पडते मोडून
अरे जीवन म्हणजे माती, नुसती माती
मातीतच जाते मिसळून.

एवढेच आहे जीवन ?

जीवन आहे अखंड वांहतीं स्वप्नें,
नश्वरतेच्या ओलांडून कक्षांना
जीवन-तें जीवन, जें उरतें अंतिमतेंनंतर !

जीवन जें जोडून नातें विश्वकुलाशी, उरतें
जीवन जें क्षणाक्षणाला
मातीवरती उभ्या ठाकल्या व्यक्तींसाठी झुरतें
दुःखितास येतें, सुखच वाटीत जेव्हा
समज आपुलें सुरु जाहलें, अखंड जीवन तेव्हा!

जीवन नाही खंडीत
तें वाहतें काळनदीतून अविरत.

दिवसरात्र हीं तर परिमाणें,
काळ सरकतो छेदून सारी भुवनें!
पश्चिमेस कलतो चंद्र, विझूनी जातो
पूर्वेस फुलातून प्रकाश उमलत असतो !

अरे जीवन हळव्या वाटा
प्रकाश देतच झुलती शाश्वत
सागरथेंबी, चैतन्याच्या विश्वनाभींतून वळती
नक्षत्रांची लालनिळाई जीवनओल्या पंखांतून पाझरते
घनगंधाच्या गळत्या लाटा कमळफुलावर पडती,
त्यावर प्रकाश लहरी झुलती !

जीवन एक सकाळ
विहरती मोरफुलांचे तुरे
वृक्षांवरच्या शेंड्यावरती सोनउन्हाचे सडे
शब्दांशीही झोंबी खेळून,
जें शब्दाबाहेर उरें
अमृतवाटा जीवनघाटा झुंझत निघती पुढे.

अरे जीवन घडतें असें
संघर्षाच्या तुडवीत लाटा अग्नीतून चालतें.
मेघपर्ण बांधून शिरावर
सळसळती पहाडांतूनी झरे
जीवन बनतें असें प्रवाही
जीवन वळते पुढे.

त्वचेखालच्या प्राणांनाही
चैतन्याचे पिसे,
अजून सारे नाही कळलें
जीवन असतें कसें ?

असावे कसे जीवन ?
आहे काय हा प्रश्न हृदयात तरंगलेला

आहे काय कधी जीवनाचा
तळ शोधलेला ?

उरते रे त्यांचे जीवन मागे, अगदी मागे
मातीतही ओततात जे प्राण !

रक्तामधल्या लाल नभातून,
पेटवतात मातीचे दिवे
उमलवितात अखंडित
लाल जांभळे नक्षत्रांचे थवे !

मी आलो पाहात हीं नक्षत्रें
आलो हातात माती घेऊन
गंगेची ओल्या काठावरची.
मी लावतोय ती,
माझ्याच मातीच्या देहाला.
त्यान मंतरलेलं
शिंपडतोय पाणी सर्वांगावर
विरक्त कमंडलूतील.
लावतोय त्याच्या धुनीतील भस्म
व्हावी ओळख त्याची
या देहातील सघन मृतस्थ कणांना.

मी पाहतो
धर्मभूमीवरील
पिवळी माती घेऊन
तो येतो, व्रतस्थ मनान, विरक्त पिवळ्या देहान
भविष्याची कमळे आहेत
उमललेली त्याच्या तळव्यावरील रेषातून
तो करतो पुढे चंद्रासारखे सौम्य हात,
डोळ्यात त्याच्या असते
करुणा उतरलेली
शब्दात त्याच्या असते
प्रज्ञा तरारलेली,

पापण्यांचीं असतात त्याचीं
चंद्रकमळें वाकलेलीं !

मी टाकतो माझे प्राण
ओंजळीत त्याच्या,
तोही देतो ठेवून त्यांना...

ओंजळीत त्याच्या असतो
प्रकाश पसरलेला,
आकाशही असतं मुक्त उतरलेलं
मूक हाकाही असतात त्यान एकत्र सांभाळलेल्या
वेदनाही असतात त्यान शब्दात ओवलेल्या.
असतात गंजलेले देह सोबत
असतात दुभंगलेली जखमी मनं झिरपत...
असतात अन्याय, अत्याचार एका
कागदावर उतरविलेले,
असतात त्याने त्याचेच ताम्रपट
तयार केलेले !
आहेत त्यानेही हे प्रदेश उद्ध्वस्त
पाहिलेले,
आहे लक्षात त्याच्याही
ठायी ठायी आहेत अजून कोणी सुरुंग पेरलेले !
आहेत लांब पल्ल्यावरून अजून तोफा डागलेल्या
आहेत चिलखती पथकं
रणवाद्यांसह युद्ध भूमीवर थांबलेलीं !

डोळे माझे त्याच्या सोबत
अजूनही ओलावतात,
मन माझं असून बधीर
शांत हातांनी थोपटतो,
देह माझा गलितगात्र
संवर्षान उभारतो.
देहावरती ठेवून विस्तव
अजून सारे पेटवितो,

आकाशातील निळे दिवे
वाहत्या रक्तात उधळतो!

रक्तातील निळे दिवे
आकस्मात् पेटतात,
नांगरलेल्या भूमीवरती
प्रकाशकण पसरतात!

मी पाहतो मंद प्रकाशात
काळ्या मातीच अप्रुप रूप
कणकण जलोत्सुक,


मी पाहतो लांब साऊली क्षीणकाय
मातीवरून सरकणारी,
पहाडाशी एकाकी झुंजणारी!
शेवरीच्या वाळलेल्या शेंगांसारखी
बापा रे, तुझ्या उरलेल्या सापळ्यांची
वाऱ्याच्या भयाण झोतांनी
खुळखुळ्यासारखी हलणारी!
सरकते ती बाभूळझाडापाशी
घेते हातात बाभूळफुलं,
असतात उत्तररात्रीचे
चंद्रकिरण फुलांवर पसरलेले
असतात पश्चिमेला चंद्रानेही
ओले दवथेंब ढाळलेले!

सरकते साऊली पुढे,
ओंजळीतून गळतात तिच्या
बाभूळफुलं वारुळावर,
आणि जाते पसरत अनंतात
पश्चिमेला क्षितिजाच्या कडेवर.

मी सुस्थिर उभा,
फुटल्यात मुळ्या पायातून
गेल्या खोलवर रूजत

काळ्या मातीच्या अवयवातून.


जातात माझ्या मुळ्या पसरत
बाभूळ झाडाजवळ,
चंद्राच्या कलत्या साऊलीत
असतात वारुळाचे मनमोही महाल उभे !
लाल पुराण नागानेही असते
प्रदीर्घ पांढरी कात सोडलेली जवळ !
पूर्वेकडच्या एका कोपऱ्यातून
असते दिशा फुटलेली,



पांढऱ्या कातीवर आहे हलकीशी
लांब कोवळी रंगधून पसरलेली !

वारुळाच्या महालात आहे
आता खाली खोल,
लवथवत्या माणकांच्या डोळ्यात
ज्योत लाल पाजळलेली,
पांढऱ्या सरकणाऱ्या मणक्यांतून
युगापासून थांबलेली,
आहे आता पहाट उमललेली !

REFBK-0022816
REFBK-0022816





या प्राचीन उद्ध्वस्त प्रदेशातून । अजूनही
वाहतोय सूक्ष्म अतर्क्य गूढ काळोख । पेटलेल्या
यज्ञकुंडातूनही । नाही उगवलेत
या देवभूमीत सूर्य काही नगरांवर ।
चंद्रकिरणांचे नागमणी कवडसेही । जातात पसरत
प्राचीन वंशवृक्षांच्या राजकुळी फांद्यांवर ।
येतात घोंगावत महापूरातील अटळ निर्दयी वारे ।
दाट काळोखाच्या युगान्त लाटांवरून । जातात
भिजून । माझे रक्तमयी शब्द । उरतात
वज्राची टोकं केवळ ।

गुहेच्या खोल तळाशी
साचलेल्या,
सनातन पहाडी काळोखावर
एक जबरदस्त, निर्भय शक्तीशाली प्रहार